साप्ताहिक

# माणूस

१८ ऑगस्ट ८४/२ रुपये

## लष्करी राजवटी येतात कशा?




## आपण कुठे आहोत?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : बारावा

¤

१८ ऑगस्ट १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

# सप्रेम नमस्कार..

¤ 'गवाह' ही श्री. सुरेश उनियाल यांची मी भाषांतरीत केलेली हिंदी रूपककथा 'वॉन्टेड–एक जिवत साक्षीदार' या शीर्षकाखाली 'माणूस' १६ जून अंकात प्रसिद्ध झाली आहे. आपली कथा मराठीत आली याबद्दल अर्थातच श्री. सुरेश उनियाल यांना आनंद झाला; परंतु आपले नाव कथेच्या सुरुवातीला न येता शेवटी व ते सुद्धा लहान टाइपात प्रसिद्ध झाले या गोष्टीचे त्यांना वैषम्य वाटले. तसे त्यांनी मला पत्राद्वारे कळविले आहे.

२७ जुलै ८४ — रमेश देशपांडे, नवी दिल्ली

[आपल्याप्रमाणेच श्री. सुरेश उनियाल यांचेही 'माणूस'ला पत्र आले आहे. मूळ लेखकाचे नाव शेवटी व बारीक टाइपात छापण्यात त्या लेखकाचा अवमान करण्याचा मुळीच हेतू नव्हता. सोयीप्रमाणे लेखक–अनुवादकांची नावे खाली किंवा वर देण्याची 'माणूस'ची प्रथा आहे. तरीपण श्री. उनियाल यांना आपले नाव शेवटी व बारीक टाइपात येणे खटकले असेल तर त्याबद्दल दिलगीर आहोत. –सं.]

¤ आपल्या साप्ताहिकाचा मी एक चाहता आहे. आजपर्यंत कधीच लेखी प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही; परंतु ४ ऑगस्टच्या माणूसमधील श्री. स. शि. भावे यांचा अमेरिकेवरील लेख (भाग १) वाचला. तसेच 'मनःचक्षूचे सामर्थ्य' ही लेखमाला वाचली आणि पत्र लिहिण्यास उद्युक्त झालो.

१० ऑगस्ट ८४ — व्ही. एल. बर्वे, वालचंदनगर

## विनोदबुद्धी असलेल्या बालचित्रकारांना आवाहन

चित्रकार श्री. श्याम जोशी यांनी पधरा वर्षापर्यंतच्या मुलामुलींसाठी हास्य चित्र–चटका-स्पर्धा आयोजित केली आहे. मुला–मुलींनी पोस्टकार्डाच्या आकाराच्या पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने काढलेली, हसू येईल अशी स्वतंत्र हास्यचित्रे काढून पाकिटातून पाठवावीत. ज्यांना हे शक्य नसेल त्यांनी पोस्टकार्डावर काळ्या शाईने काढलेले हास्यचित्र पाठविले तरी चालेल. तसेच चुटका स्पर्धेत शंभर शब्दांच्या आत बसेल असा विनोदी प्रसंग किंवा स्वतःला सुचलेला चुटका लिहून पाठवावा. (तुम्ही कितीही चित्रे किंवा चुटके पाठवू शकता) प्रवेश फी नाही; पण चित्रामागे तुमचे नाव, पत्ता, वय, इयत्ता, शाळा लिहिण्याचे मात्र विसरू नका. चित्रे व चुटके पाठविण्याची शेवटची तारीख १५ सप्टेंबर १९८४ ही आहे. हास्यचित्रे आणि चुटका या दोन विषयांना प्रत्येकी रु १५०, १००, ५० आणि रु. २५ पुस्तकरूपाने बक्षिस दिली जातील.

उत्तम प्रतीच्या सर्व चित्रांना व चुटक्यांना 'मजा' दिवाळी १९८४ अंकात प्रसिद्धी मिळेल. तसेच उल्लेखनीय बालकलाकारांची नावे प्रसिद्ध केली जातील. चुटके व चित्रे परत केली जाणार नाहीत. निवडसमितीचा निकाल अखेरचा असेल.

पालकांनी व शिक्षकांनी मुलांना प्रोत्साहन जरूर द्यावे अशी विनंती आहे.

पत्ता : श्री. विश्राम शिरवाडकर, संपादक 'मजा' दिवाळी १९८४, पृथ्वी प्रकाशन, रंगनाथ मुद्रण, सी–३५, श्रीराम इंडस्ट्रियल इस्टेट, वडाळा, मुंबई ४०० ०३१. ☐

# विनाअनुदान अभियांत्रिकी महाविद्यालयांचे निकाल

वर्षापूर्वी महाराष्ट्रात 'विना अनुदान' तत्वावर सुरू केलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कारकीर्दीचा आढावा घ्यायला खरं तर काही हरकत नाही.

गेल्या शैक्षणिक वर्षात पुणे विद्यापीठांतर्गत 'विना अनुदान' तत्वानुसार बारा अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू झाली. या प्रत्येक महाविद्यालयामागे केक खंबीर 'साखर-संस्थानिक' उभा आहे. त्यामुळे कशाही बाबतीत कसलीही उणीव भासण्याची या महाविद्यालयांना सुतराम शक्यता नव्हती टाळी वाजवली की 'राक्षस' हजर अशी स्थिती !

महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, व भारती विद्यापीठ संचालित अभियांत्रिकी महाविद्यालय ही पुण्यातील म्हणजे शहरी विभागातली तर संगमनेर, कोपरगाव, प्रवरानगर, अहमदनगर, नासिक, धुळे, जळगाव, शहादा ही ग्रामीण परिसरातली अभियांत्रिकी महाविद्यालये.

या महाविद्यालयाची सगळीच चालक-मंडळी सरकारदरबारी वजन राखून असलेली. त्यामुळे कोणताही आटापिटा न करता नुस्ती इच्छा प्रदर्शित करताच सरकारने प्रत्येकाला एकेक महाविद्यालयाची परवानगी देऊन टाकली.

या निर्णयाचे 'पुरोगामी', 'क्रांतिकारक' म्हणून स्वागत करणारी 'जनता' आता गप्प आहे तर विरोधकांना चांगलंच कोलित मिळालंय.

कारण पहिल्या वर्षाचे निकालच तेवढे बोलके आहेत. त्या निकालाच्या आकडेवारीनं सगळ्यांनाच बोलणं भाग पाडलंय.

प्रवरानगरला एकूण बसलेले विद्यार्थी १५८. त्यातले फक्त २ विद्यार्थी पूर्ण पास झालेत. कोपरगावचे एकूण २५ विद्यार्थी होते. त्यातला एकही पास झालेला नाही! संगमनेरच्या ३८ विद्यार्थ्यांनीही कोपरगावची बरोबरी करून 'शून्य' निकाल लावला! नासिक, धुळे, जळगाव, शहादा, अहमदनगर इथली महाविद्यालयेही संगमनेर-कोपरगावच्या स्पर्धेत मागे पडली नाहीत. 'शून्य' टक्के निकाल लावून त्यांनी हे सिद्ध केलंय!

यांच्या तुलनेत पुण्याच्या महाविद्यालयांनी बाजी मारलीय म्हणायला हरकत नाही. महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ३०%, पुणे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी २५ टक्के आणि भारती विद्यापीठ ११ टक्के असा 'दणदणीत' निकाल लावून या संस्थानी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या ह्या अशा 'दणकेबाज' निकालांमुळे हादरलेल्या सगळ्यानी ह्यातून सावरण्यासाठी 'पासिंग स्टॅन्डर्ड' शिथिल करायची जोरदार मागणी केली. मागणी मान्य झाली. एक–दोन नाही चांगल्या चार विषयात ए. टी. के. टी देऊन विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षाला बसण्याची परवानगी देण्यात आली. या विशेष सवलतीचा फायदा या बारा महाविद्यालयातील ३०४ विद्यार्थ्यांना मिळाला आणि त्याचे वर्ष बचावले.

पूर्वी दोन विषयासाठी ए. टी. के. टी. दिल्याने कोपरगावला एक विद्यार्थी, संगमनेरला आठ, प्रवरानगरला १८, जळगावला ३, पुण्याच्या एम्. आय. टी. चे ८७, भारती विद्यापीठाचे २०, तर पुण्याच्या पी. आय. सी टी. चे १८ विद्यार्थी बचावले. या सर्वांना दुसऱ्या वर्षाला बसण्याची परवानगी मिळालेली आहे. चार विषयांपर्यंत मर्यादा शिथिल केल्याने संगमनेरची संख्या ८ वरून १२ वर गेली तर प्रवरानगरची १८ वरून ५३ वर गेलीये. चार विषयापर्यंत मर्यादा शिथिल करूनही शहादा महाविद्यालयाचा एकही विद्यार्थी पास होऊ शकला नाही!

प्रवरानगर, धुळे आणि जळगाव येथे झालेल्या परीक्षेतील 'मास कॉपी'मुळे विद्यापीठाने ३८० विद्यार्थ्यांचे रिझल्टस् राखून ठेवलेले आहेत आणि विद्यापीठाच्या Unfair means committee ने यावर अजून निर्णय घेतलेला नाही.

दुसऱ्या वर्षासाठी पुणे विद्यापीठाने किमान तीस विद्यार्थ्यांची अट घातल्याने या ग्रामीण महाविद्यालयांपैकी फक्त प्रवरानगर येथेच दुसऱ्या वर्षाचे वर्ग निघू शकतील.

या सगळ्या महाविद्यालयांचा हा निकाल तसा धक्कादायक आणि अनपेक्षित नाही. पहिल्या वर्षाच्या पहिल्या सत्राचा (सेमेस्टरचा) निकालही संगमनेर, अहमदनगर, नासिक, शहादा यांचा 'शून्य' टक्केच होता. कोपरगावचा १२, प्रवरानगरचा ५.६९, धुळे २.९४ आणि जळगाव .५५ टक्के असाच होता. त्यामुळे मानसिक तयारी असलेल्याना हा धक्का फारसा तीव्र वाटला नसेल.

या 'विना अनुदान' अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षणही 'महागडे' आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला ७५०० रु. पर्यंत अधिकृत फी द्यायला लागते. (३५०० रु. पेक्षा जास्त घेऊ नये असा आदेश असला तरी) होस्टेल, लायब्ररी, स्पोर्टस् यासाठीचे दोन–तीन हजार वेगळे आणि प्रवेशासाठी अनधिकृतपणे द्यावी लागणारी फी याव्यतिरिक्त. प्रत्येक विद्यार्थ्याच्या इंजिनिअरिंगच्या वर्षाला १०,००० रु. किंमत पडते. शासकीय अभियांत्रिक महाविद्यालयातली फी यापेक्षा तुलनेने फारच कमी, अगदी नगण्य म्हणजे फक्त ९०० रु. आहे.

एवढे 'भारी' किंमती शिक्षण देण्यासाठी खर तर सोयी–सवलतीही तशाच हव्यात. साधनाची कमतरता भासायला नको, विद्यार्थ्यांकडे जातीनं लक्ष पुरवलं जायला हवं, चांगला तज्ज्ञ प्राध्यापकवर्ग मार्गदर्शनाला मिळायला हवा; पण कॉलेज पदरात पाडून घेण्याच्या अनावश्यक घाईमुळे आणि हव्यासापायी चालकानी आवश्यक अशा वरील गोष्टीकडे साफ दुर्लक्ष केल खरं तर परवानगी देण्यापूर्वी या चालकसंस्थानी किमान आवश्यकताची पूर्तता केली आहे किंवा नाही हे बघणं सरकार आणि विद्यापीठाच काम होतं; पण तसं घडलं नाही. मग त्याचे परिणाम वर्षअखेरच्या निकालात दिसल्याशिवाय कसे राहतील?

चालकांनीही जागावाटप करताना आपले हितसंबंध महत्त्वाचे मानले. प्रत्येक संचालकाच्या काही जागा, भागधारकांच्या मुलांसाठी काही जागा, चेअरमनच्या शिफारसीने प्रवेश देण्यासाठी काही जागा राखीव. अशा सगळ्याच्या कोटयात गुणवत्तेचा निकष शिल्लकच उरला नाही!

गुणवत्तेनुसार प्रवेशापासून तो सर्व शैक्षणिक सवलतींपर्यंत या महाविद्यालयामध्ये सुसूत्रता राखण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण राखण्यासाठी एखादी यंत्रणा असणे आवश्यक आहे. याबाबतीत पुणे विद्यापीठाने मार्गदर्शकाची आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सहाय्यकाची भूमिका बजावू शकतात. त्याचीच खरं तर आवश्यता आहे.

एकदम क्रांतिकारक कार्यक्रम घेऊन धावायला सुरुवात केली तर त्याची प्रतिक्रियाही अशीच असणार. त्यापेक्षा विचारपूर्वक योग्य त्या आवश्यक तयारीनिशी पुढं जायला हवं.

याचा गांभीर्यानं विचार व्हायला हवा, तरच अशा क्रांतिकारक निर्णयाची निष्पत्ती आशादायक राहील.

—विनय गुणे
(संगमनेर)

## स्वामी अग्निवेश

# अन्याय, शोषण दूर करण्यासाठी जर राष्ट्रवाद उभा राहणार नसेल तर तो राष्ट्रवाद टाकाऊ आहे; नव्हे तो पराभूत ठरणार आहे.

मुलाखत । अविनाश भगवंत धर्माधिकारी

पुराणकालीन 'सुरस व चमत्कारिक' कथांनी असा एक संकेत घालून दिला आहे की, एकात एक एकात एक गुंफलेल्या साऱ्या कथा रात्रीच सांगितल्या जाव्यात. कधी त्या रात्री जागं राहण्यासाठी सांगायच्या तर कधी जागं होण्यासाठी. तसं अलीकडे पंजाब किंवा काश्मिरविषयी कोणतीही बातमी ऐकली-वाचली की मनातल्या साऱ्या सुरस व चमत्कारिक, पण रिझवणाऱ्या नव्हेत तर सुन्न करणाऱ्या, प्रश्नचिन्हे ठळक करणाऱ्या कथा आठवू लागतात. एकात एक एकात एक गुंफलेल्या कथा पार करत मी नुकत्याच पार पाडलेल्या दिल्ली-जम्मू-काश्मिर दौऱ्यापर्यंत मागे जातो. त्याही मागे जाता येईल; पण तूर्त इथेच थांबतो आणि उलटीकडून सुरुवात करतो.

गव्हर्नरच्या आदेशानुसार जम्मूकाश्मिरच्या विधानसभेत जी. एम. शाह यांनी बहुमत सिद्ध करून घेतले. सभापती इत्तू यांनी आक्षेप घेतला की नॅशनल कॉन्फरन्सच्या खालेदा गटातल्या आमदारांना मतदान करता येणार नाही. कारण त्यांनी पक्षांतर केलं आहे आणि काश्मिरच्या राज्यघटनेनुसार पक्षांतर करणाऱ्याचा विधानसभेतला मतदानाचा हक्क जातो. यावर, सर्वप्रथम मतदान होऊन सभापतीवरच अविश्वासाचा ठराव संमत झाला. सभापतिमहाशयांची शब्दश. 'उचलबांगडी' झाली. त्यानंतर शाहमंत्रिमंडळाचं बहुमत विधानसभेत सिद्ध झालं हे सर्व जे झालं ते अनपेक्षित नव्हतं किंवा काश्मिरच्या पूर्वपरंपरेला धक्का देणारंही नव्हतं. फारुक मंत्रिमंडळ ज्या तऱ्हेनं खाली खेचण्यात आलं त्यातच या सर्वांची बीजं होती.

ही कथा वृत्तपत्रात वाचत असताना मला श्रीनगरमधली कथा आठवली. जी एम शाह यांना भेटण्यासाठी सचिवालयात गेलो होतो. मंत्रिमंडळाची बैठक चालू असल्यामुळे त्यांच्या सचिवाच्या खोलीत बसलो होतो. आतल्या बैठकीत काय चालू असेल--लुटीच्या हिश्श्याच्या वाटणीबाबत मतभेद असतील का-- असला विचार करत त्या सचिवाशी गप्पा मारत होतो. या देखण्या सचिवानं नाना प्रश्न विचारले. तुम्ही काय पाहिलंत, लोक काय म्हणतात. कोणाकोणाला भेटलात वगैरे. नंतर त्यानं एका मासिकाचा अंक दाखवला. ज्योतिषाला वाहिलेल्या या मासिकाची ऑगस्ट ८३ ची प्रत होती. त्यातल्या राजकीय भविष्यावरील प्रकरणात लिहिलं होतं-'फारुक अब्दुल्लासाठी नव्या वर्षाचा (म्हणजे १९८४) काळ अत्यंत वादळी आहे. त्यांचा बॉस म्हणजे गव्हर्नर याची बदली होईल. (बी. के. नेहरू. त्याची बदली झाली) त्या जागी येणारा नवा गव्हर्नर फारुक अब्दुल्लांना घातक आहे. सावध न राहिल्यास हा काळ त्यांना अत्यंत घातक आहे. विशेषत: १ जुलै ते १९ जुलै हा कालखंड डॉ. अब्दुल्लांना खडतर आहे त्यांच्या कुंडलीतले ग्रह समर्थ आहेत; पण या धोक्यातून जर ते बाहेर पडू शकले तरच ते एक अखिल भारतीय नेते बनतील!' या ओळींखाली रेघा मारलेल्या होत्या. एक पक्षकार्यकर्ता आनंदानं सांगत होता, 'फारुकभाई या धोक्यातून पार पडत नाही.' मी त्याच्या उत्साहावर थोडं विरजण घातलं तेव्हा पत्रकार शोभलो! त्याला सांगितलं, 'थांबा जरा, त्यात खडतर कालखंडाची मर्यादा २९ जुलै दिली आहे. विधानसभेत सामर्थ्य अजमावण्याची तारीख ३१ जुलै आहे.' पण ३१ जुलैला शाह यांच्या कुंडलीत वक्री जाणारा ग्रह-सभापती उचलून दूर केला गेल्यावर खऱ्या अर्थानं 'सामर्थ्य' अजमावलं गेलं. त्यानंतर श्रीनगरमध्ये झालेली निदर्शनं चिरडताना 'सहा ठार' असं वृत्तपत्रात आलं होतं.

तेथे त्या दिवशी मुख्यमंत्र्याच्या सचिवाच्या कार्यालयात बोलतानाच व आणखी सात आमदार 'इकडे' येतायत असं मी त्यांना सांगू शकलो होतो. कारण नॅशनल कॉन्फरन्सच्या फारुक गटाचं कार्यालय 'मुजाहिद मंजिल' इथूनच मला तसं सांगण्यात आलं होतं. हे इकडे आलेले आमदार म्हणे लष्करी संरक्षणात रहात होते, ते घरीही जात नसत. त्यांना MLA हॉस्टेलवर पहाऱ्यात ठेवण्यात आलं होतं. बंद जाळीच्या व्हॅनमधून रोज त्यांना सचिवालयात आणलं जायचं, परत नेलं जायचं वगैरे. सुरस-चमत्कारिकथा ऐकून होतो.

पण एवढ्याच कथा पुरेशा नव्हत्या. अशा केवळ राजकीय घडामोडी काय प्रत्येकच प्रांतात पहायला मिळतील. इथे, भारत-पाक-रशिया-चीन यांच्या बेचक्यात, लष्करी भू- राजकीयदृष्ट्या मोक्याच्या जागी वसलेल्या काश्मिरमधल्या राजकीय घडामोडीचा अर्थ बदलतो. मधनं-अधनं त्या घडामोडीसमोरचा केवळ-राजकीय पडदा दूर सरकतो अन् मग दर्शन घडतं ते राष्ट्रविरोधी कारवायांचं.

शीख अतिरेक्यांना काश्मिरमध्ये संरक्षण, त्यांच्याशी काश्मिरी अतिरेक्यांची–उल्लेखनीय नेत्यांची हातमिळवणी, सार्वमताच्या बुरख्याआडून येणारी पाकिस्तानवादी चाले, अन् या सर्वांकडे पक्ष-निरपेक्ष, राष्ट्रवादी दृष्टिकोनातून न पहाता त्याचा राजकीय फायदा लाटायची प्रत्येक पक्षाचीच धावपळ. सुरस व चमत्कारिक म्हटलेल्या कथामधला सुत्र करणारा, प्रश्नचिन्हे ठळक करणारा कथाभाग तो हा. एवढ्यावरच तो संपत नाही. ही तर त्या कथा–प्रवासाची केवळ झलक. त्याचा प्रारंभ दिल्लीतून होतो.

दिल्ली-जम्मू ही जम्मूमेल नेहमी दिल्लीतून दुपारी निघते. रात्री पंजाब पार करत सकाळी जम्मूमध्ये पोचते; पण सध्या पंजाबातून जाणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या फक्त दिवसाच धावत होत्या. रात्रीच्या गाड्याना अतिरेक्यांपासून धोका होता ना ! काश्मिरमध्ये जाणारी तर एवढी एकच रेल्वे चालू होती. त्यामुळे डब्यांमध्ये खच्चून गर्दी होती. तीही बहुसंख्य लष्करी जवानांची. त्यामुळे आरक्षित डब्याची चैन उपलब्धच नव्हती. एकेका कपार्टमेंटमध्ये दुप्पट–तिप्पट लोक कोंबलेले होते. रात्री ११.०० ला जम्मूमेल निघाली. रात्रभरात हरियाणा पार केला आणि मग दिवसाच्या प्रकाशात पंजाबमधून प्रवास सुरू झाला. तरी प्रत्येक स्थानकावर गाडी पुष्कळ वेळ थांबत होती. पुन्हा पुन्हा तपासणी होत होती.

त्यामुळे पंजाबच्या कथा आठवायला पुष्कळ वेळ होता. लष्करी कारवाईनंतर काय काय अतर्क्य बातम्या पुण्यात आमच्यापर्यंत पोचल्या होत्या ! ३ जूनला सुवर्णमंदिरातून 'खालिस्तान' जाहीर होणार होतं. त्याला अमेरिका, पाकिस्तान, चीन ताबडतोब पाठिंबा जाहीर करणार होते. पाठोपाठ मिळणाऱ्या आदेशानुसार ५ जून-पासून सामूहिक कत्तलीचं सत्र सुरू होणार होतं. या सर्व बातम्या भारत सरकारला रशियन इंटलिजन्सन पुरवल्या म्हणून लष्करी कारवाई झपाट्यानं पार पाडण्यात आली. ती पार पाडतानाही काही महत्त्वाच्या चुका घडल्या; पण योगायोगानं धोके टळले ते सैनिकांच्या प्राणांचं मोल दिल्यामुळं. प्रथम आदेश होता की, हर-मंदिरसाहेब आणि अकालतख्तावर गोळ्या झाडायच्या नाहीत. दोन्ही ठिकाणांहून लष्करावर भयानक हल्ला होतच होता, अनवाणी पायानं, गोळ्या न झाडता परिक्रमेवरून अकाल–तख्ताकडे धावत जायचा प्रयत्न करताना, या वेड्या साहसात कित्येक सैनिक मृत्यु-मुखी पडले. अखेर 'ऑपरेशन' करणाऱ्या सेनानींनी अकालतख्तावर हत्यार चालवायचा दिल्लीचा आदेश मागितला. दोन तासानंतर 'ग्रीन सिग्नल' मिळाल्यावर मग अकालतख्ताच्या वास्तूवर हल्ला चढवण्यात आला. त्यानंतर सुवर्णमंदिरात नोटा, विदेशी शस्त्रं, दारूगोळ्याचा कारखाना वगैरे तर सापडलेच; पण तीनशे मुली सापडल्या ! यातल्या कित्येक पळवून आणलेल्या होत्या. त्या हेरगिरी आणि 'अन्य' कारणांसाठी वापरल्या जायच्या आणि अखेर, अजूनसुद्धा अतिरेक्याची शक्ती लष्कर पंजाबातून मागे जायचीच फक्त वाट पहातेय की लगेच रक्तपाती सूडसत्र सुरू होईल ! त्यात पंजाब पोलीसदेखील सामील असेल ! सेन्सॉरशिपच्या कोटबंद प्रांतातून उठ-णाऱ्या या बातम्यांमधलं खरं काय, खोटं काय कसं कळणार ? पण संत भिंद्रानवाले जिवंत असल्याचं ठाम श्रद्धेनं सांगणारे सरदारही भेटत होते.

दुपारी जम्मूमेल जम्मूतावी शहराच्या रेल्वेस्थानकात प्रवेश करत होती. शहरापासून हे स्थानक जरा उंचावर आहे. त्यामुळे खाली, दूरवर जम्मूतावी पसरलेलं दिसत होतं. आधी ती नदी पार झाली होती. मागे दूरवर अखंड पसरलेले रूळ, रुळांखालचा काश्मीर, पंजाब या प्रांतातल्या अनेक कहाण्या... सर्वांचे धागेदोरे परत परत दिल्लीपर्यंत पोचत होते.

## निवडणुका केव्हा होणार ?

दिल्लीत विठ्ठलराव गाडगिळांची मुलाखत संपवून उठता उठता विचारलं होतं–

'निवडणुकांचं काय ?'

'होतील ना वेळापत्रकाप्रमाणे जानेवारीत.'

'पुण्यात तर अगदी कॉंग्रेसच्याच आमदारांकडून कळलं की ऑक्टोबर–नोव्हेंबरात तयारीत रहा असे आदेश मिळालेत ?'

'एकूण एकच. कदाचित नोव्हेंबर–डिसेंबर' विठ्ठलराव म्हणाले आणि शालिनीताईंना भेटायला निघाले. मी दिल्लीच्या रुंद, सुनसान रस्त्यावरून चालायला सुरुवात केली.

यापूर्वी वेगवेगळ्या वेळी शिवराज पाटील, शंकरराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण यांच्या भेटी झाल्या होत्या. त्यांच्या सचिवां-पासून, तिथल्या फर्निचरच्या रचनेपासून ते वागण्याच्या, जगण्याच्या पद्धतीपर्यंत काही समान दुवे आढळतात. येणाऱ्या कोणत्याही माण-साला जरा चार हातावर ठेवून वागवणं, चेहऱ्यावरची सुरकुतीही न हलवता प्रतिक्रिया देणं वगैरे... म्हणजे हे पुढारी– अरे चहा आण– तुमची ही पंजाब सद्भावयात्रेची कल्पना कौतुकास्पद आहे. देशांतर्गत समस्या खरोखरच गंभीर स्वरूप धारण करतायत–ही तीनही वाक्यं एकाच सुरात फेकू शकतात. हे करताना कदाचित शंकरराव पान चघळत असतील, यशवंतरावांचे गाल तळव्यात विसावलेले असतील आणि शिवराज पाटील तुमच्याकडे जराशा कौतुकानं पहात असतील इतकच; पण त्यांच्या वागण्यातली अशी 'स्थितप्रज्ञता', आसपासच्या यंत्रणेची हालचाल, वातानुकूलित हॉल्स, फोन्स, कागदपत्रं आणि मोठीमोठी सरकारी भवनं या सर्वां-तनं मिळून डोळ्यासमोर सरकार आणि नोकरशाहीचं एक चित्र उभं रहातं. बाहेर कितीही आरडाओरडा असो, आसाम विव्हळत असो, पंजाब पेटलेला असो, काश्मीर धुमसत असो, आंध्र–कर्नाटक शंख करत असोत किंवा महाराष्ट्रीय मंत्री प्रीत असोत, बिहारी मंत्री खात असो किंवा राजस्थानी मंत्रिमंडळ झोपेत असो हे सरकार, ही नोकरशाही अढिग आहे, भक्कम आहे, ती सुखासुखी हलणार नाही, परिवर्तनाची कोणतीही भाषा, कृती अल्पावधीतच बोथटून टाकण्याएवढी ती टणक आहे, असा दबदबा आपल्या मनात निर्माण होतो.

आपसातल्या सत्तासंघर्षामुळे हातातली सत्ताच गमावू नये एवढी काळजी घेण्याएवढं राजकीय 'प्रौढत्व' कॉंग्रेसी नेत्यांपाशी आहे. तो काय जनता पक्ष थोडाच आहे ?

आता आता तर कॉंग्रेसची नवीन रचना करण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याविषयीच्या बातम्या दिल्लीतले पत्रकार सांगतात. कॉंग्रे-सची मांडणी एक अत्याधुनिक, बांदेसूद पक्ष म्हणून करण्याचं काम

राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली चालू आहे. एक भक्कम 'केडर' निर्माण करण्याच्या दृष्टीन पावलं उचलली जातायत काँग्रेसी हुल्लड-बाजी, कामं सोडून मंत्र्यामागं धावणं मंत्र्यांनी राजीवमाग धावणं, हारतुऱ्याची उधळपट्टी आणि बेशिस्त याबद्दल अनेकदा राजीव गांधींनी कार्यकर्त्यांना धारेवर धरलेलं आहे. अलीकडेच कॉम्प्युटर्सचा वापर करून येत्या निवडणुकाच्या अपेक्षित उमेदवाराचं 'स्क्रीनिंग' करण्यात आल. ब्रिटनमधल्या निवडणुकामध्ये पक्ष आपली प्रचार-यंत्रणा कोणत्या तरी व्यावसायिक प्रचारकंपनीकडे सोपवतो. तो मार्ग काँग्रेस चोखाळू पहातेय. एका special correspondent नं माहिती दिली की, दिल्लीतल्या मध्यवर्ती पक्षकार्यालयात आणि देशभरच्या जिल्हा कार्यालयांमध्ये टेलिप्रिंटर्स बसवलेत. त्यावरून दर आठवड्याला 'केन्द्राला निवेदन–केन्द्राकडून आदेश' अशा शिस्तीनं अत्याधुनिक पद्धतीनं काम करायचा प्रयत्न चालू आहे

निवडणुकांच वारं तर शिडात भरत चाललं. परवापरवाच पुण्यात शांतिलाल सुरतवाला आणि सतीश देसाई यानी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. हा प्रसग साजरा करायला विठ्ठलराव गाडगीळ हजर होते. महापौर निवडणुकीच्या वेळीसुद्धा सभागृहाबाहेर उपस्थित होते.ससदेच्या निवडणुका जवळ आहेत हे ध्यानात ठेवून वागा अशी तबी नगरसेवकाना देण्यात आली होती. त्यामुळेच महापौर निवडणुकीच्या वेळी पुणे महापालिकेचं सभागृह नेहमीइतक दणाणलं नाही. थोडा गुलाल उधळण्याचा प्रकार झाला. मुख्य गुलाल मोठया निवडणुकां-साठी राखून ठेवलाय.

अशा वेळी कोणालाच निश्चित माहीत नाही की त्या निवडणुका नेमक्या केव्हा होणार ? बऱ्याच काळापासून निवडणुका आज जाहीर होतात की उद्या असं चालल होतं. तो लांडगा केव्हा आलाच नाही. आता नियमित वेळापत्रकाप्रमाणे वेळ जवळ येत चालली तर काही विरोधी पक्षनेत्यानी म्हणायला सुरुवात केलीय, 'इंदिराजी निवडणुका घेणारच नाहीत ! निश्चित एक इंदिराजीच जाणे.

म्हणजे विरोधी पक्ष हवेत. त्याचे डोळे बाई आता पुढची चाल कोणती रचतात याकडे लागलेले. त्यानुसार विविध पक्ष आपापली चाल चालणार. म्हणजे राजकारणाचा पुढाकार initiative-बाईंच्या हातात, विरोधी पक्ष त्याला अनुसरून आपापल्या आघाड्या, मोर्चे, निवडणूक समझोते जुळवणार.

दिल्लीत–देशात एकेक हवा कशी उठते, कोण उठवतं हा एक प्रश्नच आहे. उदाहरणार्थ पुढचा पतप्रधान दक्षिणेकडचा 'ही एक हवा. लगेच म्हणणारे म्हणतात 'म्हणजे NTR च !'

## N. T. रामाराव–दिल्ली

सिनेनट राजनीतिज्ञ हे काही नवीन प्रकरण नाही. द्र. मु. क. चे नेते त्यातलेच करुणानिधी सवादलेखक MG रामचद्रन् अभिनेते. सिनेसृष्टीतली स्पर्धा हेच मुळी करुणानिधी X रामचंद्रन् सघर्षाचं मूळ. करुणानिधीचीं अपेक्षा की MGR नी राजकारणाच्या पट-कथेतही आपण लिहिलेलेच संवाद रेटावेत तर MGR याची इच्छा करुणानिधीनी आपल्या भूमिका MGR च्या राजकारणाला पोषक अशाच बेताव्यात. अशा रीतीने दक्षिण भारतातच सिनेनट राज-नीतिज्ञ या प्रकारानं प्रथम जन्म घेतला. शिवाजी गणेशन् राज्य-सभेचे सदस्य आहेतच. आता MGR च्या पक्षातली अभिनेत्री जयललिता राज्यसभेत जाऊन बसलीय. नासिरुद्दीन शाहला जय-ललिता राष्ट्राध्यक्ष झालेली आवडेल, कारण मग पहाण्यासारखा एक तरी चेहरा दूरदर्शनवर पुन्हा पुन्हा दिसेल ! अमिताभच्या राजकारणप्रवेशाच्या अदाजावर तर कित्येक सिनेसाप्ताहिक जग-तात आता दादा कोंडकेंना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हायची 'इच्छा' झालीय. केरळमध्ये प्रेम नझीर राजकारणात उतरू लागलाय.

सिनेनटाला राजकारणी पुढारी होणं एकदम सोपं. दोन्ही व्यव-सायांना अभिनयगुण लागतात ना ! आणि दोन्ही व्यवसायांमध्ये दुसऱ्यानं लिहिलेले डायलॉग–सिनेमात संवादलेखकानं, राजनीतीत खाजगी सचिवानं–असे डायलॉग मारून पडद्यावर भाव खायचा असतो. दोन्ही ठिकाणी भूमिकाच वठवायची असते, खरोखरी जगा-यची नसते. बोललेल्या शब्दाप्रमाणे जगून दाखवायला सिनेनट अथवा राजनीतिज्ञ बांधलेला नसतो.

## ऐक्य चळवळीचे अध्वर्यु

'तरीही NTR या बाबतीत सर्वांत वेगळे. पक्षस्थापनेपासून केवळ नऊच महिन्यात, साठीच्या आसपास पोचलेल्या या नटानं काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात त्याचा धुव्वा उडवला. सरकार बनवल. पक्ष बांधला, सघटित केला, संन्यास घेतला, रहायला झोपडी बांधून घेतली. ही विविध 'फँड्स्' आणि तेलगुदेसम् सरकारच प्रशासन याविषयी उलटसुलट बातम्या येतात. प्रकरणं उद्भवतात. उदा. 'इनाडू' प्रकरण; पण एकूण मिळून तेलगुदेसम् सरकार ठीक काम करत असल्याचच दृश्य वाटतं. NTR याचा व्यक्तिगत 'करिश्मा'देखील चढत्या प्रमाणात आहे. अमेरिकेत तेलगूतून, हिंदीतून भाषण करणं अनेकाना कौतुकास्पद वाटतं. भ्रष्टाचारनिर्मूलनासाठी हसन-अल-रशीद–तंत्र वापरणं, स्वतःच्या पक्षातल्या एका मंत्र्याला मुद्दाम सापळा लावून भ्रष्टाचारात रंगे हाथ पकडणं अशा शॉट्स्नं NTR ना सतत वृत्तपत्रात ठेवलंय; पण सगळंच असं निसरडं, दिखाऊ नाही. NTR आज विरोधी पक्षाच्या ऐक्य–चळवळीचे अध्वर्यू आहेत विजयवाड्याला पहिली विरोधी पक्ष बैठक त्याच्याच पुढाकारानं भरली होती. एक राज्य प्रचड बहुमतासहित पाठीशी असल्यामुळे NTR यांच्या निमंत्रणाला विरोधी पक्षानी तेव्हाही अनुकूल प्रति-साद दिला होता, आताही काश्मिर घडामोडीवर प्रतिक्रिया देण्या-साठी NTR नीच विरोधी पक्षाना अल्प सूचनेनंच दिल्लीत गोळा केलं.

विरोधी प्रक्षाच्या या बैठकीला चार मुख्यमंत्री आणि एकोणीस पक्ष हजर होते. काँग्रेसेतर नाव घेण्या-जोगा आणि नावसुद्धा न घेण्याजोगा प्रत्येक विरोधी पक्ष 'मम' म्हणायला दाखल होता. अकालीदल नव्हतं; पण सध्या 'अकालीदल' नावाचा प्रकार आहे तरी कुठे हे शोधायलाच पाहिजे ! अण्णाद्रमुक नव्हता; पण या पक्षाचा काँग्रेसशी निवडणुक–समझोता आहे. आता तर येत्या निवणुकीत इंदिराजी तामिळनाडूतून निवडणूकीला उभ्या राहतायत. बाकी जनता, भाजप CPI, CPM A to Z (आय वगळून) काँग्रेस, फॉरवर्ड ब्लॉक, द्रमुक, नॅशनल कॉन्फरन्स, राष्ट्रीय संजय मंच, रिपब्लिकन पक्षाचे तिन्ही गट, शेकाप वगैरे वगैरे. भारताच्या राजकारणातले सर्व महत्वाचे पक्षनेते दिल्लीत या बैठकीला दाखल होते. म्हणजे वाजपेयी, अडवानी, चरणसिंग, मधु दडवते, जॉर्ज

फर्नांडिस, सी. राजेश्वर राव, ज्योति बसु, नंबुद्रिपाद, शरद पवार, बहुगुणा, सय्यद मीर कासिम, फारुक अब्दुल्ला, मनेका गांधी, इंदरकुमार गुजराल...यादीवरून नुसती नजर फिरवली तरी विजोड वाटणाऱ्या या सर्व जोड्यांचं पौरोहित्य करत होते NTR भगव्या कडक स्टार्चच्या वेशात!

त्याच्याच दुसऱ्या दिवशी राष्ट्रीय विकास परिषदेची बैठक होती. *त्यासाठी इतर प्रांताचे मुख्यमंत्रीसुद्धा दिल्लीत डेरेदाखल होत होते.* त्या एक-दीड दिवसात, भारताच्या केंद्रीकरण झालेल्या राजकारणाचं भान येत होतं. दिल्लीत पंचवीस वर्षे काढलेल्या पत्रकार मित्रानं सांगितलं की, एवढ्या प्रमाणावर केंद्रीकरण ही इंदिराजींच्या राज्याची देणगी आहे. पंडितजींच्या वेळी राजकीय सत्तेचं एवढं केंद्रीकरण झालेलं नव्हतं. पंडितजींच्या लेखी लोकशाही सकेत, प्रांतांचे हक्क आणि विरोधी पक्षांचं लोकशाहीतलं स्थान हे जीवनमूल्यवत् मुद्दे होते. इंदिराजींचं तसं नाही.

इंदिराजींचं तसं नाही हेच NTR त्यांच्या भाषणात सांगत होते—

'मित्रांनो, आणि बंधु-भगिनींनो,

काश्मिरमधल्या दुर्दैवी घडामोडींची चर्चा करण्यासाठी आणि आपले बंधू डॉ फारुक अब्दुल्ला यांच्या पाठीशी उभं राहण्यासाठी अल्पशा सूचनेनंतर बोलावलेल्या या बैठकीत मी आपणा सर्वांचं स्वागत करतो. फारुक अब्दुल्ला आज इथे आपल्या समवेत आहेत. काश्मिरच्या गव्हर्नरांनी केलेल्या अन्याय्य आणि लहरी कृत्याला सामोरं जाताना ते ज्या धैर्यानं पेश येतायत त्याबद्दल मी त्याचं मनःपूर्वक अभिनंदन करतो...'

एकेक वाक्य केवढं मोठं! अवघड शब्द, स्वल्पविराम वगैरेंनी रचलेलं. NTR च्या पी. ए. नं इंग्लिशमध्ये डॉक्टरेट घेतलेली असणार. तीसुद्धा 'शेक्सपियरन ट्रॅजेडी' वगैरे विषयावर...

'आपल्या या बाल्यावस्थेतल्या लोकशाहीच्या, ज्या लोकशाहीमुळे आपण जाऊ तिथे एका महान राष्ट्राचे नागरिक म्हणून वावरू शकतो, ज्या लोकशाहीला आम्ही शिरोधार्य मानतो अन् जिच्या रक्षणार्थ आपल्यापैकी प्रत्येकजण सर्वोच्च त्यागास सज्ज आहोत, त्या लोकशाही एका महत्त्वपूर्ण क्षणी आपण एकत्र येत आहोत. या लोकशाहीला आज राष्ट्रहितापेक्षा पक्षहिताला प्राधान्य देणाराकडून धोका निर्माण झाला आहे...'

बैठकीत किती विरोधी पक्षनेते कागदाशी, पेपरवेटशी खेळत बसले असतील, असा मी विचार करत होतो; पण काश्मिर विषयावर सर्व विरोधकांचं एकमत घडवून आणण्यात NTR यशस्वी झाले होते. ७७' *मधला जनता पक्ष मोडल्यानंतर पुन्हा कधीही अगदी आसाम*-पंजाबसारख्या गंभीर राष्ट्रीय प्रश्नांवरसुद्धा सर्व विरोधी पक्षाचं मतैक्य झालं नव्हतं, ते आता झालं. सर्व विरोधी पक्षाची भूमिका पत्रकारपरिषदेत मांडताना ते सांगत होते—

'जम्मू-काश्मिरच्या लोकप्रिय फारुक अब्दुल्ला सरकारला अचानक बडतर्फ करण्याचं अन्याय्य कृत्य हे या राष्ट्राच्या जनतेच्या पवित्र हक्कांना तुच्छ लेखण्याच्या केंद्र सरकारी पक्षाच्या बेजबाबदार दृष्टिकोनाचं केवळ आणखी एक उदाहरण आहे.'—

बाप रे! मूळ इंग्लिशमधलं हे लांबलचक वाक्य, मराठी शैलीनं मांडायचा प्रयत्न करताना किती धडपड झाली! मोठमोठे शब्द, भरभक्कम वजनदार वाक्यरचना (NTR चं काय जातं, ते वाचन दाक्षवत होते) यातून अमिताभच्या जातीच्या घनगंभीर आवाजात NTR नी भूमिका मांडली.

## 'जय हिंद'नं भाषण संपलं

केन्द्र-राज्य–संबंधांची पुनर्रचना, गव्हर्नरपदाचा राजकीय कारणासाठी केला जाणारा वापर, गैरकाँग्रेसी सरकारांना मिळणारी सापत्नभावाची वागणूक, राज्याच्या हक्कांविषयी केन्द्राची तुच्छता असे मुद्दे मांडून 'काश्मिर' हे या सर्वांचं प्रतीक आहे, म्हणून माझ्या प्रिय मित्रांनो,

'आपल्यासमोर आता अशी वेळ येऊन ठेपली आहे की, आपल्या पूर्वजांनी समर्पण आणि शहाणपणानं प्रेमपूर्वक उभ्या केलेल्या वैभवशाली लोकशाहीच्या रचनेला कॅन्सरप्रमाणे पोखरणाऱ्या या भयानक धोकादायक रोगाचा निग्रहाने, धर्मयोद्धयाप्रमाणे विरोध करण्यासाठी आपसातले मतभेद विसरून आपण एकदिलानं उभं रहायला हव.'

कॅमेऱ्यासमोर आयुष्य काढलेल्या या माणसाला डोळे आपल्याला कसं न्याहाळत असतील याची जाण असणार. त्यामुळे खुर्चीतली पोज, हातांच्या अॅक्शन्स, आवाजातले चढउतार, शब्दांची निवड सर्व काही जाणीवपूर्वक सफाईदार होते काँग्रेस (आय) च्या धोरणांवर टीका करत शेवटी त्यानी आपल्या मागण्या समोर ठेवल्या.

जम्मूकाश्मिराच्या गव्हर्नरांनी उचललेली पावलं परत घ्यावीत, *विधानसभेत ताबडतोब शक्तिपरीक्षा व्हावी, गव्हर्नर जगमोहन यांना* परत बोलवलं जावं.

'जय हिंद'नं भाषण संपलं.

नंतर पत्रकारपरिषदेत उपराष्ट्रपतिपदाची निवडणुक, लोकसभा निवडणुका याविषयी प्रश्न विचारले गेले. त्याला NTR नी पुन्हा पुन्हा उत्तर दिले की, विरोधी पक्ष फक्त 'काश्मिर–प्रश्ना'ची चर्चा करायला एकत्र जमले होते. दुसऱ्या दिवशी हेच मुद्दे मांडून विरोधी पक्षीय मुख्यमंत्र्यानी राष्ट्रीय विकासपरिषदेच्या बैठकीचा त्याग केला. त्या दिवशीच फारुक अब्दुल्लाची बडतर्फीनंतरची पहिलीच पत्रकार परिषद होती. कर्नाटकभवनच्या गुबगुबीत पत्रकारकक्षात ही परिषद झाली. काश्मिरचं फारुक सरकार बडतर्फ करणं हा विरोधी पक्षाचा rallying point होऊ पहात होता. त्यामुळे या पत्रकारपरिषदेला महत्त्व प्राप्त झालं होतं. वही, पेन घेऊन, पत्रकारकक्षाचं दार लोटून आत शिरलो तेव्हा पत्रकारांच्या हातातल्या बशावर चमच्यांची किणकिण आणि फारुक अब्दुल्लांचा जरासा जड वाटणारा आवाज, दोन्ही ऐकू आले.

## पक्षांतराचा दर

'मला सत्तेवरून खाली खेचायचं अशी योजना करूनच गव्हर्नर जगमोहन याना श्रीनगरमध्ये पाठवण्यात आल. सर्व कट आधी पूर्ण करून मगच मला सांगण्यात आलं. तेव्हा घटनेनुसार विधानसभा विसर्जित करायचा माझा सल्ला गव्हर्नरला बंधनकारक होता. तो धुडकावून लावण्यात आला. २ जुलैला रात्री मला निरोप पाठवून राजभवनावर बोलवून घेतानाच श्रीनगरमध्ये लष्करी आणि निमलष्करी दलं तैनात करण्यात आली होती. हा लोकशाहीचा धडधडीत घात आहे!'

अशी सर्वसाधारण भूमिका त्यांनी मांडल्यावर प्रश्नोत्तरं सुरू झाली. 'डॉक्टर फारुक, शीख अतिरेक्यांशी तुमचे संबंध होते, काश्मिरमध्ये त्यांची शिबिरं भरवण्यात आली होती, त्याला तुम्ही स्वतः उपस्थित होतात असा तुमच्यावर आरोप आहे. याला तुमचं उत्तर काय ?'

'शिखांचे गुरुमत कॅम्प झाले; पण त्या शिबिरांचा उद्देश केवळ चांगले शीख घडवण हा होता, अतिरेकी तयार करण हा नाही. त्या शिबिरांमध्ये शस्त्रास्त्रांचं शिक्षण दिलं गेलं नाही.

'विमान पळविण्याच्या प्रकारावर काही भाष्य ?'

'मला मुद्दाम बदनाम करण्यासाठी काँग्रेसनच रचलेला हा बनाव आहे. विमानातून शस्त्रं श्रीनगरमध्ये गेलेली नाहीत, ती मुंबईपासूनच विमानातून आली होती.'

## १ जुलै, २ जुलै

'पण पंजाबातल्या सैनिकी कारवाईनंतर तुम्हाला काश्मिरमधल्या शीख अतिरेक्यांची यादी देण्यात आली होती. त्यावर काहीच कारवाई का झाली नाही ?'

'ही यादी माझ्या हातात १ जुलैला आली. २ जुलैला मी ती धन्यवादपूर्वक GM शहांच्या हातात ठेवली.' पत्रकारांमध्ये हास्याची एक मंद लकेर. लंडनमध्ये काही वर्षे वास्तव्य केलेल्या डॉ. अब्दुल्लांचे इंग्लिश चांगलंच प्रभावी होतं.

डॉ. अब्दुल्ला, जगमोहन यांच्या विरुद्ध तुम्ही कोर्टात जाणार का ?'

'का म्हणून ? माझी जनता हे माझं न्यायालय आहे.'

'पुढच्या निवडणुका लढवणार का ?'

'अर्थात. I will fight the hell out of elections !'

'पक्षांतरित आमदारांची काश्मिरमध्ये काय स्थिती आहे ?'

हसत फारुक अब्दुल्लानी सांगितलं, 'तुम्हीच येऊन पहा एकदा. ते जनतेसमोर येऊ शकत नाहीत. सतत लष्करी संरक्षणात असतात. त्यांच्या मालमत्तेची मात्र काही ठिकाणी जनतेनं नासधूस केलीय. त्याला मी जबाबदार नाही. पक्ष बदललेल्या या प्रत्येक आमदाराला निदान पाच लाख रुपये चारण्यात आलेत.' असं त्यानी अत्यंत गंभीरपणे सांगितल्या सांगितल्या 'फार स्वस्त दर आहे' असा एक आवाज उमटला आणि हास्याचा स्फोट झाला.

प्रश्नोत्तरांमध्ये फारुक अब्दुल्लाचा आवाज जरा जड वाटत होता. मधनं-अधनं काही प्रश्नांना त्यांनी अतिशय भावनाविवश होऊन प्रतिक्रिया दिली. उदाहरणार्थ, हा समारोपच पहा ना, 'आता माझ्याविरुद्ध प्रचाराच्या अनेक आघाड्या उघडल्या जातील; पण मी निकरानं झुंजणार आहे. प्रश्न इतकाच आहे की, माझ्या हातात प्रचारमाध्यमं नाहीत. ती माझ्या शत्रूच्या हातात आहेत. अशा वेळी मला तुमची साथ हवीय. तुमच्याकडून, पत्रकारांकडून न्याय हवा आहे...'

'माझी तुम्हाला अगदी पूर्ण परवानगी आहे, वाटेल तो प्रश्न मनमोकळेपणानं विचारा. माझ्यापरीनं मी उत्तर देईन. देवापाशी मी प्रार्थना करतो की, आताच्या या सडलेल्या राजकारणानं मला भ्रष्टवू नये. आज देशातली लोकशाही धोक्यात आहे, हे मी केवळ माझं सरकार पडलं म्हणून म्हणत नाही, तर खरोखरच लोकशाही संस्था कोसळत चालल्यात. न्यायव्यवस्थेचं उदाहरण घ्या. हायकोर्टाच्या जजेसच्या नेमणुकीत इतकं राजकारण आहे, काय सांगू तुम्हाला !'

इथे ते एकदम सावधान झाले. कायदामंत्री प्यारेलाल हांडू यांना त्यानी विचारलं, 'हा मुद्दा मी बोलावा का, का 'contempt of court' त्याबद्दल मी दोषी ठरेन ?' हांडूनी हो सांगितल्यावर-

'O. K. Forget it; पण लोकशाहीरचनेत काही पदं राजकारणातील हवीत. उदाहरणार्थ निवडणूकआयोग, गव्हर्नर, न्यायसंस्था.'

'अन् एक शेवटचा मुद्दा. कुठल्याही व्यक्तीची किंमत धर्मावरून ठरवू नका. हा हिंदु, तो मुसलमान असं पहाण्यापेक्षा सर्व भारतीय असं पहा. राष्ट्र, धर्माच्या वर आहे. शेवटी हे ध्यानात ठेवा की, कोणत्याही कारणासाठी आपण दुसऱ्याकडे बोट दाखवतो तेव्हा तीन बोटं स्वतःकडे रोखलेली असतात !'

पत्रकारपरिषद संपली. एकदम दार उघडून एक मळक्या-फाटक्या पायजम्यातलं पोर आत आलं, चेहऱ्यावरून ते काश्मिरी आहे हे कळत होतं. खुर्चीतून उठलेल्या फारुकसाहेबांच्या कंबरेला मिठी मारून ते पोर म्हटलं, 'साब, आपके साथ जो हुआ, बहुत बुरा हुआ. किती दिवसांपासून तुम्हाला भेटायचं होतं; पण दारावरचे पहारेकरी सोडत नव्हते-अब आप CM थे.' फारुकसाहेबानी त्याला खांद्याला धरून उभं केलं 'चिंता मत करो बेटे' म्हणून हसत भोवतीच्या पत्रकाराशी ओळख करून घेतली.

मी ओळख सांगितल्यावर ते म्हणाले, 'मी पुण्यात आलेलो आहे.' लक्षात होतं माझ्या. गेल्या वर्षी ८, ९ ऑगस्टला सुरेश कलमाडीचा 'युवक मेळावा' भरला होता. त्याची सभा स. प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झाली होती. रस्त्यावर फारुकविरोधी निदर्शनं, सभेत गोंधळ माजवायचा प्रयत्न आणि फारुक अब्दुल्लांचा खणखणीत आवाजात न डरता सभेला विचारलेला प्रश्न, 'आपमें से किसी के दिलपे लिखा है कि आप मुझ से ज्यादा हिंदुस्थानी है ?' पाठोपाठ टाळ्यांचा कडकडाट. व्यासपीठावर सरासरी वय वर्षे चाळीस ते पन्नासच्या दरम्यानचे युवक नेते. सर्व पहायला मी एक प्रेक्षक म्हणून उपस्थित होतो असे म्हटल्यावर त्यानी सोप्रे आमंत्रण दिले- श्रीनगरमध्ये घरीच या. निवांत बोलू !

Thank you. भेटायचेच होते. काश्मिर पुनर्वसन विधेयक, ३७० कलम, लंडनमधल्या काश्मिर लिबरेशन आर्मीच्या कारवाया, तुमचे शीख अतिरेक्यांशी संबंध - - याबाबतीत प्रश्न विचारायचे होते. पुण्याच्या सभेत 'आप मुझ से ज्यादा हिंदुस्थानी हैं ?' म्हणताना संपूर्ण सभेकडे दाखवलेल्या बोटामागे कोणती तीन बोटं स्वतः फारुकसाहेबांकडे रोखलेली होती ते मोजायचे होते. भेटू यात श्रीनगरमध्ये.

## स्वामी अग्निवेश : संन्यस्त आक्रीत

नदीचं मूळ आणि ऋषीच-संन्याशाचं कूळ विचारू नये असं म्हणतात; पण अमुक एक करू नये म्हटले की, नेमकी त्याविषयी सहज उत्सुकता निर्माण होते. त्यामुळे नदीचं मूळ शोधत साहसी यात्रा निघतात आणि स्वामी अग्निवेश मूळचे कोण, कुठले, राजकारणात का व कसे आले, कोणकोणत्या पक्षांतून त्यांचा प्रवास

झाला, सध्या नेमक काय करतात अशी सर्व उत्सुकता निर्माण होते. राजकारणाला आजपर्यंत वेशाच वावडं होत. त्यात हा स्वामी कोण, कुठला ?

थोडी–फार जी काही माहिती इकडून–तिकडून कळली ती एवढीच की, स्वामी अग्निवेश मूळचे आंध्रप्रदेशमधले. आर्यसमाजी संन्यासी. प्रवास करत, फिरत अखेर हरियाणात त्यांनी कामाला सुरुवात केली. ते काम होत वेठबिगारापासून कामगारांना मुक्ती मिळवून देण्यासाठीचा संघर्ष. अर्थातच राजकारणाशी संबंध अटळ ठरला. मग हा स्वामी निवडणुकानाही उभा राहिला. वेगवेगळे पक्ष अजमावून पहात राहिला. आता ते जनता पक्षात आहेत आणि 'बंधुआ मुक्ती मोर्चा'च काम करतात. सात जतरमतर रस्ता या जनता पक्ष कार्यालयाच्याच परसात त्याच घर–म्हणजे खोली आहे. तिसऱ्या मजल्यावर कार्यालय. 'तेथून 'संघर्ष जारी रहेगा' या साप्ताहिकाचं प्रकाशन जारी असतं. असं हे सर्व संन्यस्त आश्रीत !

म्हणून दिल्लीत असताना ठरवलं होतं की, स्वामी अग्निवेश याची भेट घ्यायचीच. त्यानीच दिलेल्या पत्त्यानुसार 'जनता पक्ष कार्यालय' विचारत निघालो,तर ओळीन 'मालूम नही' अशी उत्तर मिळू लागली. आधी ऊन माजलेल. त्यात हवेत नव्वद प्रतिशत आर्द्रता. शेवटी सरळ 'जतरमतर रोड' विचाराव म्हणून दोन महाविद्यालयीन वाटणारे युवक गाठले. तर त्यांनी पटकन विचारल, 'जनता पार्टी ऑफिस जाना है क्या ?' त्यांनी सागितल्यानुसार आलो. सदर वास्तूमध्ये अनेक उद्योगव्यवसायांची कार्यालय होती. त्यातच दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यावर राजकारण व्यवसायातल्या M/S जनता पार्टी & Co. याचं कार्यालय. दुसऱ्या मजल्यावर कार्यालयाबाहेर काचेच्या कपाटात जनता पार्टीची प्रकाशन रचून ठेवली होती. त्याची छपाई, शीर्षक देण्याची पद्धत, रंगसंगती अगदी फर्ग्युसन रोडवर मिळणाऱ्या रशियन प्रकाशनासारखी आणि आतल्या कार्यालयाची रचना थेट सरकारी कार्यालयासारखी. हा रम्य भूतकाळाची स्मृती जतन करायचा प्रयत्न मानायचा की, भविष्यकाळाची स्वप्नं पहायचा प्रयत्न ? त्या कार्यालयातल एक मोठ टेबल, डावीउजवीकडच्या फायली, वर कुरकुरत भिरभिरणारा पखा याखालून उत्तर आल, 'स्वामी अग्निवेशजी ऊपर मिलेंगे ! ऊपर म्हणजे तिसऱ्या मजल्यावर. चंद्रशेखरजी भेटण शक्य नव्हतं, त्याचे दुसऱ्याच 'स्वामी जोशी परिसवाद चालू होते. जनता पार्टीचे मोरारजीभाई अमेरिकेत सेमूर हर्षशी परिसंवादात गुतलेले, भिंतीवर चद्रशेखरजीचे फोटो, पोस्टर्स व्यवस्थित जागावर होते सरकारी कचेऱ्यांमध्ये इंदिराजीचे असतात तसे. तिसऱ्या मजल्यावरचं दृश्य वेगळ होत. तिथे संघर्षमय 'जारी रहेगा'चं सामान अस्ताव्यस्त पडलेलं होत. तेथे एका कार्यकर्त्याने नीट बोलून आश्चर्याचा धक्काच दिला. या दाढीधारी, तळमळीच्या वाटणाऱ्या कार्यकर्त्याला निवडणुकीचं तिकिट कधीही मिळणार नाही. अनोळखी अभ्यागताशी नीट बोलतो म्हणजे काय ! त्यानं सांगितल्यानुसार बिल्डिंगच्या मागच्या बाजूच्या खोलीत गेलो.

तिथे स्वामी अग्निवेशजी दोन कामगाराशी बोलत होते. बहुधा त्यांच्या प्रॉव्हिडंट फंडाविषयी बोलण चालल होतं. पोटभरल्या लोकांनी, पोट भरल्यानंतर, पोट भरलेल्या लोकांसाठी आत्मा, ब्रह्म, माया, ईश्वर वगैरे सांगण्यापेक्षा हे दृश्य काही वेगळंच होतं. स्वागताई, आनददायक होतं. त्यांचं बोलण संपल्यावर उठून नमस्कार केला. त्यानी मंदस्मित करत प्रतिसाद दिला. My God हा माणूस राजकारणात टिकणार कसा? निवडणूका नसतानाही हसून नमस्कार करतो, तेही सन्यासी असून. राजकारणी नरपुगवान कसा चेहरा कायम इस्त्री केल्यासारखा ठेवायचा असतो.

## 'हिट लिस्ट'वर नाव असूनही

त्यानी नमस्कार केला खरा; पण ओळखलेल दिसल नाही. म्हणून ओळख दिली. फेब्रुवारीमध्ये चंदिगढमध्ये आपली भेट झाली होती. तिथे तुम्ही म्हटला होतात, दिल्लीत आलात की, भेटायला या म्हणून. त्यानुसार भेटायला आलो आहे.

फेब्रुवारी महिन्यात प्रबोधिनीच्या पजाब सद्भावयात्रेच्या पूर्वतयारीसाठी पंजाबमध्ये गेलो होतो. तेव्हा चदिगढमध्ये DAV कॉलेजच्या सभागृहात 'पचनद शोध संस्थान'चा उद्घाटनसमारंभ होता. त्यानिमित्त सयोजकानी एक वादविवाद योजला होता. विषय होता, 'भारत एक राष्ट्र आहे काय ?' सर्वसाधारणपणे देशाच्या अन् विशेषतः पंजाबच्या वातावरणामुळे बुद्धिवंतांना असले प्रश्न भेडसावायला लागलेत. या परिसवादात श्री. प्रेम भाटिया, जस्टिस मेहता, जस्टिस रूप्रा, गुरुनामसिंग तीर असे बडेबडे बुद्धिवंत हजर होते. त्यातच स्वामी अग्निवेशजी बोलले. आधीच व्यासपीठावरच्या कडक पाश्चात्य वेशभूषामध्ये भगवी कफनी, फेटा उठून दिसत होता. त्यातूनच त्यांचं वक्तृत्व सुरू झालं आणि वेगळेपण अधिकच ठळक झाल. ते हिंदीत बोलते होते, इंग्लिशमध्ये नाही अन् ते हिंदीसुद्धा चंदिगढमधल्या रिक्षावाल्यालाही समजेल इतक सुलभ, सोपं. नाही तर काही वक्ते हरिवंशराय बच्चननाही समजणार नाही, अशा क्लिष्ट हिंदीत बोलून गरीब दरिद्रीनारायणाबद्दलचा कळवळा श्रोत्याना पटवून देत असतात. इथे कळवळा पटवून द्यायची आवश्यकताच नव्हती. थेट हृदयापासून येणारा प्रत्येक शब्द सहजपणे हृदयापर्यंत पोचत होता. आपण काही मोठे बुद्धिवत, अभ्यासू नाही, माझी भाषासुद्धा सभागृहाला शोभेशी डौलदार नाही, अशी सुरुवात करून स्वामीजीनी भारतीय राष्ट्रीयत्व मांडायला सुरुवात केली. संस्कृत वचनाची आतषबाजी नाही. साहित्यिक वाक्याची अदा नाही. वक्त्यासमोरच्या स्टॅंडवर डावं कोपर टेकवून उजवा हात कबरेवर ठेवत अ–राष्ट्रीय विचाराला आव्हान देताना त्याच्या वाणीला धार चढली. आधीच्या वक्त्यानी पजाब चढामोडीचा, शीख अतिरेक्यांचा आडून आडून उल्लेख केला होता. अग्निवेशजीनी थेट या प्रश्नाला हात घातला. शीख अतिरेक्यांच्या कारवाया हिंसक, द्वेषमूलक म्हणून चुकीच्या आहेत, भारताच्या एकराष्ट्रीयत्वाला आव्हान देणाऱ्या आहेत. त्यामुळे त्या निर्दयपणे मोडून काढायला हव्यात, असं ठामपणे मांडल, तेव्हा पंजाबमधल्या हत्यासत्रात आता उद्याचा बळी आपलाच अशी भीती बाळगणारी प्राध्यापक कावरी–बावरी झाली होती आणि 'हिट लिस्ट' वर नाव असलेले अग्निवेश हसत होते.

परिसवादानंतर त्याना भेटलो होतो. भगतसिंग-बलिदानदिवस ( २३ मार्च ) ते जालियनवालाबाग–स्मृतिदिन ( १३ एप्रिल ) या दिवसांमध्ये योजलेल्या 'पजाब सद्भावयात्रेची' माहिती त्यांना दिली होती. तेव्हा चर्चेत पाठीवर हात ठेवून स्वामीजीनी सांगितलं होतं, राष्ट्रवाद ही नुसती व्यासपीठावरनं बोलण्याची चीज नाही. सामान्य माणसासाठी, अन्यायशोषण दूर करण्यासाठी जर राष्ट्रवाद

उभा ठाकणार नसेल तर तो राष्ट्रवाद टाकाऊ आहे, नव्हे तो पराभूत ठरणार आहे.' हा त्याच्यातला 'बधुआ मुक्ती मोर्चा' चा लढवैय्या, 'संघर्ष जारी रहेगा' चा संपादक बोलत होता; पण मुख्य म्हणजे लढवैय्या, सपादक, संन्यासी आणि राजनीतिज्ञ यात कुठे द्वैत दिसत नव्हतं.

ह्या सर्व संदर्भ त्यांच्या ध्यानात आला असावा कारण नंतर त्यांनी नाव विचारलं, प्रबोधिनीचं सध्या काय चालू आहे विचारलं, दिल्लीत आधी इतर काही नेत्यांना, पक्षकार्यकर्त्यांना भेटलो होतो. त्यांतल्या बहुतेक जणांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नाची SSC परीक्षा देत असल्याप्रमाणं उत्तरं दिली होती. त्यात आपण देशस्थितीवर, गभीर समस्यांवर चिंतन मांडतो आहोत असं भान निदान बोलण्यात, चेहऱ्यावर जाणवत नव्हतं इथे मात्र आधी स्वामीजींनीच विचारलं, 'अच्छा, अपने तो खुद पंजाब में कार्य किया है। क्या देखा आपने? आपके कार्य का साराश क्या है?'

साराश? काय सागणार? डोळ्यांपुढून दृश्यं भराभर सरकत गेली—

## सारांश...इतनाही...

हिरवागार, समृद्ध पंजाब. 'सैतालिस की तरह बहुत खून-खराबा होगा, कोई नही रोक सकता' सांगणारा तगडा शीख शेतकरी पदयात्रेवरच्या एका छोट्या, ओसाडवजा गुरुद्वारात भेटलेला सुरिंदरसिंग सोदी. अमृतसरमध्ये रामदास लंगरच्या गच्चीवर भेटलेला सोदीचा बॉस–संत भिंद्रानवाले आणि संत लोंगोवाल, संत तोहरा, हरमिंदरसिंग सधू, भाई अमरिकसिंग...सर्व जण डोळ्यासमोरून सरकून गेले. 'ब्ल्यू स्टार' वागवणारं सुवर्णमंदिरही डोळ्यांपुढं. लष्करी कारवाईला 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' हे नाव कोणाला सुचलं असेल बरं? नानकनिवासात किंवा रामदास सरायमध्ये आम्ही राहिलो होतो तेव्हा रात्री आवर्जून गॅलरीत येऊन उभे रहायचो. तिसऱ्या मजल्यावरून रात्रीच्या शांततेत आकाशाच्या घुमटाखाली विसावलेल सुवर्णमंदिर परिसर दिसायचा. त्यात बरोबर मध्यभागी चांदण्यात चमकणारं प्रत्यक्ष सुवर्णमंदिर. सुवर्णमंदिराच्या कळसावर एक निळा दिवा लावलेला असायचा. अंधारात, अस्वस्थतेत तो मंद प्रकाश सुवर्णमंदिराच्या कळसावरून खाली स्रवताना दिसायचा. खरोखरच एक निळा, मुलायम तारा सुवर्णमंदिरावर पाखर धरतोय असं वाटायचं. अन् मग त्याखालच सारं 'विध्वस–पर्व' आठवून सुन्न व्हायला वाटायचं. त्या 'ब्ल्यू स्टार'चं आता ऑपरेशन झालं.

'साराश इतनाही, की फुटीरतावादाला शीख जनतेचा पाठिंबा नाही. सर्वसामान्यपणे शीख अजूनही स्वतःला अभिमानपूर्वक भारतीय मानतात; पण सुवर्णमंदिरावरच्या लष्करी कारवाईबद्दल मात्र तीव्र असंतोष दिसतो.'

मुलाखत मी स्वामीजींची घेत होतो की ते माझी? कारण प्रश्न ते विचारत होते. मी उत्तरं शोधायची धडपड करत होतो. आता त्यांनी विचारलं 'असतोष उन्हें किस ओर ले जा रहा है? राष्ट्रीय एकता की तरफ या उससे दूर?'

## अब क्या होगा? वही...

प्रश्नाचं उत्तर मात्र माहीत होतं. ते खेदजनक होतं. लष्करी कारवाईच्या पाठोपाठ शीख सैनिकांचे विद्रोह, भारतभरच्या वेगवेगळ्या शहरांमधल्या शीख नागरिकांची हिंसक–अहिंसक निदर्शनं; खुशवतसिंगसारख्या पत्रकारानं किताब परत करणं, बीबीसीवर जगजितसिंग चौहान याचं भाषण. विदेशातल्या शिखांच्या मेळाव्यामध्ये 'खालिस्तान' स्थापनेच्या प्रतिज्ञा, विमानअपहरण, राष्ट्रध्वज पायाखाली तुडवणं, जाळणं आणि हे सर्वच रंग स्पष्ट करणारी पंजाबमधून आलेली पत्रं. हे सर्व काय दर्शवितात? आजच दुपारी श्री. तपस्वीबरोबर काश्मिर आणि पंजाबविषयी चर्चा करत बसलो होतो. तपस्वी म्हणत होते. त्या त्या प्रांताच्या, जमातीच्या काही तक्रारी असतीलही. त्या सोडवल्या जायलाच हव्यात; पण कोणत्याही परिस्थितीत 'भारत मुर्दाबाद' हे कसं खपवून घ्यायचं? पंजाबातले शीख अतिरेकी आणि काश्मिरमधल्या देशद्रोह्यांचं संधान आहे. समजा काश्मिर खोऱ्यातल्या जनतेच्या काही मागण्या असतील; पण त्यासाठी एकदम 'पाकिस्तान झिंदाबाद?' तिथल्या शीख, मुसलमानांनी एकत्र येऊन श्रीनगरमध्ये निदर्शनं केली. त्यात घोषणा होत्या 'शीख–मुस्लिम भाई भाई हिंदु कौन कहाँ से आई!' भारतीय प्रवाशांना पकडून श्रीनगरमध्ये बेदम चोपण्यात आलं. श्रीनगरमधल्या रीगल चौकात घोषणा रंगवलेल्या होत्या. Indian dogs go back! आजपर्यंत एवढच ऐकून होतो, म्हणे की विदेशांतल्या काही सार्वजनिक ठिकाणी बाहेर पाट्या लावलेल्या असायच्या 'Dogs & Indians not allowed.' आता भारतातही?

तर आमची ही चर्चा चालू असतानाच एक सरदार पत्रकार तपस्वींशी बोलायला आले. दोन–चार इकडच्या–तिकडच्या हवापाण्याच्या बाता झाल्यावर श्री. तपस्वींनी त्यांना विचारलं 'कैसा हाल है?' उत्तर आलं, 'अब क्या है, हमारे लिए तो सब बुरा हाल है.'

'अच्छा! अब क्या होगा?'

'देखते रहना, वही होगा जो मैंने पहले कहा था! वही हो के रहेगा.' सरदारजी निघून गेले. नंतर तपस्वींनी ओळख सांगितली ते एका महत्त्वाच्या इंग्लिश वृत्तपत्राचे दिल्लीतलं Special correspondent होते. वृद्ध आणि समजूतदार. त्यांनी पूर्वी गप्पांमध्ये तपस्वींना सांगितलं होतं की कोणत्याही कारणानं आर्मी सुवर्णमंदिरात घुसली तर खालिस्तान झालंच म्हणून समजा. आता ते सरदारजी सांगत होते 'वही हो के रहेगा! दिल्लीतल्या गुरुद्वारा बांगलासाहेबमध्ये भिंद्रानवालेंची पोस्टर्स आणि भारत सरकार मुर्दाबाद घोषणा झळकत होत्या. तिथे रंगवलेली वाक्यं होती—

१३ एप्रिल १९१९ जालियनवालाबाग.

५ जून १९८४–सुवर्णमंदिर.

किंवा

१९१९–जनरल डायर

१९८४–श्रीमती गांधी!

भारतीय लष्कराचा धिःक्कार केलेला होता.

त्यामुळं आपलं म्हणणं खोटं ठरावं अशी मनोमन इच्छा धरून स्वामीजींना सांगितलं 'फिलहाल तो असंतोष उन्हें राष्ट्र से दूर लिये जा रहा है... असं वाटतं.' स्वामी अग्निवेश जरा विचारात पडले. मग सावकाश ठामपणे म्हटले 'सध्याच्या वातावरणात शीख समाजाचा मोठा हिस्सा काही ऐकून घ्यायलाच तयार नाही. ही

धर्मांधता आहे. They are not open to reason. आणि धर्मांधता, मग ती कोणाचीही असो–हिंदूंची, मुसलमानांची, ख्रिश्चनांची कोणाचीही, बहुत बुरी चीज है. माणसाचा राक्षस करते ती.'

चर्चेत Indian Express चे पत्रकार विनयराव हर्डीकर उपस्थित होते. स्वामी अग्निवेशजींनीच भारतभर त्यांच्या संपर्कात असलेल्या काही विधायक कार्यकर्त्यांची– 'रॅडिकलस्'ची एक बैठक बोलावली होती. त्या बैठकीला सुरेंद्र मोहन, शंकर नियोगी, शरद जोशी, अरुण शौरी वगैरे उपस्थित होते. आसामच्या विद्यार्थ्यांनाही निमंत्रण होतं; पण ते दाखल झाले नव्हते. त्याच बैठकीच्या निमित्तानं विनयराव हर्डीकर दिल्लीत–अग्निवेशजींकडे होते. ते म्हणाले 'शीख बुद्धिवादी वर्गसुद्धा स्पष्ट विचार आपल्या समाजासमोर मांडत नाही, उलट त्याच्या विचारातही अतिरेक्यांना जवळची छटा असते ही धोक्याचीच बाब आहे. चांगले चांगले विचारवंत, खुशवंतसिंगच पहा ना, पण धर्म, सुवर्णमंदिर म्हटलं की विचार विसरतातच.'

या बाबतीतला एक गंमतशीर अनुभव पदरी जमा होता. जून८३ मध्ये झालेल्या प्रबोधिनीच्या पहिल्या 'पंजाब सद्भावयात्रेत'काही कार्यकर्त्यांनी चंदिगढमधल्या एका कम्युनिस्ट सरदार पुढाऱ्याची पंजाब समस्येवर मुलाखत घेतली होती. त्यानं थोडक्यात सर्व 'अतिडावा' विचार typical साम्यवादी आक्रमकपणे मांडला होता. भारत हे एक राष्ट्र नाहीच, अनेक राष्ट्रांचा तो एक संघ आहे, प्रत्येक nationality ला स्वतःचे काही हक्क आहेत... वगैरे वगैरे. तिथे एका खट्याळ पोऱ्यानं कॉम्रेड सरदारजींना विचारलं, 'साम्यवादी तत्त्वज्ञान तर धर्माला अफूची गोळी मानतं आणि तुम्ही साम्यवादी असून शिखधर्मानुसार 'क' कार कसे काय बाळगलेत?' तेव्हा त्यांनी उत्तर दिलं होतं, 'शीखधर्म साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या वर आहे.' झटक्यात त्यानं बेलूरमठात न चुकता रोज जाणाऱ्या मार्किसस्ट कार्डहोल्डरशी आत्मिक नातं जोडलं की!

विनयराव पुढे सांगत होते. 'एक वेळ लष्करी कारवाईबद्दलची अस्वस्थता आपण समजू शकतो, एका समाजाच्या धार्मिक भावनांना धक्का लागल्यास त्यांना आपण समजावून घ्यायला हवं; पण त्यांची प्रतिक्रिया म्हणून राष्ट्रविरोधी भूमिका समजण्याच्याच पलीकडची आहे. खुशवंतसिंगचा मुलगा राहुलसिंग याला मी विचारलं की हिंदू मनात शिखांबद्दल अजूनही आदर आहे. सरदार म्हणजे रफ, सरदार म्हणजे डेअरडेव्हिल, कष्टाळू, देशभक्त अशीच भावना तुमच्याबद्दल हिंदू मनात आहे. त्या भावनेला या असल्या वागण्यानं केवढा धक्का बसतोय कल्पना आहे का तुम्हाला?'

स्वामीजींनी सांगितलं 'सर्व समस्येच्या मुळाशी जाऊन शोधायला हवं. मुळात हे निर्माण का झाले तेच सापडायला हवं. राजकारणापेक्षा देशकारण महत्त्वाचं आहे. हे सर्व प्रश्न इंदिराजींना विचारायला हवेत.' आवाज मृदु होता. शब्द सावकाशपणे निःसंग बाहेर येत होते. तरीही उत्तरानं समाधान होत नव्हतं. उपाय काय? याचं ठामपणे उत्तर देणार कोण? कोणी तसं परीक्षेच्या गाईडमधल्यासारखं निश्चित उत्तरं देईल ही अपेक्षा बाळगणंच चूक आहे. ज्याची त्यानं आपापल्या मार्गानं उत्तर शोधायचा प्रयत्न करायला हवा. मग कदाचित असं होईल की, कोणत्या तरी वळणावर सर्व मार्ग एकत्र भेटतील.

तोवर स्वामी अग्निवेश ही एक व्यक्ती नव्हे, मार्ग म्हणून डोळ्यांसमोर ठेवायला काय हरकत आहे? सर्वसंगपरित्यागी संन्यासी. हा संन्यास रजनीशी पद्धतीचा नाही. तिथे भगवे कपडे ही फक्त लेटेस्ट फॅशन आहे.अग्निवेशांची भगवी कफनी म्हणजे अंगावर सतत जळता निखारा वागवणं आहे. स्वतःसाठी काही करायचं नाही, तरीही समाजविन्मुख व्हायचं नाही, असा निःस्वार्थ, उपभोगशून्य संन्यस्त सत्ताधारींचा एक वर्ग हे अशक्यप्राय स्वप्न आहे काय? पण थेट प्लेटो आणि मार्कस्ऑरेलियसपासून राधाकृष्णन् यांच्यापर्यंत 'Philosopher king' तत्त्वज्ञ सत्ताधारींचं वर्णन करण्यात सर्वांच्या लेखण्या झिजल्यात. आर्य चाणक्य राजाला 'उपभोगशून्य स्वामी' म्हणतो. विवेकानंद सांगतात,–यापूर्वीच्या भारतात शेकडो ऋषी झाले. यापुढच्या भारतात हजारो ऋषी होतील. यावर श्रद्धा ठेवा जो. जशी श्रद्धा ठेवतो तसा होतो.' योगी अरविंद म्हणतात, एक काळ असा असतो की सर्व योगी, संन्यासी समाजापासून दूर एकांतात साधनेत निमग्न असतात. योग्य वेळ येताच ते पुन्हा समाजात परततात.' शतकानुशतकाच्या जीवनविन्मुख अध्यात्मानंतर दयानंद–विवेकानंद ते स्वामी अग्निवेश हे अरविंदांनी मांडलेल्या प्रक्रियेचंच रूप मानायचं काय? अन् आज जिथे सर्वच आशावादी, ध्येयनिष्ठ जाहीरनामे सिंहासनाच्या पायरीपाशी पोचले की भोवळ येऊन पडतात तिथे संन्यस्त राजनीतिज्ञाकडून काही आशा बाळगणं मृगजळ आहे काय? एवढं खरं की त्रिवेंद्रम्‌मधल्या एका विराट सभेत स्वामी चिन्मयानंद म्हटले होते, 'देशातलं राजकारण आहे असंच राहिलं तर समाजधारणेसाठी Swamiji may have do beg for votes. □


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.



# लष्करी राजवटी : आपण कुठे आहोत ?

संजय संगवई

देशात भूक, सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांची घुमश्चक्री चालू असते. कोणतीही सरकारे टिकत नाहीत. सरकार उलथण्याचे, तीन दिवस दुसरे सरकार टिकण्याचे प्रकार चालू आहेत. मोर्चे बांधून लोक शहरातल्या रस्त्यांवर झेंड्यांचे समुद्र घेऊन उभे असतात. जाळपोळ, लूटमार, कट, संशय, अकार्यक्षमता यांना ऊत आलेला आहे–अशा वेळी सर्व शस्त्रास्त्रसंपन्न एखादा जनरल, ब्रिगेडिअर, कर्नल मोजक्या लोकांनिशी सत्ता ताब्यात घेतो.

सर्वच गोंधळलेले असल्याने कुणी विरोध करायला धजावत नाही. लष्कर म्हणजे पक्षातीत, कार्यक्षम, कडक शिस्त ! आता गुन्हेगारांना फटके बसणार, काळाबाजारवाले तुरुंगात जाणार, बडबड करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांची बोलणी बंद होणार; धान्यसाठा–पुरवठा व्यवस्थित होणार–झटपट सर्व कामे होणार–लोकहो, आबादी–आबाद होणार ! रिक्षावाले, झोपडपट्टीवाले, बेकार, घरच्या बायका, कचेरीतले कारकून, पोलीस सगळे नि:श्वास सोडतात...

तो लष्करशहा निवडणुका घेण्याचे आश्वासन तरी देतो–नसता सरळ सांगतो–लोकशाही–बिकशाही सब झूट आहे. अरे, देश चालायला पाहिजे की नाही ? आधी कारभार चालवू–नंतर बाकीचं बघू !

' We want Government that works ' ही भावना पसरविली जाते. सारे कसे निर्धास्त होतात. एखादा कर्नल–मेजर फार मवाळ असतो. अगदी बापासारखा. लोकांना उपदेश करतो, हलकेच समजावून सांगतो. एखादी गडाफिशाही स्वत:ला प्रेषित समजते. जगात नवं राज्य आणण्याची ग्वाही देते. एखादा सुहार्तो काही न बोलता आपला वट चालवतो.

जनरल झिया हळूहळू अध्यक्ष झिया होतात, झिया–उर–रहमान बांगला नॅशनल पार्टी काढतात, इर्शाद जनदल तयार करतात. ' सार्वमत ' घेतात–पकड पक्की करतात ! एखादा अयूबखान येतो न् भराभर आबादी–आबाद व्हायला सुरुवात होते. खटाखट नव्या सुधारणांसाठी समित्या–योजना तयार होतात; आफ्रिकेतील बिराण्या देशात प्रत्येक लष्करशहा कार्यक्षम सरकारचे आश्वासन ( जगाला ) देतो !

मग ब्रिटन–अमेरिका–रशिया सरसावतात. हा लष्करशहा कोण ? त्याच्यापासून काय फायदा करून घेता येईल ? येणारा नवा राजा संपूर्ण बदलाचा झेंडा मिरवीत येतो. तो क्रांतिकारी (डावा–उजवा–वरचा–खालचा) असतो. काहीही होवो त्याला 'टोटल चेंज' पाहिजे असतो. तोही फटाफट ! त्याला उसंत नसते. तो पुढे जे जे काही करेल ते, लोकहो, फक्त तुमच्यासाठीच !

मग हळूहळू नेहमीप्रमाणे परिस्थिती होते काळाबाजारवाले, चोर, गुन्हेगार, भांडवलशहा फोफावतात. धान्य–रॉकेलचे भाव आकाशाला भिडतात...काही करण्याची-बोलण्याची-विचार करण्याचीही चोरी! दबन–दबून किती दिवस दबणार?.. एखाद्या चळवळीचा उद्रेक... लष्करशहा जाणार...दुसरा येणार ..चक्र चालूच !

एखाद्या भारतात तसं काहीच नसतं. मात्र पूर आला, सैन्याची मदत; दंगल झाली, सैन्याला पाचारण; तणाव असला ' सैन्याची गस्त रात्रंदिवस चालू ! ' आसाममध्ये निवडणुका घ्यायच्यात–सैन्याच्या बंदोबस्तात (कडक) निवडणुका; पंजाब–पंजाब– सैन्याचे प्रशासन !...दुसरा उपायच नव्हता !...अपरिहार्यच होते ! अपरिहार्यच होते– दुसरा उपायच नव्हता......!

लष्करी सत्ता भारतात कदापी येणार नाही म्हणतात. मात्र भारताच्या दोन्ही बगलांत परंपरागत लष्करशाही चालू आहे. ती का ? पाकिस्तानातही घटना होती, जागृत राजकारणी होते, वृत्तपत्रे होती मग आयूबखान ते झिया असा प्रवास का ?

एक बारिकसे उदाहरण बघा.

पाकिस्तान १९७७ च्या जुलैमध्ये गोंधळ, संघर्ष, अनिश्चितता होती. पतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांची पीपल्स पार्टी त्या वेळच्या निवडणुकीत जिंकली. मात्र या निवडणुका गैर आहेत, फसव्या आहेत या कारणासाठी विरोधी पक्षाच्या पाकिस्तान नॅशनल अलायन्सने आंदोलनच सुरू केले होते. जवळजवळ गृहयुद्धच पेटले होते. धर्मवेड्या, राष्ट्रवादी, जहाल, पुरोगामी, डाव्या अशा शक्तींना पंतप्रधान भुट्टोविरुद्ध लढण्याला निमित्त मिळाले. कोणत्याच बाजूने पडते स्वीकारले नाही. भुट्टोंनी पश्चिम पाकिस्तानातील बलुच-बंडखोरांना आवर घालण्यासाठी बलुचिस्तान सैन्याच्या ताब्यात दिला.

त्या वेळी भुट्टोंच्या पक्षातील एका वरिष्ठ सल्लागाराने एक अहवाल तयार केला. त्यात म्हटले होते...

Power has its own taste, and in the course of time the army officers, especially in the middle ranks, start relishing power in the form of searches, arrests and interrogation which gives them feel of authority. They also develop contempt for the ways of the politicians and civil servants, and a general impression in the army circles starts gaining ground that everybody in the field of civil administration and politics is corrupt and incompetent... The impression amongst the army junior officers that the army is panacea for all ills is again gaining ground...'

लष्करी सत्तेचे हे कारण आहे.

–आणि पाच जुलै १९७७ मध्ये झिया–उल–हक यांच्या नेतृत्वाखाली लष्करी उठाव झाला. ती लष्करी सत्ता आजपावेतो आहे. १९५८ मध्ये सुद्धा अशाच राजकीय अस्थिरतेच्या काळात अयूबखानने नोकरशाहीच्या साह्याने सत्ता काबीज केली.

## गरीब देशांचा मक्ता

लष्कराची सत्ता ही बहुधा तिसऱ्या जगातील गरीब राष्ट्रातच आढळते. लष्कराची सत्ता याचा अर्थ लष्कर प्रत्यक्ष सत्तास्थानीच पाहिजे असा नाही. घटनात्मक सरकारला पाठिंबा देणे, एक सरकार बदलून दुसरे आणणे, सत्तास्पर्धेच्या खेळीत 'हमभी है' म्हणून एखादा हुकूमी पत्ता हातात ठेवणे, सत्ताधाऱ्यांवर अकुश ठेवणे, अशा एक ना अनेक प्रकारांनी आजवरच्या इतिहासात लष्कराचा राजकारणात सहभाग आढळतो.

हा लष्करी प्रभाव म्हणजे गरीब राष्ट्रांचाच मक्ता मुळीच नव्हे! फ्रांस, जर्मनी, जपान, स्पेन या राष्ट्रांमध्ये सुद्धा दुसऱ्या महायुद्धापूर्वी लष्करी नियत्रण होतेच. मात्र राज्यशास्त्रातले एक प्रगाढ अभ्यासक एस्. ई. फायनर यांनी या सबधात काही गोष्टी निदर्शनास आणून दिल्या आहेत.

'१९५८ ते १९६९ दरम्यान लष्कराने बावन्न देशांत सत्ता ताब्यात घेतली. अठ्ठ्याऐंशी वेळा असे लष्करी उठाव झाले. यामध्ये ३८ आफ्रिकी देशांपैकी २३ देश, २६ पैकी १४ आशियाई व लॅटिन अमेरिकेतील ११ देश यांचा समावेश आहे. जी राज्ये दीडशे वर्षांपूर्वी निर्माण झाली, त्यांपैकी वीस टक्के देशांमध्येच असे उठाव झाले. मात्र गेल्या पंधरा वर्षांत निर्माण झालेल्या देशांपैकी ५२ टक्के देश लष्करापुढे बळी पडले.

'यामध्ये गरीब देशांचाच जादा भरणा होता. त्या काळात लष्करशाहीखालील ४५ देशांमध्ये दरडोई उत्पन्न वर्षाला ३३० डॉलर्सपेक्षा कमी होते. दरडोई नऊशे डॉलर्सपेक्षा कमाई असलेल्यांपैकी फ्रान्स व चेकोस्लोव्हाकिया यातच लष्कर आले.'

आर्थिक विपन्नता, सांस्कृतिक परंपरांचा व राजकीय इतिहासाचा अभाव, राजकीय जागृती नसलेला देश– या कारणामुळे लष्करी प्रभाव वाढत जातो व शेवटी लष्करालाच सत्ता घ्यावी लागते.

## लष्कर का सरसावते ?

कोणत्याही राष्ट्रात लष्कराच्या हस्तक्षेपाची शक्यता कितपत आहे ते दोन गोष्टींवर अवलंबून असते. एक तर त्या राष्ट्राची राजकीय–सामाजिक परिस्थिती आणि दुसरे म्हणजे प्रत्यक्ष लष्कराची क्षमता.

'पाणी खालोरा धावे'– म्हणजे खोलगट ठिकाणी पाणी जाते असे म्हणतात. साहजिकच जिथे काही उणं असेल ते भरून काढण्यासाठी दुसरीकडची हवा प्रचंड झंझावाताच्या रूपाने येते. भारतासारख्या किंवा आफ्रिका–आशियामधील देशांमध्ये राजकीय–सामाजिक स्थितीच अशी असते की तिथे एखादी प्रबळ केंद्रीभूत सत्ताच येऊन ठेपते.

नुकत्याच स्वतंत्र झालेल्या, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांचं एक वैशिष्ट्य असतं. इथे जनतेच असं काही मतच नसतं. राजकीय निर्णयप्रक्रियेत लोकांचा सहभाग नसतो. जे काही वरून आदेश येतील ते निमूटपणे पाळण्याची परंपरा किंवा वृत्ती अशा देशात असते. याचा परिणाम असा होतो की, राजकीय भवितव्य, मत–मतांतरे, पर्याय याविषयी जाणीव व त्या जाणिवेतून बनविली गेलेली मते नसतात.

बर, अशी मते संघटित स्वरूपातही फारशी नसतात. म्हणजे विविध संघटना, सस्था या स्वरूपात–कामगारसघटना, सहकारी सस्था, निश्चित राजकीय पक्ष या देशात नसतात आणि असलेच तर फारच तकलादू असतात.

राजकीय सत्तेचे हस्तांतरण कसे व्हावे याविषयी काही निश्चित नियम व त्याला लोकमताची जागृत संमती, त्याविषयी एकमत,

आपल्या देशातील राजकीय संस्कृती बव्हंशी 'आज्ञाधारक' या सदराखाली येते. स्वतः होऊन कोणती जबाबदारी नको, स्वतः निर्णय घेण्याची, ते अंमलात आणण्याची आपल्याला धास्तीच आहे. वरून काय त्या आज्ञा याव्यात–आपण निमूटपणे पाळाव्यात, एक प्रेषित, पंथ पकडून, डोळे मिटून, निर्धास्तपणे त्याच्या मागे जावे, हे आपले दिव्य आध्यात्मिक परंपरेचे जीवनसूत्र ....

सत्तेवर असलेल्या व्यक्तीला किंवा गटाला लोकांची अधिमान्यता ( लेजिटिमसी ) या दोन गोष्टीना जिथे वाव नाही, तिथली पूर्ण राजकीय व्यवस्थाच विस्कळित–डगमगती असते.

प्रो. फाइनर यांच्या मते देशातील सत्तेच्या व राजकीय व्यवस्थेच्या स्वरूपाबद्दल जनतेतील मतैक्य (Consensus) आणि अशी मते संघटित असणे–या दोन्ही गोष्टी नसलेली राष्ट्रे प्रदीर्घ अशा संकटकालीन परिस्थितीत असतात ( Latent and chronic crisis ) अमेरिकेसारख्या देशात या दोन्ही स्थिती ( मतैक्य व संघटन ) आहेत. ती परिपक्व राजकीय व्यवस्था आहे. लोकानी स्वीकारलेल्या राजकीय व्यवस्थेला कोणीही धक्का लावू पाहिल्यास *युरोप व अमेरिकेतील संघटित जागृत–संवेदनशील जनमत खवळून* उठेल. इथे लष्करी हस्तक्षेप किंवा नियंत्रणाची शक्यताच नाही

काही देशांत लोकमत जागृत असते; पण ते पुरेसे संघटित नसते. तिथे हे जनमत एकदम टोकाचे असण्याची शक्यता असते. ही संघर्षाची वेळ आहे. अशा संघर्षाच्या वेळी लष्कर आपण होऊनच सत्ता ताब्यात घेऊ शकते. ते सत्ताधाऱ्यांवर दडपण आणून, ब्लॅकमेल करून आपल्या इशाऱ्यावर सरकार नाचवू शकते. रशियातील लष्कर आपला प्रभाव अशा रीतीने दाखवते. १९५९ मध्ये त्यांनी सत्ताधारी कुश्चेववर असेच दडपण आणले होते.

जगातील बहुतेक ( गरीब वगैरे ) देशांत एक तर लोकमत जागृत नसते आणि असलेच तर ते अत्यंत विखुरलेले, निष्प्रभ असे असते. आपसातच दुफळी असलेले गट, कुठल्याही बाबतीत मतैक्य नाही. अशी परिस्थिती असते. अशा वेळी सरकारला लोकमतावर टिकून राहणे अशक्यच असते. ते मग स्वत: होऊन लष्कराच्या पाठिंब्यावर जगते. *सीरिया, तुर्कस्तान, अर्जेंटिना अशासारख्या* देशात लवकरच कोणत्या सरकारला पाठिंबा द्यायचा किंवा खाली खेचायचे ते ठरविते कधी लष्कर स्वतःच सत्ता ताब्यात घेते. लष्कराच्या सत्ताग्रहणाला विरोध करायला देशात नागरी संघटनाचे भक्कम असे जाळे नसते. लोकांत् राजकीय जागृती कदाचित असेलही; पण ती संघटित होत नाही. पाकिस्तानसारखी थोडीफार राजकीयदृष्ट्या जागृत राष्ट्रे लष्करी सत्तेला थोपवू शकत नाहीत, याचे कारण हेच आहे. अनेक तऱ्हेचे राजकीय विचार तेथे प्रसृत आहेत. लोक लष्करशाहीविरुद्ध आंदोलनही करत आहेत मात्र अजूनही यश का येत नाही ? जागृत लोकमत खऱ्या अर्थाने एका विशिष्ट तत्त्वावर संघटित होत नाही ही तिथली अडचण आहे.

शेवटी काही राष्ट्रात जनमत नावाची चीजच नसते. म्हणजे लष्करी हस्तक्षेपाची तिथे गरजच नसते. लष्कराला आपोआप महत्त्व प्राप्त होते. मध्यआफ्रिकेतील काही राष्ट्रे या प्रकारात मोडतात.

मात्र अनेकदा असही घडतं की, एखादे राष्ट्रच लष्कराच्या पुढाकाराने किंवा कारवाईने स्थापन झालेले असते. लोकांना हा इतिहास विसरायचा असला तरी ते लष्कर कसे विसरणार ? तुर्कस्तान; सीरिया, इराक यांसारख्या देशांत लष्कराला परंपरागत महत्त्व होते, राजकारणात स्थान होते.

या सर्व वर्णनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, ज्या देशात सत्ताधारीवर्गाशच लोकमताचा आधार नसतो, जिथे सरकारच अशा आधाराविना किंवा आपसातील लाथाळीने डळमळित झालेले असते, तिथे लष्कराचा प्रभाव जास्त असतो.

## लष्कराचे वेगळेपण

लष्करी सत्ता येण्यासाठी अनुकूल वातावरण असले (किंवा नसले) तरी खुद्द लष्कराच्या काही वैशिष्ट्यांमुळे ते सत्ता ताब्यात घेऊ शकते किंवा लोकांनाच ते हवे असते.

लष्करी संघटनेची पाच वैशिष्टये सांगितली जातात – अतिशय केन्द्रीभूत रचना, त्यामुळे पदनिश्चिती (hierarchy) ठरलेली असते. कडक शिस्त, पूर्ण संघटनेतील संपर्कव्यवस्था अतिजलद व कार्यक्षम असते– आणि एकतेची भावना ( espirit de corps ).

याहीपेक्षा लष्कराकडे सर्वसामान्य जनतेचा बघण्याचा दृष्टिकोनच वेगळा असतो. याबाबत ॲलन बॉल यांनी छान वर्णन केले आहे. ते म्हणतात, '... They do lead to the assumption that in some way military is above the sectional vested interests, conflicts in the political process, and that the military is the embodiment of the national interests.. disciplined conception of national interest...and only military is capable of implementing the policies to protect that interest.'

'This is partly the consequences of the role that the military play in the crisis of war and the threat of foreign invasion... Defeats can be blamed on convinient scapegoats such as ethnic or political minorities.'

लष्कराकडे शस्त्रास्त्रांची सर्वांत जास्त मक्तेदारी असते ही गोष्टही लक्षणीय आहे. हिंसा–व्हॉयलन्स ही राजकीय सत्तेची मक्तेदारी असते.

'When we speak of political system, we include all interactions, which affect the use or threat of use of legitimate physical force.'

( Almond & Powell–
'Comparative Politics'–P. 10 )

याचा संबंध राजकीय व्यवस्थेशी असला तरी Physical force या घटकाचा सर्वांत जास्त वाटा लष्करापाशी असतो, हे स्पष्ट आहे. त्यानुसार लष्कराचा राजकीय क्षेत्रात प्रवेश संकल्पनेच्या दृष्टीनेदेखील सहज शक्य आहे !

लष्कराच्या क्षमतेबरोबरच, लष्कराची सत्ता काबीज करण्याची उद्दिष्टे काय आहेत, तशी लष्कराची वृत्ती आहे का हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. सर्व देशातील लष्कराची रचना जरी समान असली तरी प्रभाव किंवा सत्ता मिळविण्याची उद्दिष्टे एक तर पूर्णपणे राष्ट्रहितासाठी किंवा एखाद्या व्यक्तीच्या, वर्गाच्या आकांक्षेसाठी प्रादेशिक, *वांशिक गटासाठी असतात.* लष्करातील मनुष्यबळ, त्याची सामाजिक पार्श्वभूमी त्यातील वंश, जात, वर्ग यांचे प्रमाण यावरून लष्कराची कृती ठरते.

पण लष्करी सत्ता म्हणजे लष्कराने बंड करून प्रत्यक्ष सरकार चालविणे एवढाच अर्थ नाही. लष्कर आणि नागरी सरकार यांच्या-

तील हा संबंध अनेक प्रकारचा–गुंतागुंतीचा असतो... लष्कराच्या प्रत्यक्ष कारभाराचाच विचार करायचा झाल्यास लॅटिन अमेरिका व आफ्रिकेतील काही देश सोडता लष्करी सत्ता इतरत्र नाही असेच म्हणावे लागेल.

मात्र प्रत्यक्ष लष्करी सरकार असण्यापेक्षा लष्करी नेतृत्वाचा राष्ट्राच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव असणे हा लष्करशाहीचा प्रमुख निकष आहे.

आरंभी सत्ता ताब्यात घेऊन नंतर लष्करातील अधिकारी अधिकाधिक नागरी होत जाणेही शक्य असते. ( Civilianized regime.)

पाकिस्तान किंवा बांगलादेशात हेच आढळते. झिया–उल–हक किंवा बांगलाचे लेफ्टनंट जनरल इर्शाद यांनी 'लष्कर' म्हणून सत्ता ताब्यात घेतली तरी हळूहळू ते माणसाळल्याप्रमाणे 'सत्ताळले' जातात. ते लष्करी प्रमुखाऐवजी राष्ट्रपती अध्यक्ष म्हणून वागू लागतात. मंत्रीमंडळ बनवतात ! ते कधीकधी लष्करी बजेटही कमी करतात.

'All politics is power politics,' 'Decision making power is political power.' तसेच हॅरॉल्ड लासवेलचे राजकारण म्हणजे who gets what, when and how ? अशासारखा सूत्रबद्ध राज्यशास्त्रीय सिद्धांत पाहिले असता लष्कराची सत्ता ही शेवटी राजकीय सत्तेत परिणत होत जाणे साहजिकच आहे.

लष्करी बंड होऊन थेट लष्करशाहीचे उदाहरण म्हणजे लिबिया. जगाला नवे तत्त्वज्ञान सांगणारे नवे प्रेषिक कर्नल मुहम्मद गडाफी तिथे अनिर्बंध सत्ता गाजवताहेत. लष्कराने सत्ता काबीज केल्यानंतर लष्करप्रमुखाचे रूपांतर राजकीय सत्ताप्रमुखात होत जाते. जनरल झियांचा प्रेसिडेंट झिया होणे, इजिप्तमध्ये कर्नल नासेरने सत्ता घेऊन अध्यक्ष होणे, १९६६ मध्ये इंडोनेशियातील लष्करी बंडानंतर जनरल सुहार्तो सत्ताधारी झाले; अर्जेंटिनातील पेरों हुकुमशाही–ही सर्व उदाहरणे अशा मधल्या स्तरावरची आहेत.

एखादे सरकार नावापुरते राहू देऊन प्रत्यक्ष कारभार मात्र लष्कराच्या तंत्राने चालल्याची उदाहरणे अनेक आहेत. ब्राझीलमध्ये जनरल कॅस्टेलो ब्रँको याने १९६४ मध्ये बंड केले. निवडणुका, अध्यक्ष, पार्लमेंट–सर्व जसेच्या तसेच होते. मात्र कारभार ब्रँकोसाहेब पाहत होते.

बऱ्याच वेळा लष्कर फक्त अधूनमधून महत्त्वाच्या गोष्टीतच लक्ष घालते. रोजचा सरकारी व्यापताप बघण्यात त्याला इंटरेस्टच नसतो. १९६०–७० च्या दरम्यान लॅटिन अमेरिकेतील काही देशांत ही स्थिती होती.

## आपण कुठे आहोत ?

या तीनही संदर्भात भारतातील राजकारण आणि लष्कर कुठे आहे ? लष्करी सत्तेला ( किंवा लष्करी प्रभावाखालील सत्तेला ) अनुकूल राजकीय–सामाजिक स्थिती; लष्कराची क्षमता व वृत्ती; लष्करी सत्तेचा प्रकार या तीनही घटकांच्याबाबत भारताची स्थिती काय आहे ?

आपल्या देशातील राजकीय संस्कृती ही बव्हंशी ' आज्ञाधारक ' या सदराखाली येते. स्वतः होऊन कोणती जबाबदारी नको, स्वतः निर्णय घेण्याची ( व ते अंमलात आणण्याची ) आपल्याला धास्तीच आहे. त्यापेक्षा वरून काय त्या आज्ञा याव्यात–आपण निमूटपणे पाळाव्यात. म्हणजे त्याच्या यशापयशाची ( मुख्यत अपयशाचीच ) जबाबदारी आपल्यावर नसते. हे आपले दिव्य आध्यात्मिक परंपरेतून आलेले जीवनसूत्र !

काही करणे तर सोडाच; पण स्वतंत्रपणे स्वतःची मते बनविण्याची सुद्धा इथे देशी धास्ती वाटते. नको तो धोका आणि मानसिक त्रास ! त्यापेक्षा एक प्रेषित, एक पंथ पकडून त्यामागे उगा डोळे मिटून निर्धास्त जावे. विचारकलहाचा त्रास नको. म्हणजे स्वतंत्र मत तर नाहीच.

स्वतंत्र मताचे योग्य संघटन हा पुढचा भाग. एखाद्या राजकीय व्यवस्थेत संघटित जागृत लोकमत असणे हा भाग भारतात जवळजवळ नाहीच.

## विविधता आणि मतैक्य

हां, एक मात्र आहे इथे संघटना भरपूर आहेत. अनेक हितसंबंधी गट व दबावगट ( Interest groups, Pressure groups ) आहेत. त्याच्यात आपले हितसंबंध राखण्यास व वाढविण्यास सतत संघर्ष चालू असतो. त्या संघर्षासाठी तरी निदान काही तत्त्वांवर या गटाचे एकमत आहे निवडणुका, निर्वाचित सरकार, विधिमंडळ आणि त्याला जबाबदार सरकार या काही मुद्द्यांवर या गटामध्ये एकमत आहे. बहुल ( Pluralists ) समाजातले हे एक वैशिष्ट्य असते.

त्यामुळे भारतात लष्कराने आपण होऊन सत्ता काबीज करण्यासारखी राजकीय परिस्थिती अजून तरी आली नाही. सर्व राजकीय पक्ष, संघटना लोकमत 'जागृत करून' ( म्हणजे ते या प्रकरणी जागे नाही ! ) लष्करी हस्तक्षेपाला विरोध करतील.

पंजाबमध्ये लष्कराच्या प्रशासनाला सर्वच राजकीय पक्षांनी व वृत्तपत्रांनी पहिल्यापासूनच विरोध केला आणि आताही लष्करी प्रशासन लाबविण्याच्या धोक्याकडे सर्वजण लक्ष देतात, हेही यासदर्भात महत्त्वाचे आहे. भारतात सर्वसामान्य लोकमत काही विशिष्ट तत्त्वांवर जागृत नाही. त्यावर मतैक्य नाही. मात्र राजकीय व सामाजिक अभि-जन ( Political Elites ) निदान आपल्या हितसंबंधासाठी तरी निर्वाचित लोकशाही जाऊन लष्कराचा ताबा सहन करणार नाहीत.

यामध्ये त्यांना लोकमत जागृत व्हावे अशी इच्छा नाही. केवळ आपल्या प्रभावाखाली असलेल्या गटांनी इतरांचे नेतृत्व स्वीकारण्यास विरोध करावा–( मग तो गट लष्कर असो किंवा दुसरा राजकीय पक्ष असो ) एवढ्याच या Elites चा प्रयत्न असतो.

दिल्लीतली किंवा इतर राज्यातली राजकीय परिस्थिती गोंधळाची आहे. कश्मीर – पंजाब – आसाम–मणिपूर–नागभूमी–भिवंडी अशासारखे प्रश्न आहेत. आयाराम–गयाराम, बंडखोरी, फर्नांडिस–स्वामी–अतुले यांच्यासारखी स्टंटबाजी, एस्कॉर्टस् स्वराजपॉल असे अनेक गोंधळ आहेत. मात्र हे सगळे गोंधळ करणारे (आपला गोंधळ अबाधित चालू रहावा म्हणून ) लोकशाही टिकविण्यासाठी ' वयं पंचाधिकं शतं ' या न्यायाने लष्कराला विरोध करतील.

भारताच्या लष्कराचाही या दृष्टीने विचार करायला हवा.

राजकारणात प्रवेश करण्याची भारताच्या लष्कराला सवयच

नाही. ती त्याची वृत्तीच नाही, त्यात रस नाही. असा 'एकनिष्ठ' गौरव अनेक वेळा केला जातो. त्यात कितपत तथ्य आहे? भारताच्या लष्कराची शक्ती किती आहे? एकसंघपणे लष्कर उठाव करू शकेल?

## भारतीय लष्कराची 'परंपरा'

प्राचीन काळापासूनच लष्कर व राजकीय सत्ता यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध होता. भारतीय उपखंडातील अनेक जनपदे, राज्ये, साम्राज्ये ही लष्कराच्या बळावरच निर्माण झाली. सत्ता काबीज करणे, बंड करणे हे प्रकार सैन्याच्या सहाय्यानेच होत असत.

राज्याच्या संरक्षणनीतीमध्ये दुर्ग व सैन्य याचा समावेश होता. कौटिल्याच्या म्हणण्यानुसार चारही वर्णांतील लोक सैन्यात दाखल होऊ शकत असत. मात्र लढणारे सैन्य हे क्षत्रियांचेच असे. . . .

सैन्यसुद्धा एकाच प्रकारचे कधीच नव्हते. वंशपरंपरेने कायमस्वरूपी लष्करीपेशा असलेल्यांचे सैन्य म्हणजे मौलबल, पगारी सैनिकांचे, भृतबल, वैश्य–ब्राह्मण वर्णीयांचे जरूर पडेल तेव्हा श्रेणीबल, अरण्यनिवासी शबर–पुलिंद आदी जमातींचे अटवीबल, मित्रराष्ट्रांची लष्करी मदत मित्रबल व शत्रूचे जिंकून घेतलेले अमित्रबल, असे सैन्याचे प्रकार होते. या सर्व प्रकारांत पदाती, गजदल, रथदल, अश्वदल (किंवा तत्सम) अशी चतुरंग विभागणी होतीच. म्हणजे लष्कर हे एकजिनसी एकाधिपत्याखाली नव्हते. त्याला स्वतःची अशी प्रतिमानता नव्हती.

या सैन्याच्या बळावर राजकीय कार्ये पार पाडली जात. सैन्याच्या आधारावरच राज्य टिकून असे. मात्र याचा अर्थ प्राचीन व मध्ययुगीन काळात लष्करी सत्ता होत्या असा नाही. ही सर्व सैन्ये राजकीय प्रमुखांच्या आधिपत्याखाली असत. 'The Military' म्हणजे सैन्याची स्वतंत्र संघटना अशी अस्तित्वात नव्हती. सेनापती हा राजाच्या आज्ञेत असे. सैन्य पगारी नव्हते. गरजेच्या वेळीच सैन्य उभारले जात असे. त्यांना प्रशिक्षण वगैरे होते. मात्र 'राजा' च्या रक्षणाखेरीज इतर कारणांसाठी खडे सैन्य क्वचितच होते.

मध्ययुगात व मुसलमानी अमलात वतनदार, मनसबदार यांच्या हातात सैन्य असे. एकजिनसी, (unified), कायमस्वरूपी सैन्य नव्हतेच! असे विकेंद्रित, भाडोत्री सैन्य राजकीयदृष्ट्या स्वतःच्या सामर्थ्यासंबंधी जागृत असायचे कारणच नव्हते. शिवाजीच्या काळात सैन्याचे थोडेफार Politicization झालेले दिसते.

मात्र संपूर्ण इतिहासात लष्कराने आपल्या सामर्थ्यावर व इच्छेने राजकीय उठाव केल्याचे उदाहरण नाही. १८५७ च्या प्रकाराला Sepoy's Mutiny (की शिपायांची भाऊगर्दी!) म्हणतात हे खरे; पण त्यामागे नानासाहेब, बहादूरशहा, तात्या टोपे, लक्ष्मीबाई यासारख्या राजकीय नेतृत्वाचा पुढाकार होता.]

## ब्रिटिश सरकारचे धोरण

१८५७ नंतर ब्रिटिशांच्या लष्कराबद्दलच्या धोरणात काही महत्त्वाचे बदल झाले. वसाहती सत्ता राखण्यासाठी सैन्य आवश्यक होते.

अँगस मॅडिसनच्या सांगण्यानुसार १९०५ मध्ये भारतात ३१ हजार ब्रिटिश होते. त्यापैकी २२ हजारांचे लष्करच होते. १९११ पर्यंत १ लाख ६४ हजार ब्रिटिशांपैकी ६६ हजार पोलीस व लष्कर होते. १९३१ मध्ये ही संख्या ६० हजारांवर आली.

याचाच अर्थ ब्रिटिशांनी नेटिव्ह सैन्य उभारायला सुरुवात केली होती. तीही राजकारणापासून अलिप्त!

१८५७ नंतर सुरू झालेल्या नेटिव्ह सैन्यात दक्षिणी प्रांत व'जहाल' बंगाली, ब्राह्मण, राजपूत यांना वगळण्यात आले. राष्ट्रीय चळवळीला बळी पडतील असे घटक वगळण्यात आले.

सैन्य राजसत्तेशी एकनिष्ठ रहावे, बंड होऊ नये, यासाठी राजकीयदृष्ट्या जागृत नसलेल्या मागासलेल्या भागातील लोकांची सैन्यभरती सुरू केली गेली. पंजाब व वायव्यसरहद्दप्रांतातील ग्रामीण रिक्रूटांची भरती केली जाऊ लागली.

या विशिष्ट प्रकारच्या भरतीचे समर्थन करण्यासाठी सर जॉर्ज मॅकमून यांनी या ग्रामीण भागातील जमातींना 'मार्शल रेसेस (लढाऊ जमाती)' म्हणून संबोधले. आपल्या पुस्तकात ते म्हणतात,

'The staunch old Indian yeoman who came into the Indian commissioned ranks or the young Indian landowner, made the Indian officer as we know him. The clever young men of Universities were quite unfitted for military work.'

ब्रिटिश अधिकारी व भारतीय सैनिक अशी लष्कराची रचना केली गेली. पहिल्या महायुद्धाच्या वेळीच भारतीयांना अधिकारपदे दिली–तीही, नॉन-कमिशन्ड ऑफिसरची! त्यांच्यावर ते जाऊ शकत नव्हते. या एन. सी. ओं. ना खास वेगळी वागणूक देऊन इतर भारतीय सैनिक व लोक यांच्यापासून अलग पाडले गेले.

ग्रामीण भागातील जमीनदार, शेतकरी यांच्यातूनच बहुतकरून अधिकारी निवडले जायचे. सँढहर्स्ट कॉलेज या लष्करी प्रशिक्षण केंद्रातही ७० टक्के प्रशिक्षणार्थी ग्रामीण भागातील होते. तेही पारंपारिक 'लष्करीपेशा' असलेल्या कुटुंबातील. तसेच अधिकारी व सैनिक यांच्यातील दुरता व फरक कायम राहील अशी दक्षता घेतलेली असे. (ती आजही घेतली जाते)

या संदर्भात तारिक अली यांनी आपल्या Can Pakistan Survive? या पुस्तकात काही निरीक्षणे दिली आहेत–

'In the mess, the evenings would be taken up with billiards, bridge or poker, helped along by a generous consumption of whisky, gimlets, rum & beer. Barracks life had none of this. Class differentials were extended to the sports field. Officers played polo, tennis & golf : soldiers and NCO's hocky, football and basketball'

## डेहराडून–खडकवासला

देशातील प्रवाहापासून अलग पाडणे व अधिकारी व सैनिक यात अंतर ठेवणे या दोन गोष्टी ब्रिटिश लष्करी नीतीत पाळल्या जात होत्या. तीच प्रशिक्षणपद्धत भारतात पुढे डेहराडून, खडकवासला येथेही कायम ठेवण्यात आली आहे.

मात्र पूर्वीच्या ग्रामीण भागातील अधिकाऱ्याचे प्रमाण कमी होऊन, त्याची जागा कॉन्वेंट, पब्लिक स्कूलमध्ये शिकलेल्या, इंग्रजी माध्यम व पाश्चात्य संस्कृतीत वाढलेल्या मध्यमवर्गीय–उच्चमध्यमवर्गीय कुटुंबातील शहरी उमेदवारानी अधिकारपदे हातात घेतली आहेत.

## नवा वर्ग – अधिक अलिप्त

हा नवा वर्ग पूर्वीपेक्षाही जास्त राजकीय–सामाजिक प्रवाहापासून अलिप्त किंवा उदासीन किंवा तुटलेला असा आहे. या संदर्भात भारतातील लष्करी प्रशिक्षणकेंद्रातील शिक्षणाची व जीवनपद्धतीची पाहणी करणे उद्बोधक होईल. 'राजकीय आकांक्षा नसणे व देशातील प्रवाहाशी तुटलेपणामुळे एक चांगला परिणाम म्हणजे राजकीय अलिप्तता !

ही झाली अधिकाऱ्यांची गत. साध्या सैन्यातही वेगळ्या रीतीने राजकीय उद्दिष्टासाठी एकसंघपणे उठण्याचे सामर्थ्य आहे का? शीख, मराठा, महार, जाट, गुरखा वगैरे अनेक रेजिमेंट्स आहेत, नावानुसार आता जातवार रेजिमेंट नाहीत; पण आपल्या लष्करात एकाच जातीचे–धर्माचे–प्रांताचे सैन्य नाही हे स्पष्ट आहे. त्यामुळे कोणताही राजकीय विचार प्रत्येकाला अपील होउन त्यासाठी प्रत्येक सैनिक, पलटण उठेल असेही नाही. हे विखुरलेपणही वेगळ्या अर्थाने फायद्याचे ठरले आहे.

नुकताच शीख सैनिकांनी अमृतसरच्या सुवर्णमंदिरातील कारवाईच्या निषेधार्थ उठावाचा प्रयत्न केला. तो सैन्यातीलच इतरानी हाणून पाडला हे उदाहरण या संदर्भात पुरेसे आहे.

भारतीय लष्कराची रचना या संदर्भात लक्षात घ्यावी लागेल. इतकी विकेंद्रित, गुतागुतीची लष्करी रचना आहे की, मनात आले तरी त्यांना एकसंघपणे उठाव करता येणार नाही. एकट्या पायदळाचे (Army–सैन्य) उदाहरण घेतल्यास पुरेसे आहे. त्यात पूर्व, मध्य, पश्चिम व दक्षिण कमांड्स आहेत. एकदर ९ लाख ४४ हजार फौजेपैकी अनेकजण चिलखती, तोफखाना, पर्वतीय सैन्य, पॅराशूट अशा तऱ्हेने विभागलेले आहेत. त्याखेरीज सीमा सुरक्षादलसारख्या प्रादेशिक फौजा वेगळ्याच.

नौदलाचे पूर्व–पश्चिम व दक्षिण असे विभाग आहेत. हवाईदलाचेही पूर्व, पश्चिम व मध्य, दक्षिण असे विभाग आहेत.

हवाईदलाचे चार भाग होते. नुकताच दक्षिण विभाग स्थापन करण्यात आला असून मध्यविभागातील कार्ये त्या विभागाकडे दिली गेली.

प्रत्येक दलाची सामग्री उत्पादनाची केन्द्रे, साठवणूकेन्द्रे, प्रशिक्षण नियंत्रणकेंद्रेही भारतभर (मुद्दामच) विखरून ठेवण्यात आली आहेत.

ही तिन्ही दले, त्याचे अधिकारी एका विचाराने येऊन, एकसंघपणे उठाव (किंवा तत्सम नियंत्रक कारवाई) करणे आधीच अशक्य. त्यातही उत्पादन, प्रशिक्षणकेन्द्रांच्या विखुरलेपणाने ते नियंत्रण टिकणे कितपत शक्य आहे ?

लष्करामध्ये एकत्वाची भावना वगैरे ( espirit de corps ) असली तरी ते 'एक' असते काय ? प्रा. फाइनर एके ठिकाणी म्हणतात,

'.. For sometimes, military centralization is defective. The larger the armed services, the more they are split into different branches...Can we really talk of 'The military' as though this is a single solidary cohesive unit ?'

त्यातही भर म्हणून, सैन्याची सर्व सूत्रे निर्वाचित सरकारकड आहेत. राष्ट्रपती ( दर्शनी तरी ) सैन्यप्रमुख आहे. कॅबिनेटची राजकीय व्यवहारसमिती, संरक्षणमंत्रालय, आर. अँड डी. सार्वजनिक उद्योग या सर्वांशी लष्कर निरनिराळ्या स्तरावर धोरण, निर्णय, उत्पादन, वितरण, नियंत्रण यासाठी बांधले गेले आहे.

शेवटी आपण या निष्कर्षावर येतो– 'जगात भारतासारखी इतर राष्ट्रे आहेत. त्यात लष्करी उठाव, लष्करी नियंत्रण असे प्रकार चालू आहेत. मात्र भारतात उपरोल्लिखित कारणामुळे लष्करी नियंत्रण येणे अशक्य आहे. खलास !

इथे थोडका विचार करणे आवश्यक आहे.

लष्करी सत्तेच्या किंवा नियंत्रणाच्या दृष्टीने दोन शक्यतांचा विचार करायला हवा. पहिली शक्यता केवळ अनुमानावर आधारित आहे.

लष्कर अवाढव्य व विखुरलेले असले तरी संपूर्ण लष्कर एकसंघपणे उठाव करते असे कधीच घडत नाही. लष्करी सत्ता आलेल्या बहुतेक राष्ट्रात लष्करातील एक गट–तोही कनिष्ठ अधिकाऱ्यांचा प्रमुख सत्ताकेंद्रे ताब्यात घेतो असा अनुभव आहे. त्या गटाने सत्ता ताब्यात घेतली की इतर लष्करी घटक एकत्वाच्या भावनेने त्या सत्तेला पाठिंबा तरी देतात किंवा मागच्या सरकारशी निष्ठा राखून असतात.

भारतीय लष्करातील अधिकारी व उच्चपदस्थ राजकारणापासून अलिप्त आहेत. त्याना सत्तेवर असलेल्या नागरी सरकारशी निष्ठावंत रहायचे आहे आणि लष्करी उठाव वगैरे कल्पना तर त्याच्या मनीमानसीही नाहीत असे लष्करी अधिकारी व राजकारणी सतत सागत असतात.

## नियंत्रण येत आहे

मात्र भारतात सध्या लष्करी सेवेचा जो काही उपयोग सुरू आहे त्यावरून खुद्द राजकारणीच लष्कराला आवतण देत आहेत असे जाणवल्यावाचून राहत नाही. असे वाटण्याची दोन कारणे आहेत. एक तर सरकारी कार्यामध्ये आता लष्कराचा जास्तीत जास्त वापर केला जात आहे, नैसर्गिक आपत्ती, पूर यामध्ये लष्कराच्या सर्वच विभागाची मदत घेतली जात आहे. नागालँड, मणिपूर, मिझोरम, आसाममध्ये लष्कराला सामान्य प्रशासनाच्या मदतीला यावेच लागते. देशात इतरत्रही तेच चित्र आहे. भिवंडी-मुंबईला दंगल झाली, लष्कराला बोलवा. कुठेही व कोणत्याही परिस्थितीत लष्कराला बोलविण, त्याच्या मदतीशिवाय सरकार काही करू शकत नाही अशी भावना यामुळे लष्करात पसरते. पंजाबात आज दुसरे काय चित्र आहे ?

यामुळे नागरी सरकारसंबंधी लष्करात तुच्छतेची भावना येते. सतत लष्करावर अवलबून राहण्याने सरकारची आपल्या नेहमीच्या यंत्रणेसंबंधीची कार्यक्षमता कमी होते. लष्करातील लोकानाही नागरिकांवरच्या सत्तेची चटक लागते.

एकदा कार्ये वाढली की त्याबरोबर तेवढी सत्ताही पाहिजे. ते

अपरिहार्य आहे. लष्कराने खुद्द सत्ता मागितली नाही तरी ती आपोआपच येते.

दुसरीकडे, लोकांचीही भावना तशीच होते. लष्कराशिवाय दुसरा उपाय नाही. सर्व रोगावर रामबाण उपाय म्हणजे लष्कर, लष्कर हाच त्राता– अशी लोकांची हळूहळू समजूत होत आहे. नेहमीच्या सरकारी यंत्रणा, संस्था यांच्यावरचा विश्वास व त्यांच्या कार्यक्षमतेसंबंधी खात्री यांचा लोप होतो

आजची परिस्थिती अशीच नाही का? पंजाबमध्ये दुसरं काय चालू आहे? राज्यपालाचे सुरक्षासल्लागार म्हणून लेफ्टनंट जनरलच्या हुद्द्यावरच्या माणसाची नेमणूक होते. त्यांच्याकडे न्यायखातेही होते. न्यायाधिशांच्या नेमणुका, दयेच्या अर्जाबाबतचे निर्णय, अन्य कायदेविषयक गोष्टी आता लष्करी अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत आल्या.

कुलदीप नय्यर यांनी एका लेखात म्हटले आहे की, 'लष्कर आले ते नागरी प्रशासनाला साह्य करण्यासाठीच; पण सर्व प्रशासन आपल्याकडे आहे अशा थाटात लष्करी अधिकारी वावरतात.' अशी नागरी अधिकाऱ्यांनी तक्रार केली. जमिनीचे दावे निकाली काढण्यास काही लष्करी अधिकाऱ्यांनी 'दरबार' भरविण्यासही सुरुवात केली आहे...नागरी व लष्करी प्रशासनाची तुलना होणारच. जेव्हा लष्कर काढून घेतले जाईल, तेव्हा सरकारपुढे पुन्हा प्रश्न उभे राहतील.'

त्याचबरोबर लष्करी अधिकाऱ्यांना मिळालेली सत्तेची चव त्याची चटक त्याना लागली तर?

आज पंजाबमध्ये लष्कर न ठेवल्यास आपले काय होईल असे तेथील हिंदूंना व शिखानाही वाटत आहे. स्थिती शांत होईपर्यंत लष्कर काढू नये अशी मागणी हिंदू संघटनांनी केली आहे. पंजाबमधील लष्कर काही दिवसानी काढूनही घेतले जाईल; पण लोकाना त्याची सवय लागलेली असेल. (People would get used to military rule.) अमृतसरमध्ये लष्करी डॉक्टर, अधिकारी लोकाना तपासतात, त्यांना धान्यवाटप, दूधवाटपात मदत करतात. याचे सुरेख फोटो आपण पाहतो– क्षणभर सद्गदितही होतो मात्र यामागे दडलेले भीषण सत्य काय त्याचा विचार आपण कितपत करतो? जनतेला आपण निवडून दिलेल्या सरकारचा, त्या सरकारने निर्मिलेल्या यंत्रणेचा विश्वास, उपयोग नाही, हे हळूहळू सिद्ध होत आहे काय?

लष्कराशिवाय चालणार नाही अशी सरकारची व जनतेची भावना तयार होणे म्हणजे अप्रत्यक्ष लष्करशाहीच आहे. इथे लष्करी बंडाचा प्रश्नच नाही. अगदी आमंत्रण दिल्याप्रमाणे साळसूदपणे लष्करी सत्ता येऊन स्थिरावते.

लेखाच्या आरंभी राव रशीद या पाकिस्तानी अधिकाऱ्याने या संदर्भात केलेले विधान फार खरे आहे.

## जागतिक अपरिहार्यता

भारतातील किंवा इतर देशातील लष्करी प्रभाव याचा तेवढ्यापुरता विचार करून भागणार नाही. हा एक अपरिहार्य राजकीय प्रक्रियेचा भाग आहे किंवा काय याचाही विचार झाला पाहिजे. याचे कारण असे की, अमेरिकेसारख्या प्रगत–लोकशाहीवादी राष्ट्रातही लष्कर, शस्त्रसामग्री, लष्करीसंस्था यांचा प्रभाव आहे.

आज अमेरिकेचे परराष्ट्रधोरण तेथील पेंटॅगॉन, रँड कॉर्पोरेशन Military–Industrial Complex यांच्या सल्ल्यानुसारच ठरत असते. राजकीय सत्ताप्रमुखाला स्वत: होऊन काही धोरणच ठरविता येत नाही. परराष्ट्रधोरणातील ही परावलंबिता देशांतर्गत धोरणांच्या संदर्भात येणार की नाही हा निर्णय तेथील जागृत लोकमतानेच घ्यायचा आहे.

## अनेक आविष्कार

एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसते. सर्वच राष्ट्रांमध्ये आता सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण (Centralization) होत आहे. समाजातील गुंतागुंतीच्या समस्या, त्याची एकसंधपणे व खंबीरपणे हाताळणी करणे, कार्यक्षम अमलबजावणी करणे याची गरज वाढत आहे. लोकांची मनोवृत्तीही त्याप्रमाणेच तयार होत आहे. कोणत्या तरी एका Agency ने आता सूत्रे चालवावी अशी धारणा बळकट होत आहे. एकसत्तावादाकडे ही वाटचाल आहे असा त्रागा काहीजण करतील; पण यामागची राजकीय अपरिहार्यता कशी विसरता येईल? अगदी अमेरिकेसारख्या लोकशाहीवादी म्हणविणाऱ्या देशात जनतेच्या सर्व आशा–अपेक्षाचे केंद्र राष्ट्राध्यक्षच असतो. केंद्रीकरणाकडे जाण्याची सरकारी यंत्रणेची प्रक्रिया व जनतेची अपेक्षा ही (निरपेक्ष दृष्टीने पाहिल्यास) राजकीय अपरिहार्यता आहे. (हे त्या परिस्थितीचे रॅशनलायझेशन नाही.)

या केंद्रीकरणाच्या प्रक्रियेचे अनेक आविष्कार आहेत. अध्यक्षीय सरकारचा पुरस्कार, हुकुमशाही, रशियासारखी एका पक्षाची सर्वंकष सत्ता आणि लष्करी सत्ता ही त्या केंद्रीकरणाच्या प्रक्रियेची रूपे आहेत राजकीय व्यवस्थेची व लोकमानसाची गरज म्हणून या सत्ता अस्तित्वात यतात. कार्यक्षमता, नि:पक्षपातीपणा, कडक शिस्त; जलद संपर्क ही मूल्ये केंद्रीकृत व्यवस्थांमध्ये असतात. ज्या राजकीय व्यवस्थेत ही मूल्ये कमी असतात. साहजिकच अशा सत्ताना अनुकूल वातावरण असते. या सत्तांमध्ये नि:पक्षपातीपणा–कार्यक्षमता–शिस्त–त्वरित निर्णय यांची क्षमता असो वा नसो–त्या तसे दाखवितात हे खरे.

या मूल्यांचा अर्क म्हणजे लष्कर. अपरिहार्यपणे या ना त्या स्वरूपात प्रत्येक राज्यव्यवस्था त्या दिशेने जात आहे.

मग लष्करी राजवटी कोसळतात का? त्याचे कारण या मूल्यांतच आहे. ही मूल्ये मुळातच तकलादू आहेत म्हणून लष्करी राजवट किंवा इतर केंद्रीभूत सरकार अपयशी होते असे नाही, तर ती राजवट या गरजा भागविण्याला कमी पडते म्हणून त्या अपयशी होऊन कोसळतात. अर्थात हा राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रांत झाला त्याचा सविस्तर विचार करणे प्राप्तच आहे; पण सध्या नको!

लष्करी सत्ता–किंवा केंद्रीकृत नियंत्रण–अपरिहार्यच आहे का? ते टाळता येणार नाही का? हा वादाचा विषय आहे. एक मार्ग दिसतो तो म्हणजे जनतेचा आपल्या संस्थात्मक जीवनावरचा विश्वास दृढ करणे–त्यासाठी नागरी संस्था व संघटना बळकट व कार्यक्षम करणे. विकेंद्रीकरणापेक्षा असे Institutionalization लष्करी किंवा दुसऱ्या केंद्रीकृत सत्तेला खऱ्या अर्थाने अडसर ठरू शकेल.

आज मात्र भारतात असे Institutionalization दिसत नाही. लोकनियुक्त सरकारच्या यंत्रणा अकार्यक्षम आहेत. लोकांचा त्यावर विश्वास उरलेला नाही. दिसते ती फक्त पक्षोपपक्षांतील सुंदोपसुंदी; साटेलोटे केल्याशिवाय पुढे न सरकणारे प्रशासन, तात्त्विकतेचा मुलामा लावलेले व्यक्तिगत संघर्ष–या सर्व प्रकाराला कटाळलेल्या; निर्णय घेऊ न शकणाऱ्या भारतीय जनतेला एकाधिकारशाहीदेखील पुरेशी वाटणार नाही.

एकच पर्याय समोर दिसतो–लष्कर! □




# सामान्यांच्या मनात रुजलेला नैतिक खुलेपणा

प्रा. स. शि. भावे

( ३ )

**भा**रताकडे, भारतीयांकडे बघण्याची सामान्य अमेरिकन माणसाची दृष्टी कशी आहे ?

मुळात भारताकडे आणि भारतीयांकडे अमेरिकनांची दृष्टी तरी आहे का ?

अमेरिकनांची मूळ दृष्टी कोणती आहे ? कशी आहे ?

साधे उत्तर असे की, सामान्य अमेरिकनांना भारत व भारतीय यांच्यासंबंधी कसलेही खास कुतूहल नाही. हा अर्थात दोष नव्हे अथवा दोषारोपही नव्हे. वस्तुस्थिती मात्र अशी आहे.

यावर शिक्षित–उच्चशिक्षित भारतीयांचा चटकन विश्वास बसणार नाही. आज आपल्याकडे खेडोपाडी, बऱ्याच अशिक्षितांपर्यंत अमेरिका–अमेरिकन ही जाणीव पोचलेली आहे. आज लॉस ऍंजेलीसमध्ये ऑलिंपिक क्रीडा चालू आहेत म्हणून आपल्याकडे वृत्तपत्रात, आकाशवाणीवर, दूरदर्शनवर, साध्या खाजगी गप्पांत अमेरिकेचा सारखा उल्लेख होत असतो; पण असा काही खास प्रसंग नसला तरीही आपल्याकडे अमेरिकेचे नाव सारखे दुमदुमत असते. अमेरिकेचे नवे नवे अवकाशप्रयोग, अमेरिकेची नवी नवी तांत्रिक कसब, अमेरिकेच्या नव्या सुखसोयी, नव्या फॅशनी, अमेरिकन अध्यक्षांची निवडणूक यांची चर्चा आपणाकडे सर्वत्र चालते. अमेरिकेच्या नेत्रोद्दीपक प्रगतीविषयी, त्यांच्या नेत्रोद्दीपक श्रीमंतीविषयी आपल्याला मोठे कुतूहल असते, कौतुक असते.

केवळ माहिती, कुतूहल, कौतुक एवढेच असते असे नाही. बहुतेक भारतीयांच्या मनात खोलवर एक अमेरिकन स्वप्न सतत तरळत असते. शिक्षित–अर्धशिक्षितच नव्हे, तर अगदी अशिक्षित पण जरा धाडसी तरुणांना वाटत असते, कसेही करून अमेरिकेला जाऊ आणि तिथे नशीब काढू !

यातही दोष नाही. हे अगदी स्वाभाविक आहे. कोकणातल्या खाडीलगतच्या झोपडीत राहणाऱ्याच्या मनात मुंबईचे स्वप्न तरळावे, मुंबईस झोपडपट्टीत राहणाऱ्या मनात जवळच उभ्या असलेल्या स्कायस्क्रेपरचे स्वप्न तरळावे हे स्वाभाविकच आहे; पण हे जसे स्वाभाविक, तसेच मुंबईवाल्याला कोकणातल्या झोपडीचे सोयरसुतक नसणे किंवा अनेक मजली इमारतीत उत्तुंग राहणाऱ्याला पायालगतच्या झोपडपट्टीत राहणाऱ्याचे सोयरसुतक नसावे, हेही स्वाभाविक असते.

मग सध्या बरेच अमेरिकन नागरिक भारतात दिसतात ते कसे ? तर ते इतर अनेक निमित्तांनी आलेले असतात. भारतात जावे, भारतीय अनुभवाने समृद्ध व्हावे; या अनुभव-ओढीने आलेले फार थोडे. पाचदहा, जास्त नाही. बहुसंख्य येतात ते प्रवासो–टुरिस्ट म्हणून. अमेरिकन सरकारचे किंवा अमेरिकन कंपन्यांचे किंवा यूनोच्या विविध समित्यांचे प्रतिनिधी वा अधिकारी म्हणून. काही हिप्पी म्हणून येत असत. काही रजनीश भक्त म्हणून तर काही 'कृष्णकॉन्शसनेस' वाले म्हणून. प्रकट–अप्रकट, सार्वजनिक–खाजगी अशा अनेक निमित्तांनी अमेरिकन लोक आपल्याकडे येतात; पण भारतीयत्वाविषयीची खोल, व्यापक जिज्ञासा त्यामागे नसते.

त्याचप्रमाणे, वाढत्या प्रमाणात जे भारतीय अमेरिकेत जात आहेत त्यांच्याविषयीही तिकडे खास उबदारपणा दिसणार नाही. आज न्यूयॉर्क, शिकागो, कानडात, टोरोंटो अशा ठिकाणी मोठ्या संख्येने भारतीय आहेत. तथापी, अमेरिकन जनजीवनात ते सहभागी झाले आहेत, एकात्म झाले आहेत, असे म्हणता येणार नाही.

अपवाद आहेत. प्रकाश आंबेगावकर हा असा एक अपवाद. मिनेसोटा राज्याच्या गव्हर्नरांनी राज्यातर्फे एक व्यापारी शिष्टमंडळ चीनला पाठवले आहे. सात जणांच्या या शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून, अमेरिकन नागरिकत्व स्वीकारलेले व स्वतंत्र उद्योजक म्हणून उदयास आलेले आंबेगावकर आम्ही तेथे असताना चीनला रवाना झाले. एव्हाना ते परतलेही असतील. अशी उदाहरणे फारच थोडी. सर्वसाधारण भारतीय वीसवीस वर्षे अमेरिकेत राहूनही तसे उपरेच राहिलेले दिसतात. या आपल्या मंडळींसंबंधाने नंतर विस्ताराने लिहायचे आहे म्हणून आता विस्तार टाळतो. इतके बरीक खरे, की इथे येऊन काय अथवा तिथे असून काय, भारत व भारतीय यांसंबंधाने अमेरिकन मनात तशी जिज्ञासा नाही.

□

याचे मूळ कारण साधे, सोपे आणि सरळ आहे.

भारतीय व भारत यांची त्यांना गरज नाही.

गरजेची असेल, आज किंवा उद्यासाठी उपयोगी असेल तरच अमेरिकन माणूस एखादी गोष्ट करील, एरवी नाही.

गरज म्हणून आपण गैरसमज करून घेण्याचे कारण नाही किंवा हेटाळणी करण्याचेही कारण नाही. बिचकण्याचे तर

मुळीही कारण नाही.

'गरज' किंवा 'उपयुक्तता' यांचा विचार ते करतात तो क्षुद्र स्वार्थदृष्टीने नव्हे तर व्यवहारवादाच्या खंबीर, तात्त्विक भूमिकेने. अमेरिका व्यवहारी आहे, तर भारत तात्त्विक आहे, असे समज असतात. अशा समजांच्या चष्म्यातून बघून त्याचा व्यवहार समजणार नाही.

गरज अथवा उपयुक्तता ही त्यांच्या जीवनाची तत्त्वे आहेत. याचा अर्थ असा की, त्याची गरज व त्याची उपयुक्तता यांना एक किमान पातळी आहे आणि ही किमान पातळी सतत उचावत नेली पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. म्हणजेच त्याना जीवनाचे तत्त्व आहे. गरज ही स्वाभाविक व मूलभूत असते. गरजेची किमान पातळी अमुक एक असली पाहिजे हे त्या पातळीच्या वरच्या पातळीचे तत्त्व होते आणि ही किमान पातळीही सतत उंचावत राहिली पाहिजे हे आणखीनच वरच्या पातळीचे तत्त्व होते. अमेरिकन जीवनाचे हे तत्त्व आहे.

अधिक शक्ती, अधिक गती, अधिक उची ( Stronger, Faster, Higher ) ही ऑलिम्पिक खेळाची तात्त्विक सूत्रे आहेत. अमेरिकन जीवनाचीही हीच सूत्रे आहेत. या शब्दांमध्ये जो 'तर'–भाव आहे–Comparative degree आहे त्या तरभावात त्याचे तात्त्विक मर्म साठवलेले आहे. अमुक शक्ती, अमुक गती किंवा अमुक उची ही 'अखेरची' कधीही मानता येणार नाही, हे यातील मर्म आहे. विकासाला अंतिम मर्यादा नाही हे यातील तत्त्व आहे. विकासासाठी जो प्रयत्न करायचा तो कधी थाबू शकत नाही, ढिला पडू शकत नाही हे यातील तंत्र आहे. विकासाकडे जाण्याचा प्रयत्न माणसाने कधीही सोडता कामा नये अथवा अशा प्रयत्नात विक्षेप आणता कामा नये ही यातील नीती आहे.

आपल्याला ज्या गोष्टी ढोबळ मानाने माहीत आहेत, त्यावरूनही या अमेरिकन जीवनदृष्टीची कल्पना येऊ शकते. 'एम्पायर स्टेट' या इमारतीचा अमेरिकनांना मोठा अभिमान होता सर्वांत उंच म्हणून; पण अमेरिकेबाहेर कोठे या इमारतीपेक्षा अधिक उंच इमारत नाही, आपला पहिला क्रमांक कायम राहतो आहे. मग आणखी उंच इमारत कशाला बाधा? असा विचार त्यानी केला नाही. शिकागोला त्यानी 'Searo's Tower' बाधला. अधिक उच. एकशेदहा मजल्याचा! ती इमारत आता जगातील सर्वांत उंच इमारत मानली जाते. अमेरिकनच पण अधिक उंच!

अवकाशयानाचे पाहा. अवकाशदिशानाच्या क्षेत्रात अमेरिका–रशिया यांची स्पर्धा आहे हे आपण जाणतो; पण अमेरिकन शास्त्रज्ञांच्या दृष्टीने ही केवळ दोन राष्ट्रांतील स्पर्धा असू शकत नाही. १९८९ साली आपल्या सूर्यमालिकेबाहेर जाईल अशा गणिताने अमेरिकन एक यान सोडले आहे या बाबतीत रशिया मागे आहे; पण अमेरिकेची आकाक्षा तेथेच थबकलेली नाही. अधिक काळ अधिक दूर अवकाशात जाणारी व परतही येऊ शकणारी याने बाधण्याची व रवाना करण्याची त्यांची आकाक्षा कायम आहे आणि त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

इमारती, अवकाशयाने अशा साऱ्या क्षेत्रातला हा प्रयत्न म्हणजे जशी इतराशी स्पर्धा आहे, तशीच ती स्वतःशी स्पर्धा आहे. कारण स्वतःच्या विकासाची साधना ही स्वतःशी स्वतःचीच स्पर्धा असते. अमेरिकन जीवनप्रकल्पामागे ही तत्त्वदृष्टी आहे.

□

आपण आध्यात्मिक आहो, असे आपण मानतो. आपल्याला ही जीवनदृष्टी कळणे अवघड जाऊ नये. अध्यात्मातील साधना ही इतरांशी स्पर्धा नसते. इतर कोणापेक्षा आध्यात्मिक प्रवासात आपण पुढे किंवा मागे आहोत, याला काही अर्थ नसतो, तसेच महत्त्वही नसते. अशा तौलनिक पुढाऱ्याने आपली स्वतःची पातळी उंचावत नाही, की तौलनिक मागासलेपणाने खालावत नाही. आपल्या आध्यात्मिक प्रवासात इतरांची मदत होऊ शकत नाही, तशी अडचणही होत नाही. म्हणून स्वतःखेरीज इतराची या मार्गात गरज नसते, इतरांचे प्रयोजनच नसते. गरज असते ती एकाताची, एकलेपणाची.

□

आमच्या आध्यात्मिक साधनाक्रमाची आणि अमेरिकेच्या भौतिक विकासक्रमाची तुलना कशाला, असा प्रश्न मनात येऊ शकतो. हा प्रश्न स्वाभाविक आहे; पण अमेरिकन जीवनाचा साक्षेपाने विचार केला तर ही तुलना स्वीकारार्ह वाटू शकेल.

सुरुवातीला सांगितलेच आहे की, गरज अथवा उपयुक्तता यांची साधना स्वावलबनाने आणि स्वयंपूर्णतेने करावयाची असे म्हटले की, तात्त्विक पातळी अपरिहार्यपणे येते. तशी ती अमेरिकन जीवनाला आली आहे, जशी वैयक्तिक तशीच राष्ट्रीय जीवनाला आली आहे, यात शका नाही. अशा तात्त्विक उत्कटतेने व शिस्तीने जगायचे तर त्या पद्धतीचे काही भावनात्मक परिणाम होतात, काही सवयी लागतात, काही विकृतीदेखील तयार होतात. साधकाचे आणि योग्याचेही असे होते. भगवद्गीतेत 'योगभ्रष्ट' ही सकल्पना सांगितली आहे. अलीकडेच साहित्याचे नोबेल बक्षीस मिळविणाऱ्या ग्रीक कझान्ट्झाकिसने ग्रीक ख्रिस्ती धर्मगुरूना भोवणाऱ्या ॲलर्जीचे वर्णन केले आहे. तात्त्विक अट्टाहासातून निर्माण होणाऱ्या अशा व्याधी आणि विकृती अमेरिकन व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातही दिसतात. या विकृतीविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया दिसतात. या विकृती दूर करण्याचे प्रयत्नही तीव्रतेने चालू असताना दिसतात.

□

'विकास' या शब्दाने अमेरिकेचे हे जीवनतत्त्व आपण समजावून घेऊ शकू.

'स्वातंत्र्य' ही विकाससाधनेची आवश्यक व अपरिहार्य अट आहे हे अमेरिकेने ओळखले आहे आणि मान्य केले आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यासाठी व्यक्तिपरता आवश्यक आहे, हेही तत्त्व स्वीकारले आहे. समाज हवा, शिस्त हवी, सारे हवे; पण हे सारे हवे ते स्वातंत्र्याला, व्यक्तिपरतेला पोषक म्हणून. जिथे ही पोषकता कमी होईल अथवा नाहीशी होईल अथवा स्वातंत्र्य व व्यक्तिपरता एकीकडे आणि सामाजिक शिस्तीची व्यवस्था दुसरीकडे असा सघर्ष उभा राहील, त्या वेळी स्वातंत्र्य व व्यक्तिपरता यांनाच प्राधान्य द्यावयाचे याबद्दल बहुसख्य अमेरिकनाच्या मनात जरादेखील शका नसते. किंबहुना असे प्राधान्य त्यांच्या मनात परंपरेने आणि स्वाभाविकपणेच वसत असते.

अमेरिकनांना राहण्यासाठी, वावरण्यासाठी घरे आणि जागा ऐसपैस लागतात. खेळासाठी मैदाने, विहरण्यासाठी सागरकिनारे किंवा सरोवरकिनारे, प्रवासासाठी विमाने,

सार्वजनिक आणि खाजगी मोटारी, विमानांचे व मोटारीचे तळ– हे सारे ऐसपैस हवे. शिकण्या–शिकवण्याचे वर्ग, ग्रथालये, त्यांतील वाचनाच्या जागा, वाचण्यासाठी बसावयाचे कोच–हे सारे ऐसपैस हवे. आलीशान हवे. खोल्या नको असतात, दालने हवी असतात.

दिसायला ही चैनबाजी दिसते; पण प्रत्यक्षात तसे नाही. माणसांनी एकमेकाजवळ असतानाही एकमेकांची अडचण करू नये अथवा होऊ नये, त्यांनी एकमेकांपासून उचित अंतरावर असावे–ही या ऐसपैसपणामागील दृष्टी आहे.

'जवळ खूप पैसा आहे म्हणून असे राहता येते,' अशी किंवा, 'माणसाला कसे, जे आहे त्यात मजेने राहता आले पाहिजे' अशी,–अशा तक्रारी यासंबंधी केल्या जातात. त्या उचित म्हणता येणार नाहीत. एक तर, खूप पैसा जवळ आहे म्हणून तो शहाणपणाने भोगता येतो आहे असे क्वचित दिसते. दुसरे म्हणजे, 'आहे त्यात मजेने राहणे' याचा अर्थ 'आहे त्यातच सदैव राहणे, अधिकासाठी प्रयत्न न करणे' असा घेणेही बरोबर होणार नाही. इतरापेक्षा कमी सुखसोयीत राहणारे लोक अमेरिकेतही आहेत; पण अधिक कष्ट करून अधिक सुविधा मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न सतत चालू असतो.

एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी संबंध यावा, तो दोघांच्या गरजेनुसार व दोघाना हवा तेव्हाच यावा, असे खाजगीपणाचे मूल्य अमेरिकन लोकजीवनात 'व्यक्तिपर स्वातंत्र्या'तून रूढ झाले आहे.

घराची, शहराची रचना या हेतूने केलेली असते. बाजारभागात– 'डाउनटाउन'मध्ये उत्तुंग इमारती असतात. त्या व्यवसायासाठी म्हणून, एक प्रकारची जाहिरात म्हणून आणि अगदी अपरिहार्य म्हणून असतात. घरे या बाजारभागापासून दूर असतात. एकमेकापासूनही योग्य अंतरावर असतात. साधारणपणे एकमजली. क्वचित दोन किंवा तीन मजल्यांची. एका घरात एक कुटुंब. कुटुंबातील प्रत्येकाला एक खोली. अगदी लहान व वयाने जवळची असतील तर दोन भावंडांना एक खोली. खोल्यांची दारे व्यवस्थित लावलेली. खोलीत कोणी नसेल तेव्हा, असेल तेव्हाही. आत प्रवेश करायचा तोही टकटक करून आणि आतल्याची परवानगी घेऊन!

यात परकेपणा नाही, तर खाजगीपणाचे मूल्य आहे. दुसऱ्याची जागा, त्याचा वेळ, त्याचा मूड यावर कारणाशिवाय आणि दुसऱ्याच्या संमतीशिवाय आक्रमण करायचे नाही ही या मूल्याची सभ्यता आहे. आजोआजोबा किंवा आईवडील हेच धाकट्यांशी असे वागत असल्याने धाकट्यांना याचे बाळकडूच मिळते.

या खाजगीपणामुळे प्रत्येकाला आपोआपच आपले काम, तेही चढत्या श्रेणीने, करावेच लागते. गप्पाष्टके किंवा केवळ चकाट्या सहसा दिसत नाहीत. प्रत्येकजण आपापल्या कामात दिसतो. कामाच्या ठिकाणी किंवा वाहनात किंवा घरी– असा असतो–दिसतो. साधारण कुटुंबात दिवसभराचा क्रम शिस्तीचा व कडक असतो. सकाळी आठला आपापल्या कामावर जायचे असते. त्या आधी नाश्ता. म्हणजे सहाला उठावेच लागते. कामावरून किंवा शाळेवरून दुपारी साडेचारपाचपर्यंत परतायचे. दुपारचे खाणे कामाच्या ठिकाणी वा शाळेत. पाचनंतर सात-आठपर्यंत सारे कुटुंब एकत्र असते. त्या वेळी एकत्र टी. व्ही., जेवण, आठवड्यातून दोनदा पाहुणचार, संगीत ऐकणे इत्यादी. खेळ, व्यायाम वगैरे मुलांचे शाळाकॉलेजात झालेले असते. आठला प्रत्येकजण आपापल्या खोलीत. मग वाचन, टी. व्ही, संगीत ऐकणे, अभ्यास, लेखन हे सारे ज्याचे त्याचे. दहाच्या सुमारास बहुतेक दिवे मालवले जातात. आईवडिलांना किंवा मुलांपैकी कोणाला विशेष लेखनवाचन करायचे असले तर एखादा दिवा उशीरपर्यंत जळतो. उशीरपर्यंत बाहेर राहायचे असेल तर प्रत्येकाने दुसऱ्याला सांगितलेले असते. उशीरा येणारा शांतपणाने आपली कार गराजमध्ये ठेवतो, गराजमधील दरवाजाने शांतपणाने घरात येतो, इतरांना शक्यतो न उठवता आपले खाणे उरकून आपली खोली गाठतो. अमेरिकेत साधारण माणशी एक गाडी असते. (अधिकृत प्रमाण सध्या १.३ माणसास एक गाडी असे आहे.) या गाडीचा उपयोग असा होतो.

ध्येयनिष्ठ, कार्यमग्न असावयाचे तर रसनेचे नियंत्रण केले पाहिजे आणि ते सर्व इंद्रियदमनापेक्षा अवघड आहे, असे आपल्या संतांनी सांगितले आहे. अमेरिकेत सर्वसाधारण दिनक्रमात रसनानियंत्रणाचा हा प्रयोग दिसतो. सकाळी एक उकडलेले अंडे, पाव व दूध असा नाश्ता. दुपारी एक सफरचंद व एक पेला फळरस. सायंकाळी एखादा पिझ्झा किंवा परतलेला मासा आणि फळरस किंवा कॉफी. सपले खाणे. हे सारे बाजारात तयार आणि चांगले मिळते. चार किंवा आठ दिवसांचे आणून फ्रीजमध्ये ठेवायचे. स्वयंपाकाचा राडा नाही, 'सारा दिवस चुलीत' हा प्रकार नाही. काम जास्त हवे तर खाण्याचे अवडंबर नको ही दृष्टी. 'जाणिजे यज्ञकर्म' हा रामदासाचा उपदेश, श्लोक न म्हणता, अमेरिकनांनी अमलात आणला आहे!

यामुळे त्याना आपल्याखेरीज अन्यत्र बघण्यास वेळ नसतोच आणि आवडही नसते. शेजारी घरातली मुले एकमेकाशी खेळतात. तीही ठराविक वेळात; पण मोठी माणसे कारणाशिवाय एकमेकाशी बोलणार नाहीत. बोलली तरी बहुधा फक्त हवेवर आणि तीही सठीसहामाशी.

अशा या नियमित आणि म्हणून बहुधा नीरस, दिनक्रमाचे उद्दिष्ट एकच असते. ते ते म्हणजे काम! अधिकाधिक काम आणि कामातून प्रगतीचे उद्दिष्ट गाठणे. 'अचीव्हमेंट' हा येथील जीवनाचा परवलीचा शब्द आहे. नव्याने आलेल्या भारतीयाला या साऱ्याने गुदमरल्यासारखे होते यात आश्चर्य नाही; पण वीस–तीस वर्षे येथे राहिलेले भारतीय आपल्यापुरते या चाकोरीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असतात.

□

कोणत्याही अतिरेकातून विकृती निर्माण होतात, तशा त्या येथेही दिसतात याचा उल्लेख आधी केलाच आहे.

यातली ठळक म्हणजे यांनी स्वत:भोवती घालून घेतलेली एक भिंत. आपल्याशिवाय इतरेजन याना, स्वत:ला हवे तेव्हा, हवे तसे आणि हवा तेवढाच वेळ, हवे असतात. 'व्यावसायिक संबंध'च फक्त हवे असतात; पण प्रत्यक्षात असे होत नाही. दोन जिवतांचे संबंध, व्यक्ती असोत की राष्ट्रे असे यांत्रिक नियमानी चालत नाहीत. या संबधात व्यवसायाच्या अपेक्षेपेक्षा वेगळे व जास्त असे काही निर्माण होतेच. त्याचे वेगळे, नवे बंध तयार होतात; पण व्यावसायिकांना हे नवे, वेगळे बंध नको असतात. या स्वाभाविक बंधानी याचे गणित बिघडते, चुकते. असे

झाले की, लहान मुलासारखे रुसणे, रागावणे, चिडणे, फणकारा येणे सुरू होते व्यक्ती आणि राष्ट्र या दोन्ही पातळयांवर अशा प्रतिक्रिया आपल्याला दिसतात.

दुसरी ठळक विकृती म्हणजे ज्याला त्याला नको झालेले एकटेपणाचे ओझे. विकृतीपेक्षा ही व्याधीच म्हणावी. प्रत्येक विकृती ही एक व्याधीच असते हे वेगळे. या एकटेपणातूनच हिंसा, क्रौर्य, बेफामपणा, टोकाचे अत्याचार हे सारे बाहेर पडत आहे. याचा तपशील आपल्याला पुरेसा माहीत असतो. शिवाय, शहरीकरणाबरोबर व बेकारीबरोबर हे लोण इकडेही येत आहे. म्हणून येथे तो तपशील देत नाही.

मला महत्त्वाची आणि गौरवाची वाटली व वाटते ती या लोकांची या विकृतीला तोंड देण्याची वृत्ती. ही वृत्ती उघडपणाची आणि शास्त्रीयतेची आहे. ही खास अमेरिकन वृत्ती आहे आणि त्यांच्या श्रेष्ठ नैतिकतेची ही साक्ष आहे.

सारा जीवनक्रम ही विकासाची प्रक्रिया आहे असे समजल्यावर तो एक प्रयोग ठरतो. प्रयोग म्हटला की त्यात चुका आणि अपयश आलेच. या चुका आणि हे अपयश समजून घेणे, कबूल करणे आणि मग लवकरात लवकर सुधारणे, हा एकमेव शास्त्रीय मार्ग- व्यक्ती म्हणून आणि राष्ट्र म्हणून अमेरिकन लोक हा प्रांजळपणाचा मार्गच बहुधा पत्करतात. यासठी वृत्तीचा मोकळेपणा, अलिप्तपणा, चूक कबूल करण्यातले नम्र धैर्य असे गुण आवश्यक असतात. अमेरिकन जीवनक्रमात हे गुण वारवार प्रकट होत असतात.

एक तर सर्वांसमक्ष चूक कबूल करून ' सॉरी ', किंवा ' आय अपॉलॉजाइज ' असे म्हणण्यास हे लोक बहुधा खळखळ करीत नाहीत. दुसरे म्हणजे प्रकट सार्वजनिक चर्चेला भीत नाहीत किंवा तिचे वावडे मानीत नाहीत. जी कोणती विकृती असेल ती समजून घ्यायची,तिचा व्यवस्थित अभ्यास करायचा आणि तिचे निवारण करण्याचा शिस्तीने प्रयत्न करायचा, ही त्यांची शास्त्रीय रीत आहे. विकृती होते म्हणून मूळचे स्वातंत्र्याचे तत्त्वच सोडावे, करून काही कृत्रिम नियंत्रण स्वीकारावे, अशी त्यांची भीरु प्रतिक्रिया नाही. दुसरे म्हणजे लपवालपवी केल्याने बदनामी टळते असेही त्यांना वाटत नाही. जे आहे ते प्रकट होणे ही विकृती नव्हे ते आरोग्य आहे, असा त्यांचा विचार असल्याने ते कधीही लपवालपवी करीत नाहीत. गुन्हेगार, राजकारणी असे काही लोक लपवालपवी व खोटेपणा करणार व करतात; पण या समाजाच्या वातावरणात अशी लपवालपवी फार काळ टिकत नाही. कारण या देशात लपवालपवीला किंवा आळशीपणाला किंवा अकार्यक्षम विचारजंजाळाला मान नाही !

मला हे विशेष महत्त्वाचे वाटते. प्रत्येक व्यक्तीत काही प्रमाणात आणि प्रत्येक समाजात काही विशेष व्यक्तीत, काही दुबळेपणा, दोष, अपप्रवृत्ती असणारच; पण जोपर्यंत अपप्रवृत्तींना प्रतिष्ठा प्राप्त होत नाही, जोपर्यंत या अपप्रवृत्तीच मान्य प्रवृत्ती होत नाहीत, तोपर्यंत समाजाची प्रकृती निरोगी आहे असे म्हणता येते. त्यानुसार अमेरिकन समाजाची प्रकृती अजून निरोगी आहे.

दोन घटना आठवतात.

पैशाच्या लोभाने एका मुलाला पळवून नेण्यात आले. पैसे वेळेवर पोचले नाहीत. मुलाचा निर्घृण खून झाला! पोलिसांनी नीट व त्वरेने हालचाली केल्या नाहीत, अशी वडिलांची खात्री झाली. त्यांनी पोलिसखात्यात तत्परता आणण्याचे ठरविले. काही वर्षे अविश्रांत श्रम केले. साऱ्या प्रसारयंत्रणांनी त्यांना मदत केली, शेवटी अमेरिकन कायदेमंडळांनी एक स्वतंत्र कायदा केला आणि याबाबतीत पोलिसांनी पाळायचे नियम तयार केले. यावर सातत्याने चर्चा झाली. पोलीस, सरकार, स्वत: पालक, मुलेही— कोणाचे कुठे कुठे चुकते याची उघड चीरफाड झाली सत्य बाहेर आले. भावी काळासाठी ते उपयोगी ठरले.

दुसरी घटना मिनेआ–पोलिसमध्ये घडलेली. अल्पवयीन मुला-मुलींवरील निर्दय बलात्काराची. यानंतर कसलाही आडपडदा किंवा संकोच न बाळगता वृत्तपत्रांत, दूरदर्शनवर चर्चा होऊ लागल्या, निवेदने येऊ लागली. मोठमोठ्या व्यक्तींनी आपणावर, तसेच आपल्या हातून घडलेल्या जबरीची माहिती प्रकट केली. या मंडळीत एक महिला सिनेटरही होती. 'वयाच्या आठव्या वर्षी घडलेली ही घटना आजवर मी पतीलादेखील सागितली नव्हती. आज परस्पर वार्ताहरपरिषदेत प्रकट करावी इतके या घटनेचे अगत्य मला वाटते ', असे त्या सिनेटरबाई म्हणाल्या, त्यांच्या पतीने दोन हजार मैलांवर, टीव्हीवर पत्नीची मुलाखत ऐकली. त्याची प्रतिक्रिया मनमोकळी, सरळ आणि निरोगी होती. तो वार्ताहरांना म्हणाला, 'आधी मला धक्का बसला. नंतर फार वाईट वाटले. तावडतोब उडून पत्नीजवळ जावे असे वाटले. याहीनंतर पत्नीचा मोठा अभिमान वाटला!'

हा मनमोकळेपणा, धीटपणा, खुलेपणा ही या समाजाची मोठी शक्ती आहे. हे खरे की, हा समाज स्वत:ताच गुंग आहे; पण स्वत.च्या दुबळेपणाचे ओझे इतरांवर टाकण्यापेक्षा 'आपले राखावे आणि दुसऱ्याला चांगुलपणा द्यावा' हे जास्त चांगले नाही का ?

हा खुला धीटपणा या समाजातच का आहे ? केवळ दोनशे वर्षांच्या इतिहासाचे हलके ओझे या समाजाच्या खांद्यावर आहे म्हणून ? की या देशाला वॉशिंग्टन, जेफरसन, लिंकन, रूझवेल्ट यांच्यासारख्यांचे नेतृत्व लाभले म्हणून ? की या समाजाच्या सामान्य घटकांची स्वत:ची नैतिकता शाबूत आहे म्हणून ?

आणि हे सारे यदृच्छया झाले आहे की, या देशाने गेली दोनशे वर्षे त्यासाठी जाणीवपूर्वक काही केले आहे ? □


मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

## आनंदपूरसाहिब ते दुःखनिवारण

# गुरुद्वारातून १५ दिवस

**पंजाबमधल्या प्रत्येक लहान गावी बांधलेल्या सुंदर भव्य गुरुद्वारांना काही तरी इतिहास आहे. हा इतिहास वर्षानुवर्ष अत्यंत श्रद्धेने जपला गेला आहे.**

अजित कानिटकर

त्रिवेंद्रम्–दिल्ली हा ५२ तासांचा रेल्वेप्रवास व पुढे आणखी ६ तासांचा बसचा प्रवास होऊन पजाबच्या राजधानीत चंदीगडला ११ जुलै मध्यरात्री पोहोचलो. दरम्यान 'पजाबात आता कशाला? (मरायला)' असाही प्रश्न अनेकांनी विचारून घेतला. भोपाळनतर गाडीत–स्टेशनवर सरदारजी दिसू लागले. (सरदार हा पंजाबात शीख व्यक्तीस चांगल्या नावानेच संबोधण्याचा शब्द, विनोदाने नव्हे.) गाडीतील एक सरदारजी 'पंजाबमें कभी शांती नहीं होगी' अशी जाता जाता कॉमेंट सोडून गेला.

नतरचा पंधरा दिवसांचा सर्व. प्रवास लहान–मोठ्या गावांमधून झाला. अमृतसर व पतियाळाचा अपवाद वगळता त्यात एकही मोठे शहर नव्हते. कारण शहरात प्रतिक्रिया काय असणार याचा अंदाज वृत्तपत्रांवरून करता येऊ शकत होता. त्यामुळे ही शहरे मुद्दामहून वगळली आणि 'ऑपरेशन ब्ल्यूस्टार'मध्ये सापडलेली आनंदपूरसाहिब, चमकौरसाहिब, फतेहगडसाहिब, मोगा, मुक्तसर, तरणतारण, दमदमासाहिब, गोविंदवाल, डेराबाबानानक अशी गुरुद्वारांची गावे या दौऱ्यामध्ये घेतली. अमृतसरे सुवर्णमंदिर व पतियाळाचे दुःखनिवारण गुरुद्वार यांचीही त्यात भर पडली.

पुस्तकाला ज्याप्रमाणे प्रस्तावना असते त्याप्रमाणे बहुधा गाडीतील त्या शीख गृहस्थाने दौऱ्याची पार्श्वभूमी सादर केली. पंधरा दिवसांच्या प्रवासात भरत गेले ते मुलाखतीचे, प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तीचे, संवादांचे तपशील. 'पंजाबका सत्यानाश हो गया है!' या आणखी एका कॉमेंटने समारोप पूर्ण केला असावा!

हिंदू–शीख, मोना–खालसा, हिंदू सरदार, सीख–कौम हे शब्द सर्रास कानांवर येत होते. 'पतियाळामें–जलदंरमें उनका हमने बराबर मुकाबला किया'– अशीही वाक्ये कानांवर येत होती. अमृतसरमधील सायकलरिक्षावालाही 'किसी सरदारसे कामसे ज्यादा बात मत करना' असा पोक्तपणाचा सल्ला मला देत होता. संध्याकाळी ६–६॥ वाजता भटिंडा–मोगा येथे गुरुद्वाराच्या पत्त्याची चौकशी करत असताना 'आत्ता या वेळेस गुरुद्वारात कशाला जाता?' असा संशय व चिंताही काही मंडळीच्या चेहऱ्यांवर होती 'यह हमला सीख्खोपर हुआ।' 'जो कुछा हुआ चंगा तो नही माडा ही हुआ।' या शीख समाजाच्या सर्वत्र अगदी अपवाद वगळता प्रतिक्रिया होत्या. भिंद्रानवालेवर हल्ला हा बहाणा होता, खरा उद्देश वेगळाच होता असे अनेकांचे प्रामाणिक मत.

गुरुद्वारांतून दाखले दिले जात होते. इतिहासाचे. (की जे शीख इतिहासाचा थोडासा अभ्यास असल्याने मला माहिती होते) मोगल, इंग्रज आक्रमणांनंतर नाव घेतले जात होते इंदिरा गांधी सरकारचे– सुवर्णमंदिरावर हल्ला करण्यासंदर्भातील आणि सूड घेऊ अशी भावना संयमाने सांगितली जात असताना उदाहरण मला सांगितले जात होते क्रांतिकारक उधमसिंग यांच्या लंडनमधील बहादुरी व साहसाचे. 'यह कौम एक ना एक दिन जरूर उठ जायेगी' 'इंदिरा (गांधी) कौम खतम करना चाहती थी' – ही वाक्ये अनेक ठिकाणी पुन्हापुन्हा ऐकली. फतेहगडसाहिब–गुरुद्वारात याच विषयावर चर्चा चालू असताना तेथील सेवादाराने 'शहीदोंकी यादोपर लग जायेंगे मेले' हे कवन मला ऐकवले. शहीद? कोण शहीद?

हिंदू–शीख वेगवेगळी कौम कशी आहे. आम्ही केशधारी हिंदू कसे नाही, आमचे स्वतंत्र घटनेत कलम कसे असले पाहिजे इ. तपशिलासह पुरावे खेड्यांतसुद्धा मिळत होते. त्यातल्या त्यात सौम्य विचार करणारे 'अलग नीती अपनानी चाहिए थी' – असे म्हणत भिंद्रानवाले आणि कंपनीला सत्याग्रह व शांततापूर्ण मार्गाने पकडता आले असते, सैन्य नको होते, असेही सांगत होते.

अशी ही पंजाबची यात्रा. दि. ९ ते २५ जुलै या काळातील. 'कितने वदे' असा भेटल्यानतरचा पहिला प्रश्न, उत्तर 'अकेला बंदा' ऑपरेशन ब्ल्यू स्टारनंतरचे वादळ होऊन गेले आहे. कारवाई होऊनही दीड महिन्यावर अधिक काळ उलटून गेला आहे. वरकरणी सर्व शात आहे दैनंदिन व्यवहार चालू आहेत. शहरात–गावांत केंद्रीय राखीव पोलीस व सीमा सुरक्षादलाचे जवान सुरक्षाव्यवस्थेस आहेत बहुतेक सर्व सैन्य गावाबाहेर एखाद्या शाळेत–संस्थेत मुक्काम ठोकून आहे. गरज लागली तर कोणत्याही क्षणी कामगिरीवर जाण्यास तयार असलेले. संध्याकाळनंतर भरधाव वेगाने जाणाऱ्या, मशिनगन्स सज्ज असलेल्या सैन्याच्या जीप्स मात्र सर्वत्र दिसतात. अगदी पतियाळामध्ये सुट्टी असल्याने रस्त्यावर लाकडी खाटा टाकून पत्त्यांचे डावही 'दोनो समुदायके लोग' खेळत होते. वरकरणी सर्वच शांत आहे, प्रश्न आहे ही वादळानतरची की वादळापूर्वीची शातता आहे?

### दैदीप्यमान पर्व

चंडीगढच्या सेक्टर १९ च्या गुरुद्वारात पहिल्याच दिवशी गेल्यानतर शीखसमाजाचा किती रोष झाला आहे याची काहीशी कल्पना आली. दुपारची वेळ असल्याने ५०–६० स्त्रिया गुरुवाणी–भजनास आलेल्या

होत्या. भजनानंतर चर्चा याच विषयाची. एकाही मोन्याने (हिंदूने) दुःख व्यक्त केले नाही. उलट त्यांनी मिठाई वाटली, आम्हाला बदनाम करण्याचा हा डाव होता.'

सुदैवाने चंदीगड, आनंदपूरसाहिब, चमकौरसाहिब, फतेहगडसाहिब या सर्व पंजाबातल्या महत्त्वाच्या गुरुद्वारामध्ये अतिरेकी व सैन्याची प्रत्यक्ष लढाई झाली नाही. सैन्याचे जवान येऊन गुरुद्वारे तपासून परत गेले. ही सर्व गुरुद्वारे म्हणजे शीखइतिहासातील एकेका दैदीप्यमान पर्वाची जागती–बोलती स्मारके आहेत.

आनंदपूरसाहिब म्हणजे खालसापंथाचे जन्मस्थान. गुरु तेगबहादूर यांच्या बलिदानानतर त्यांच्यावर करण्यात आलेले अंत्यसंस्काराचे ठिकाण. आनंदपूरसाहिबला व अन्य ठिकाणीही त्यामुळे तणाव व क्षोभ कमी होता. आनंदपूरसाहिबची एक लक्षात राहील अशी आठवण– एका वृद्ध निहंगबाबाजीच्या हातात वेगळ्या प्रकारचे कडे दिसले. वेगळा प्रकार म्हणजे कडे व त्यामध्येच ओवलेले लहान लहान मणी. हे कशासाठी विचारताच बाबाजीचे उत्तर फार सुखद वाटले.' या मण्याचा उपयोग रामराम, सतनाम–सतनाम, शिवशिव असा ईश्वरस्मरणासाठी जपासाठी करायचा !' बाबाजीनी स्वतःच्या हातातील आणखी एक कडे जाताना आठवण म्हणून दिले.

फतेहगडसाहिबला दर्शन झाले ते शीख समाजाच्या भाविकतेचे. गुरु गोविंदसिंह यांच्या लहान दोन मुलांनी–जोरावरसिंह व फतेहसिंह यांनी केलेल्या बलिदानाचे हे स्मारक. त्यांना ज्या भिंतीत चिणून मारले ती भिंत तळघरात जाऊन गुरुद्वारात पाहता येते. मुसलमानांचा या कृत्याचा सूड बंदाबहादूर यांनी येथे विजय मिळवून घेतला, त्यामुळे भव्य अशा गुरुद्वार असलेल्या प्रवेशद्वारास त्याचे नाव दिले आहे.

'सक्रात' म्हणजे श्रावण महिन्याचा पहिला दिवस असल्याने फार मोठा मेळा भरला होता. आजूबाजूच्या गावामधून, ट्रॅक्टर–ट्रॉलीमधून गटच्या–गट गुरुद्वारात मध्था टेकण्यास येत होते. खेडेगावात यात्रेस जसे दृश्य असते तसेच्या तसे येथेही होते. गुरुद्वाराच्या बरोबर मागे १०–१५ हजार लोक सहज बसू शकतील अशा सभागृहात सभा चालू होती. दुसऱ्या दिवसापासून सुरू होणाऱ्या अकालीदलाच्या शहीदी जथ्यात सहभागी होण्याचे आव्हान करणारे टीपेच्या आवाजातील भाषण होते. स्वातंत्र्य शहीद झालेल्यांमुळे मिळाले, चरख्यामुळे नाही अशा अर्थाची विधानेही होती. भाषणांनंतर अधूनमधून पोवाड्यासारखी स्फूर्तिगीते व्यासपीठावर गायिली जात होती. एकूण वातावरण गुरुद्वारास न शोभणारे, राजकीय पक्षाच्या प्रचारसभेसारखे झाले होते.

## उदास-विषण्ण छाया

मोगा, मुक्तसर, पतियाळादुःखनिवारण गुरुद्वार या ठिकाणी मात्र सैनिकी कारवाईत गोळीबार झाला होता. पतियाळामध्ये २० अतिरेकी तर मुक्तसरमध्ये सैन्याने केलेल्या अतिरेक्यावरील हल्ल्यात मुख्य गुरुद्वार–दरबारसाहिबला फारच मोठे नुकसान झाले आहे. त्या सर्व खोल्या बंद करून आता दुसऱ्या जवळच्याच 'इमारतीत गुरुद्वाराचे कार्यक्रम चालू आहेत. मुक्तसरमध्ये गुरुद्वारामागेच खूप मोठे सुंदर सरोवर आहे; पण त्या सर्वच वातावरणात उदास—विषण्ण अशी छाया पडलेली वाटत होती. गुरुद्वारामध्ये अनेक मंडळींना सैनिकी कारवाईबद्दल प्रश्न विचारूनही नीट उत्तरे मिळाली किंवा खूपच टाळाटाळ करण्यात येत होती.

मोगा येथे बीबीकहान गुरुद्वारात प्रमुख ग्रंथी ज्ञानी अवतारसिंह यांची भेट झाली. मोगा येथील हे गुरुद्वार प्रकाशझोतात आले. कारण अमृतसरच्या लढ्याची छोटी आवृत्तीच दोन महिन्यापूर्वी येथे घडली. एप्रिल–मे महिन्यात ८ दिवस या गुरुद्वारास सुरक्षादलाने वेढा दिला होता व राज्यपाल व अन्य अधिकाऱ्यांनी वेळीच केलेल्या हस्तक्षेपामुळे तणाव कमी झाला. अवतारसिंह सैन्यात होते व निवृत्त झाल्यानंतरचे हे काम. छोटी बहीण हिंदू परिवारात दिली आहे असेही सांगितले. गुरुद्वाराच्या गच्चीवर हिंडून बंदुकीच्या गोळ्यांच्या खुणा दाखवल्या. 'त्या आम्ही दुरुस्त करणार नाही, तशाच ठेवणार आहोत.' 'आमच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा चालूच राहील. अमरिकामे हमारे बडे संत बाबाजी (म्हणजे भिंद्रानवाले !) हाय लेव्हल मीटिंगमें हैं ! वेळ लागेल बडी लडाई है ' सैन्यात राहूनही ज्ञानीजीचा कट्टरपणा अजिबात कमी झाला नव्हता. बीबीसी व अमेरिकेचीही मंडळी फिल्म घेऊन गेल्याचे त्यांनी सांगितले.

मोगा हे खरं तर तालुक्याचे गाव, गव्हाची पंजाबातील सर्वात मोठी बाजारपेठ. तेथील ज्ञानी अवतारसिंह यांची ही प्रतिक्रिया तर मोगापासून लुधियाना रस्त्यावरील १८ कि.मी अंतरावर अजितवाल या गावात मेजरसिंग नावाचा एक दहावी उत्तीर्ण तरुण शेतकरी, त्याची मुलाखत म्हणजे भिंद्रनवाले विचाराचा किती खोलवर परिणाम व प्रभाव झाला आहे हे दर्शविणारी. 'चंदीगड आता घेऊन काय करायचे ? आमचे गुरुद्वार त्यांनी भ्रष्ट केले. विमान पळविणारे (जनता कारकीर्दीत) आमदार होतात आणि तेच शिखांनी केले तर त्यांना गोळ्या घालून मारतात !'

या प्रतिवादास उत्तर नाही ! 'जुलुमाविरुद्ध शस्त्रे घ्या हा दहाव्या गुरूंचा संदेश होता तो आम्ही मानायचा का इंदिरा गांधींचा मानायचा...रामाचे धनुष्य, श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र, शिवाचे त्रिशूळ होते. आम्हीही शस्त्रे ठेवतो यात चूक नाही...' भिंद्रनवालेंचा उपदेश त्याने जसाच्या तसा सांगितला ! दर्शनसिंग नावाचा सैन्यातला एक निवृत्त जवान– 'मोगा येथे आमची दोन अत्यंत सज्जन माणसे अतिरेकी म्हणून पोलिसांनी मारली. ते अतिरेकी होते, यावर आम्ही कसा विश्वास ठेवायचा ?'

मुक्तसर–जलालाबाद रस्त्यावर लध्धुवाल म्हणून हजार वस्तीच्या गावातील तन्नासिंग याची अशीच भेदक प्रतिक्रिया. 'छोटे मछलीको बडी मछली खा रही है ।' याच गावात हरनेकसिंग नावाचा आणखी एक निवृत्त जवान भेटला. संपूर्ण दौऱ्यात जी फारच कमी मंडळी आढळली त्यातला हा एक. 'ही कारवाई झाली हे चांगले झाले. २।५ म्हणतात वाईट झाले; पण ३।५ जणांना वाटते ठीक झाले. गरीब माणसाचे आयुष्य फार हलाखीचे झाले होते.'

या भागातून सीपीएमचा आमदार निवडून गेला आहे. हरनेकसिंग मझबी सिख म्हणजे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजातील आहे. गावात सर्वत्र दिवे आहेत. याच्या घरी मात्र नव्हते. स्वतःचे शेत नसल्यामुळे शेतमजूर म्हणून तो काम करतो. कॉंग्रेस सरकारने शैक्षणिक – नोकऱ्यांमध्ये सवलती दिल्यामुळे मझबी सिख हे अकाली समर्थक नसून कॉंग्रेसचे समर्थक आहेत. पंजाबातही

जो काही पाठिंबा शिखांमध्ये कॉंग्रेसला आहे त्यातील बहुसंख्य महजबी सिख आहेत. दौऱ्यात इतरत्रही सैनिकी कारवाईचे स्वागत करणारे जे अपवादात्मक सिख भेटले ते सर्व महजबी सिखच होते.

तरणतारणला गुरुद्वारात दर्शन घेतल्यानंतर गुरुद्वारप्रबंधक समितीच्या कार्यालयात गेलो असतानाच योगायोगाने तेथे तरणतारण लोकसभामतदारसंघातून निवडून आलेले अकाली दलाचे खासदार श्री. लहानसिंग तूर यांची भेट झाली. श्री.लहानसिंग पुण्यास फरुक अब्दुल्ला – अरुण शौरी सभेस आले होते. लोकसभा सदस्यत्वाचा त्यांचा राजीनामा लोकसभा सभापतींकडेच अजून निर्णयाशिवाय पडून आहे. श्री. लहानसिंग यांची भेट व मुलाखत म्हणजे अकालीदलाच्या ताठरलेल्या भूमिकेचे निदर्शक आहे.

सैन्याने केलेल्या 'कथित' अत्याचारांची यादी श्री. लहानसिंग यांनी सांगितली. सरकारने अकालीदलाच्या मागण्या एकतर्फी मान्य केल्या तर सर्व प्रश्न सुटतील का? या माझ्या प्रश्नावरचे त्यांचे उत्तर धक्कादायक होते. 'प्रश्न सुटणार नाहीत, आता आमचा लढा मागण्यांपुरता मर्यादित नाही. प्रश्न आहे की, शिखांनी दुय्यम नागरिक म्हणून भारतात आणखी किती काळ राहायचे; तुम्हाला मान्य करावेच लागेल की, Sikhs are a seperate nation' ही सर्व विधाने तर फाळणीपूर्वीच्या द्विराष्ट्रसिद्धांतासारखीच आहेत की, ज्यातून फाळणी घडली–या माझ्या प्रश्नावरचे त्यांचे विधानही असेच प्रक्षोभक–'हो, जर इंदिरा सरकारने शिखांना विशेष हक्क (Special status) दिले नाहीत तर कदाचित होईल सुद्धा. शिखांनी भारतात राहावे का न राहावे, हे सरकारने ठरवायचे आहे. पंजाबात कधीही शांतता राहणार नाही. लोक सैन्याशी लढतील. फक्त हिंदू व हरिजन यांचा सरकारला पाठिंबा आहे. बाकी सर्व शीख आता अकालीदलाचे कट्टर समर्थक बनले आहेत!'

शिखांना भारतात दुय्यम नागरिकत्व असल्यासारखी वागणूक आहे का? ते तर सर्व देशभर सन्मानाने सर्व क्षेत्रांत आहेत–या माझ्या प्रश्नास सगळीकडे अगदी लहानासिंग यांनीही उत्तर दिले. हरियाणात कर्नाल पानिपतमध्ये घडलेल्या दंग्याचे व आशियाई खेळापूर्वी हरियाणात सर्वत्र हमरस्त्यांवर शिखांना मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीचे. फक्त ही दोन उदाहरणे 'सेकंडक्लास सिटिझनशिपच्या' समर्थनार्थ गंभीरपणे मांडली गेलीत. समजूतदारपणे, विचारपूर्वक तपासून विधाने करण्याच्या पद्धतीस येथे अजिबातच वाव नाही.

## सुवर्णमंदिरातील करसेवा

दमदमासाहिब–तलवंडीसाबो येथून १९ जुलैला पुढचा कार्यक्रम होता तरणतारणला जाण्याचा, एका अर्थाने पंजाबचा दक्षिण–उत्तर असाच प्रवास. तथापि अकाली दलाच्या शहीदी जथे पाठविण्याच्या निर्णयामुळे अमृतसरमध्ये संचारबंदी १५ पासूनच लागू केलेली होती. बाहेरगावाहून येणाऱ्या बसेस थांबविण्यात आल्या होत्या. दमदमासाहिब ते भटिंडा, भटिंडा ते फरीदकोट, फरीदकोट ते जीरा. जीरा येथे कळले बस मख्खूपर्यंत जाते. जितके अमृतसरपर्यंत जवळ जाता येईल तितके जाण्याच्या प्रयत्नात होतो. मख्खूमध्ये समजले की, अमृतसरच्या बसेस सकाळपासून सुरू झाल्या आहेत. संचारबंदी आहे की नाही याचीही विशेष कोणाला माहिती नाही. इतकी बहुधा गेल्या दोन वर्षांत त्याची जनतेस सवय झाली असावी! दमदमासाहिबहून सकाळी निघून तीन ठिकाणी बस बदलून अमृतसरला दुपारी ४॥ वाजता पण सुवर्णमंदिरात 'करसेवा' चालू असल्याने दर्शनास जाता येणार नाही हा स्थानिक मंडळीचा सल्ला ऐकून 'इतक्या लांब येऊन सुवर्णमंदिरात न जाता परतावे लागते का काय' अशी शंका चाटून गेली.

दुसऱ्या दिवशीच सकाळी सुवर्णमंदिरात घंटाघर या मुख्य प्रवेशद्वाराच्या अलीकडेच ५०–१०० फूट तारांची वेटोळी घालून रस्ते अडवलेले दिसले. फक्त 'करसेवा' करणारी मंडळी आत जाऊ शकत होती. पोलीसकार्यालयातही 'प्रवेशपत्र' वगैरे मिळणार नाही अशी माहिती कळली. प्रवेशपत्र मिळत होती फक्त ब्रिगेड हेडक्वार्टर सैन्याच्या कार्यालयातून किंवा बाबा सन्तासिंग यांच्या बुर्ज फुलासिंग गुरुद्वारामधून!

बुर्ज फुलासिंग गुरुद्वार जेथे बाबा सन्तासिंग व त्यांचे २००–२५० निहंग तळ देऊन आहेत. दरवाजापाशीच सैन्याचे दोन सशस्त्र जवान आत जाणाऱ्यांची झडती घेऊन मगच सोडत होते. बाबा सन्तासिंग एका तात्पुरत्या उभारलेल्या तंबूखाली कार्यालय थाटून. तेथेही सैन्याचे सशस्त्र जवान आहेतच. तात्पुरते टेलिफोनकनेक्शनही तेथे आले आहे. बाबाच्या आजूबाजूस दोन बंदूकधारी निहंग शरीरसंरक्षक म्हणून सज्ज आहेत. इमारतीवर छपरावर आणखी एक निहंग बंदूक घेऊन पाहऱ्यासाठी. तलवार व ढालधारी निहंगही परिसरात आहेत. मी बऱ्याच लाबून आल्यामुळे माझे काम ओळखपत्र इ. दाखवून लवकर होते. तेथील एक तगडा धिप्पाड जथेदार अमृतसिंगबरोबर सायकलरिक्षाने पुन्हा सुवर्णमंदिराकडे! अमृतसिंग बरोबर असल्याने प्रवेशपत्र इ. काही आवश्यक नाही. कारण तो बाबा संतासिंग यांचा माणूस आहे! अमृतासिंगबरोबरही सायकल रिक्षात २ बंदूकधारी शरीरसंरक्षक आहेत! अन्य भाविक मंडळींना फूलासिंग गुरुद्वारात लेटरहेडच्या एका लहान चिठोऱ्यावर सहीशिक्क्याने एक वृद्ध शीख परवानगी देतो आहे. सुवर्णमंदिरात जायला पूर्वी कोणाचीच परवानगी लागत नसे. आता मात्र बाबा संतासिंग यांची लागते!

घंटाघर – प्रवेशद्वारातून एकदा आत शिरल्यानंतर मात्र मी एकटाच सुवर्णमंदिरात हिंडतो. काही जवानमंडळी गणवेषात सामान हलविणे अशी बारीकसारीक कामे करत होती. गणवेषात नसलेली व साध्या कपड्यातीलही जवानमंडळी एकूण त्यांच्या वागण्यावरून सहजच ओळखू येत होती. परिक्रमा हिंडून पाहताना हरमंदिरसाहिबमधील गायिल्या जात असलेल्या गुरुवाणीचे स्वर कानांवर पडतात. काही तरी वेगळाच अनुभव आल्यासारखे वाटते. परिक्रमा हिंडून प्रत्यक्ष हरमंदिरसाहिबमध्ये मध्या टेकणे अर्धा तास भजन ऐकून प्रसाद घेऊन मंदिराबाहेर मी येतो.

¤

सुवर्णमंदिर चित्रात पाहणे आणि प्रत्यक्ष पाहणे यात असलेला फरक वेगळाच आहे. तेथे एवढी मोठी लढाई होऊन सुद्धा प्रवेशदाराच्या पायऱ्या उतरून परिक्रमेला चक्कर मारून हिंडताना आणि प्रत्यक्ष दरबारसाहिबमध्ये दर्शन घेताना एक वेगळेच भारलेले वातावरण अनुभवास आले. ते कदाचित

शब्दांमध्ये सागता येणार नाही.

दर्शन घेतल्यानंतर मीही काही वेळ कर-सेवेमध्ये भाग घेतला. मुख्यतः माती-विटा बाहेर हलविण्याचे काम चालू होते. २००-२५० हून जास्त मंडळी नसावीत. तीन शुभ्र खादीधारी मंडळीही एक-दोनदा घमेली डोक्यावरून जपून जपून वाहून नेत होती. 'दूरदर्शनच्या' चित्रीकरण पथकाने ते दृश्य बरोबर टिपले. 'करसेवा' जोरदार चालू आहे अशी ठळक बातमी त्या दिवशी देशभर पोहोचली ! ही तीन मंडळी स्थानिक कांग्रेस (आय) आमदार आहेत अशी माहिती जवळच्या एकाने पुरवली. 'सिर्फ खालसा अमृतधारीही करसेवा मे आ सकते हैं-' असा टोमणा एका निहंगाने मला जाता जाता सुनावला. दुपारी १२॥ वा. लंगर सुरू झाला, त्याचेही चित्रीकरण दूरदर्शनने केले.

¤

'पिंडोंसे देहाडीपर हमें लाया गया है'- खेड्यातून दिवसाच्या मजुरीवर पैसे घेऊन आम्ही आलो आहोत. तथाकथित 'करसेवा' करणाऱ्या त्या दिवसाच्या 'भाविकांपैकी' एकाने स्वत: मला ही माहिती सांगितली आणि तशी अनेक मंडळी नंतरच्याही दिवसात येत होती.

लंगरमध्ये प्रसाद घेतल्यानंतर सर्व सुवर्ण-मंदिरपरिसर त्याने पुन्हा एकदा दाखवला, अगदी बारीकसारीक बारकाव्यासह - पूर्वी काय होते आणि नव्याने (सैन्याने) काय दुरुस्त केले गेले आहे ! खरोखरच सुवर्ण-मंदिरपरिसर पाहताना शनिवारवाडा-राजगड-रायगड यासारख्या लढाईत होर-पळून गेलेला एखादा ऐतिहासिक किल्ला-वास्तू पाहतो आहोत असे वाटत होते. येणारी ही भाविक मंडळी दर्शनास कमी वेळ पण हे अवशेष पाहण्यात अधिक वेळ घालवताना दिसत होती. त्यातील अधिक माहितगार मंडळी 'धावते वर्णन' करत होती लढाई कशी-कोठून झाली याचे !

अकालतख्त, सोन्याचा कळस व आश्चर्य-कारकरीत्या वाचलेले कोठासाहिब (गुरु-ग्रंथसाहिब ठेवण्याची जागा) याशिवाय पूर्ण नामशेष झाले आहे; पण अधिकृत सरकारी धोरणांनुसार या नामशेष झालेल्या अकाल-तख्ताचे एकही छायाचित्र प्रसिद्ध झालेले नाही !

## गोली नहीं चलायी ?

हे सर्व पाहताना लोक हळहळत होते, दुःख व्यक्त करत होते आणि सरकारला शिव्या देत होते. बरोबरच्या माहितगार व्यक्तीबरोबर मी हरमंदिरसाहिबमध्ये पुन्हा एकदा जातो. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर तो मला आजूबाजूस लागलेल्या गोळ्यांच्या खुणांकडे लक्ष वेधून घेतो. संगमरवराचे तुकडे उडाले आहेत, सोन्याच्या पत्र्यामध्ये भोके आहेत. आतील छतावरच्या काचा फुटल्या आहेत. सोन्याच्या एका कळसाची झुबरे आगीने काळी पडली आहेत. हे सर्व मला तो त्यातील बारीकसारीक तपशिलासह दाखवितो आहे. तिसऱ्या मजल्यावर जेथून गुरु-ग्रंथसाहिबाचा २४ तास पाठ चालायचा तेथेही तो नेतो 'यहाँ पाँच सिंग शहीद हो गये !' ...शहीद...?

बरोबर आलेली मंडळी हळहळतात. 'उन्होंने हरमंदिरसाहिबकी ओर एक भी गोली नही चलायी...' सैनिकी कारवाईनंतर सतत चार-सहा दिवस हा प्रचार आता बूमरँगप्रमाणे सरकारवर उलटतो आहे. सहजगत्याही ५०-१०० गोळ्यांच्या खुणा तेथे सहज दिसतात. '...याचा अर्थ खुद्द हर-मंदिरमधून अतिरेकी गोळ्या मारत होते. एवढ्या लढाईत कोठून तरी गोळ्या लाग-णारच. सैन्याने कशावरून झाडल्या, अति-रेक्यानी स्वतःच ते नुकसान तर नाही केले..' जेथे भावना व फक्त भावनावेगच माणसांवर हुकुमत गाजवितात त्या वेळेस बुद्धीस प्रमाण धरून विचारलेले वरील प्रश्नही निरर्थक ठरतात.

लंगरनंतर सुवर्णमंदिरातील गर्दी वाढली आहे. करसेवेचे निमित्त करून दर्शनास व त्यापेक्षा अवशेष पाहायला येणाऱ्यांचीच संख्या जास्त आहे. मला गुजरात-मोरवी महापुरानंतर मदतकार्यास येणाऱ्यांपेक्षा टूरिस्ट बसेसमधून 'पूर कसा असतो' व 'नुकसान' पाहायला येणाऱ्या टूरिस्टांची आधी आठवण झाली. 'यापूर्वी जेव्हा सुवर्ण-मंदिरसरोवर स्वच्छ करण्यासाठी करसेवा झाली तेव्हा इतकी गर्दी झाली की, दरवाजे बंद करून लोकाना विनंती करायला लागली की, स्वयंसेवक खूप झाले, याहून जास्त नकोत-' सुवर्णमंदिरातच एकाने सांगितलेल्या या विधानात कदाचित अतिशयोक्ती असे-लही; पण त्या करसेवेचे जे छायाचित्र पाहिले त्यामानाने ही 'करसेवा' म्हणजे नाटकच आहे. खुद्द अमृतसरमधीलही कोणीच या करसेवेत नाहीत.

२० जुलैनंतर मी २२ जुलैला पुन्हा एकदा सुवर्णमंदिरात जाऊन आलो. या वेळेस तर बाबा सन्तासिंग यांच्या डेऱ्यावर जाण्या-चीही गरज पडली नाही. करसेवेस जाणाऱ्या एका बसमध्ये घुसलो. चंदीगड-जालंदर येथून दर्शनास आलेले आणखीही २०-२५ प्रवासी-यात्रिक त्यात घुसले. कोणी तरी खादीधारी तरुणाने 'ही आमची माणसे आहेत' अशी शिफारस दिल्यानंतर प्रवेशपत्र नसल्यामुळे ताराच्या वेटोळ्यापाशी अडवि-णाऱ्या सशस्त्र जवानांच्या नाकावर टिच्चून ही २०-२५ मंडळी व मी सुवर्णमंदिरात गेलो !

सुवर्णमंदिराचे रूपच बदलून गेले आहे ! सुवर्णमंदिराच्या प्रत्येक दरवाजात भिंती-वरील मोठ्या संगमरवरी फरशांवर युद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय सैनिकांच्या आठवणीप्रीत्यर्थ त्यांच्या पलटणीने दिलेल्या देणग्यांच्या मोठ्या याद्या किमान ३०-४० तरी आहेत. त्यामध्ये सेकंड लेफ्टनंट अरुण क्षेत्रपाल, ले. कर्नल तारापोरवाला यांचीही गौरवास्पद नावे आहेत. किंबहुना एक चांगली प्रथाच होती की, अमृतसरसरहद्दीवरील जवान युद्धापूर्वी व युद्धानंतर सुवर्णमंदिरात मोठ्या श्रद्धेने मथ्था टेकण्यास येत. आपल्या सहकाऱ्याची स्मृती अशा देणग्या मंदिरास देऊन कायमची करून जात. त्याच सैन्याला दुर्दैव म्हणजे या मंदिरमुक्ततेसाठी लढावे लागले आणि त्यात ९०-१०० जवान बळी पडले. सुवर्णमंदिराच्या आजूबाजूच्या सर्व मोठ्या इमारती लष्कराने ताब्यात घेतलेल्या दिसतात. लष्कराचे सशस्त्र जवान या उंच ठिकाणावरून अजूनही मोर्चेबंदी करून आहेत. गुरुनानकनिवास, रामदास-सराय अजूनही सैन्याच्याच ताब्यात आहे.

## सर्व ठीकठाक होईल !

अमृतसरमधील दुर्गियाणा मंदिरामध्ये काही युवकांची भेट झाली आणि भावनांचा प्रक्षोभ झाल्यानंतर, अतिरेकी विचार कसे अधिकार गाजवितात ते लक्षात आले. 'तुम्ही गेलात का ? सुवर्णमंदिरात करसेवेस जाणार आहात का ?' या माझ्या प्रश्नांवर ते खव-

ळले. 'आम्ही कशाला जावे, ते येतात का आमच्या मदिरात आणि तेथे आहे काय ? दुर्गियाणा मंदिरासारखे तेही एक, तसेच बाधलेले...इ. जो जो सिख वह उग्रवादी है। पजाबातील हिंदू समाजाची ही प्रातिनिधिक प्रतिक्रिया आहे, किंबहुना जसेजसे अमृतसरच्या जवळ जावे, तो तो ही प्रतिक्रिया अधिक कडवट, तिरस्कारयुक्त होत जाते. सैनिकी कारवाईनतर आम्ही मिठाई वाटली, असे सांगणाराही एक सज्जन या गटात होता.

सैनिकी कारवाईनंतरची मलमपट्टी Healing Touch वगैरे मोठमोठे शब्द पुढारीमडळीं करीत आहेत. ही मलमपट्टी खरीच लवकर करायला हवी असेल तर, ती युवकांच्या मनात. ज्या पिढीने १९४७ ची फाळणी व त्यातील अग्निदिव्य अनुभवले ती पिढी समजूतदारपणे वागू शकेल. कारण हिंदु-शीख विवाह-नाती या पिढीस बांधन ठेवू शकतील तशी ती आहेत. दुर्दैवाने हे विवाह होण्याचे प्रमाण धोकादायकरीत्या कमीकमी होत चालले आहे. शीख अतिरेकी जे या कारवाईत मृत्युमुखी पडले, सापडले गेले ते सर्व १५ ते ३० या वयोगटातले होते. या अतिरेक्याची पुढची पिढी-वारसदार या 'शहीद' झालेल्यांचा वारसा घेऊन, त्यांना स्फूर्तिस्थानी ठेवून वागतील, अशी एकीकडे भीती तर हिंदु युवकांची प्रातिनिधिक प्रतिक्रिया वर लिहिलीच आहे. अशा दूषित वातावरणात 'अपराधा विसरुनी प्रेमे पुन्हा पुन्हा सांधू' असे म्हणण्यास पुढे येणाऱ्याची सख्या फार अल्प आहे,

एका हिंदुनिष्ठ संघटनेच्या अमृतसरमधील कार्यकर्त्यांना 'पुढे काय होईल ?' असे मी विचारताच ते म्हणाले, 'काही नाही. सर्व ठीकठाक होईल !' तेथेच उपस्थित असलेला एक अनुभवी युवक उद्गारला- 'अॅक्शननंतर रि-अॅक्शन होणारच !' त्यावर त्या कार्यकर्त्यांची कोटी- 'अॅक्शन-रि-अॅक्शनचा परिणाम शून्यच होतो ना, आपण काही पंजाब सोडून जात तर नाही ना !' अनुभवी विचारवतांचा असा दृष्टिकोन असल्यावर, सामान्य जनतेची प्रतिक्रिया क्षोभजनक असणार यात काही आश्चर्य नाही !

'करसेवेचे नाटक करून सरकार आमच्या भावनांशी खेळत आहे. अकालीदलाला खच्ची करायला त्यांनीच भिंद्रनवाले यांना पाठीशी घातले आता पुन्हा बाबा सतासिंगला पुढे केले आहे सरकार या इतिहासावरून काही शिकलेले दिसत नाही.' एका शीख युवकाने हे जळजळीत उद्‌गार अमृतसरमध्ये ऐकवले. पतियाळा दुःखनिवारणगुरुद्वारात अशीच प्रतिक्रिया. 'जिन्होंने पाला था, उन्होंने ही उनको मार दिया !'

ऑपरेशन ब्ल्यूस्टारच्या काळातील व नंतरही अजून पंजाबात अफवाचे साम्राज्य आहे. 'अंदर बहुत जादा बंदे मरे'- सुवर्णमंदिरात हल्ल्यामध्ये सरकारी आकड्यापेक्षा कितीतरी जास्त माणसे मेली असे अनेकाना वाटते, खुद्द सैन्याने जवानाचा दिलेला आकडाही पुष्कळाना संशयास्पद व कमी करून दिलेला वाटतो. अफवा काय तऱ्हेच्या असू शकतात - चमकौरसाहिब-गुरुद्वारात दौऱ्याच्या दुसऱ्याच दिवशी तेथील सेवाधारी मंडळींनी पतियाळामध्ये सैन्याच्या अत्याचाराच्या रसभरित कहाण्या ऐकवल्या. या पार्श्वभूमीवर पतियाळा दुःखनिवारण गुरुद्वारात मी तेथील अधिकाऱ्याना मुद्दामहून नक्की आकडा विचारला, येथे कितीजण कारवाईमध्ये बळी पडले? उत्तर २० अतिरेकी, ४ निशानसाहिबजवळ, १६ सरायमध्ये. चमकौरमध्ये आकडा सागितला होता २००० ते ३००० स्त्रिया ! चमकौरसाहिब ते पतियाळा अतर १२५ कि. मी. हून जास्त नाही आणि तरीही सरकारी प्रचार-माध्यमावरचा विश्वास उडाल्यानंतर काय होऊ शकते याचे हे लहानसे उदाहरण आहे

भिंद्रानवाले यांचा मृत्यू हासुद्धा जनतेस वावड्या उठविण्यास मिळालेला मोठा विषय आहे. सरकारने आठवड्याच्या आत त्याच्या मृतदेहाचा, पोस्टमार्टेमनतरचा फोटो किंवा काही तरी छायाचित्र प्रसिद्ध करायला हवे होते ते न झाल्यामुळे 'ते अवतरणार आहेत, हल्ल्यापूर्वीच ते सुवर्णमंदिरातून बाहेर पडले होते' अशी आशावादी विधाने खेड्यातीलच नव्हे तर शहरातीलही शिक्षित मडळी करत आहेत. मला स्वतःला असे पाचसातजण तरी भेटले आणि पुन्हा या सगळ्याला ऐतिहासिक दाखला देतात तो गुरु गोविंदसिंह याचा की, ते पाच खालसानी आज्ञा केल्यानतर चमकौरगढीतून रात्रीच्या वेळेस असेच निसटून गेले व मोगलाना वाटले ते हल्ल्यात सापडले ! सरकारी प्रचार-माध्यमांना लवकरात लवकर हरवलेली विश्वासार्हता मिळवायला हवी आहे. नाही तर बी. बी. सी. व लाहोर दूरदर्शन ऐकणाऱ्यांची संख्या वाढतीच राहील.

## राधास्वामी सत्संग-डेरा

सैनिकी कारवाईनंतर पंजाबात प्रवास करताना अपवादात्मकच अशा काही जागा आढळल्या की, त्या पाहून ज्यांनी 'पंजाबका सत्यानाश हो गया' अशी अनिष्ट भाकिते वर्तवली होती ती खरी होणार नाहीत, अशा आशेचा एखादा सूर सापडावा. सध्याच्या राजकीय अदाधुंदीच्या वाळवंटातील व्यास हे असेच काहीसे एक हिरवळ असलेले स्थान, काहीसा दिलासा देणारे की, पजाबी समाजास विघटनापासून थांबवणारे काही धागे अजूनही शिल्लक आहेत.

अमृतसर-दिल्ली शेरशहासूरी राष्ट्रीय मार्गावर अमृतसरपासून सुमारे ४० कि.मी वर बिआसनदीच्या काठी 'राधास्वामी सत्संग डेरा-व्यास' या नावाने खूप मोठे विधायक कामाचे केंद्र उभे आहे. राधास्वामीपंथ या नावाने पंजाबात-उत्तरभारतात व परदेशातही या पंथाची अनेक सत्संगकेंद्रे आहेत. भारतात सुमारे ३२५ व परदेशात २०० हून अधिक केंद्रे असलेल्या राधास्वामीसंप्रदायाचे सुरुवातीचे प्रवर्तक बाबा जयमलसिगमहाराज. १५ ऑगस्ट १८९१ मध्ये बिआसनदीकाठी या सप्रदायाची सुरुवात झाली. बाबा जयमलसिंग यांच्यानतर बाबा सवानसिंग, सरदार बहादूर जगतसिंग व त्यांच्यानतर सध्या महाराज चरणसिंग या संप्रदायाचे प्रमुख अध्वर्यू म्हणून आहेत.

रविवार २२ जुलैला सकाळी राधास्वामी-सत्संग-डेरा पाहण्यास गेलो. रविवार व सकाळी ८ ते ९॥ 'सत्संग' असल्यामुळे आजूबाजूच्या लहान-मोठ्या शहरामधून ट्रॅक्टर-बसेसमधून पुष्कळ मंडळी येत होती. व्यासपरिसरात सर्व व्यवस्था डेऱ्याचेच कार्यकर्ते चोखपणे पाहात होते. एका मोकळ्या हिरवळ असलेल्या पटांगणावर तात्पुरता मांडव उभारून बसण्याची सोय केली होती. सत्संग सुरू होण्यापूर्वी उपस्थित मंडळी गुरुग्रंथसाहिबमधील भजने

म्हणत होती. सुमारे ८–१० हजारांचा तरी तो समुदाय असावा. स्त्रियाही मोठ्या सख्येने होत्या. हिंदू–शीख अगदी निम्म्या-निम्म्या प्रमाणात असावेत असे दृश्य त्या समुदायावरून दिसत होते. ८ ते ८॥ भजन झाल्यानंतर 'सत्संग' म्हणजे प्रवचन सुरू झाले. पजाबीत जरी होते तरी त्याचा भावार्थ समजू शकत होता. गुरु नानकदेव यांच्या एका अभंगावर निरूपण होते. महाराष्ट्रात, केरळात वा तामिळनाडूत अशा प्रवचनात जे ऐकायला मिळेल तेच तेथेही–फक्त श्रोते पंजाबी. आशय तोच. 'शरीर केवळ हाडामासाचे नाही — — सर्व जग दुःखमय आहे. मग खरी शांती कशात आहे — — शबद म्हणा, शबद हीच जगाची सुरुवात — — गुरुमुख आवश्यक आहे — — तीर्थयात्रा, सरोवरस्नान, जगलपहाडात तपश्चर्या हे कर्मकांड कशाला–सर्व आत-मध्येच आहे — — मन हत्तीसारखे आहे; पण माहुताप्रमाणे त्यावर अंकुश ठेवा. मन बहिर्मुख आहे, नामसकीर्तन करा. — —'

अभंगाची एक एक ओळ गायिली जात होती. मग त्यावर विवेचन, त्यानंतर पुढचे कवन. सुमारे एक तास धीरगंभीर, खोल आवाजात सत्सग–प्रवचन चालू होते. कोठेही प्रवचनात राजकारण नाही किंवा भडकवण्याची भाषा नाही की, आवाज चढवून केलेले विवेचन नाही. शात वाहणाऱ्या एखाद्या नदीप्रमाणे तासभर भाषण चालू होते व ८–१० हजारांचा तो समुदाय शांतपणे व भाविकतेने ते सर्व ऐकत होता. भाषणानंतर ९॥ वाजता सर्वजण पुन्हा परतू लागले. काही मडळी करसेवेच्या पथकात सहभागी होण्यास गेली. पंचमी यासारख्या विशेष दिवशी ७०–७५ हजार भाविक सत्सगासाठी जमतात अशी परतताना एकाने माहिती दिली.

अमृतसरला परतणाऱ्या बसमध्ये बसल्या-नंतर दोन्ही दृश्ये नजरेसमोर येत होती. एक चार–सहा दिवसांपूर्वीचे फतेहगडसाहिब-गुरुद्वारामधील 'संक्रांती'च्या दिवशीचे, शहिदी जथ्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करणारे आवेशपूर्ण भाषण आणि आजचे व्यास येथील. दोन्हीकडे जवळपास तितक्याच संख्येने भाविकमंडळी आली होती; पण व्यासपीठावरील भाषण करणाऱ्या मंडळीच्या पद्धतीत व आशयात जमीन-अस्मानाचा फरक होता. 'व्यासपीठावर बसणारी मंडळीच सर्व प्रश्न निर्माण कर-तात का?' — माझ्या मनात उगाचच प्रश्न उद्भवला.

पंजाब हे खरे तर अनेक विविध मतांचे, साहचर्याने नांदणारे स्थान, गेल्या चार-सहा वर्षांत आणि विशेषत: अकाली-निरंकारी वादानंतर खूपच गढूळ वातावरणाने भरून गेले आहे. महाराष्ट्रातून पंजाबात जाऊन भक्तिमार्गाची ध्वजा दृढ करणारे श्रीसंत नामदेव याचे एक मदीर दौऱ्यात योगायोगाने पाहण्यात आले.

फतेहगडसाहिब गुरुद्वारापासून सुमारे १२ कि. मी. अंतरावर बस्सी पठान येथे संत नामदेवमंदिर बांधले आहे. संत नामदेवमहाराज पजाबात प्रचारास आले असताना या ठिकाणी त्यांचा डेरा होता, बराच काळ ते येथे होते व त्यानुसार अगदी अलीकडे १९२५ मध्ये हे मदिर बांधण्यात आले, अशी व्यवस्थापकांनी माहिती दिली. आणखीही असे एक मदीर घुमान येथे आहे अशीही त्याच्याकडून माहिती कळली. मंदिराची रचना गुरुद्वारासारखीच अशी होती; पण दुर्दैवाने 'मंदिरपणाचे' गुणधर्मही तेथे होते. खुद्द मदिरात व आजूबाजूस असणारी अस्वच्छता पुष्कळ काही सागून जात होती. तेथील दोन–तीन तासांच्या वास्तव्यात जेमतेम ३–४ भाविक दर्शनास येऊन गेले.

मंदिराच्या आवारात दुकाने असलेल्या काही व्यापारी हिंदूमंडळीशी बोलणे झाले. पंजाबातील हिंदूमडळी प्रश्नांना जशी उत्तरे देतील तशी दिल्लीत बसूनही देता येतील. फरक पडेल तो फक्त तपशील, अतिशयोक्ती इ. चा. 'सैन्याची तर कारवाई अजून सपलेली नाही. अजून ते राहायला हवेच आहे. कोणीही हिंदू यापुढे घरातला मुलगा कदापि शीख करणार नाही...' पंजाबात बोलताना अनेकांनी अनेक प्रकारची भविष्यवाणी व भाकिते केली, या सद्गृहस्थाचे असेच भाकित धक्कादायक... 'मी नाही तरी आमची मुले खलिस्तान पाहतील. ते होणार हे अटळ आहे.' नामदेवमंदिर पाहून परतताना माझ्या डोळ्यांसमोर दृश्य होते निमर्नुष्य अशा या मंदिराचे आणि या सद्गृहस्थांनी उभे केलेल्या चित्राचे.

### आओ जी, बैठो जी ...

पंधरा दिवसांच्या या दौऱ्यामध्ये अमृतसर आणि चंदीगढचा अपवाद वगळता प्रत्येक लहान-मोठ्या गावी माझा मुक्काम गुरुद्वारातच होता. पंजाबातील गुरुद्वारामध्ये राहणे हा एक आनंददायक अनुभव असतो. प्रत्येक छोट्या–मोठ्या गावी गुरुद्वार हे असणारच. अगदी मोगा या तालुक्याच्या गावी सुद्धा ४० हून अधिक गुरुद्वारे आहेत. पतियाळा, आनदपूरसाहिब–फतेहगडसाहिब यासारख्या ऐतिहासिक गावी भव्य गुरुद्वारे करसेवेमधून उभी राहिली आहेत. प्रत्येक गुरुद्वाराशेजारी श्रद्धाळू यात्रेकरूंसाठी बांधलेली 'सराय' आणि भोजनासाठी 'लंगर' असणारच. किंबहुना 'सराय' व 'लंगर' हा गुरुद्वारव्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे.

या सर्व गुरुद्वारांमध्ये अतिशय आपुलकीने आतिथ्य करणारी सेवादार व निहंगमंडळी आहेत. गेल्यानंतर कानावर शब्द येणार– 'आओ जी, वैठो जी, प्रसाद चखो जी' (प्रसाद घ्या !) अनेक ठिकाणी साठी उलटलेली मडळीही गेल्यानंतर 'काय सेवा करू' असे विचारून बुचकळ्यात टाकत. असे स्वागत–आतिथ्य केल्यानंतर मगच कोठून आलात–काय काम हे व्यावहारिक प्रश्न. या प्रत्येक गुरुद्वारामध्ये यात्रेकरू तीन दिवस 'सराय'मध्ये मोफत राहू शकतात, लगरमध्ये भोजन घेऊ शकतात.

गुरुद्वारामध्ये रात्री मुक्काम केल्यास पहाटे जाग येते ती अतिशय सुरेल अशा भजनांनी. पहाटे ४॥–५ वाजता भाविकतेने गायिलेल्या गुरुबाणीचे शब्द कानावर पडताना मला आठवण झाली ती तिरुपतीला पहाटे ऐकलेल्या एम. एस. सुब्बालक्ष्मी यांच्या 'श्रीवेंकटेशसुप्रभातम्‌ची !' या सर्व गुरुद्वारामध्ये गुरुबाणीचे गायन करणारे हे 'रागी' सर्व भजने सुरेल रागदारीवर आधारित अशा चालीमध्ये रचलेली दोन जण पेटीवादनास–एक तबलासाथीस. या रागीमध्ये अनेक गुरुद्वारांमध्ये अंधरागीही होते आणि त्यांच्या आवाजातील आर्तता आणखीनच वेगळा अनुभव देणारी.

गुरुद्वारात प्रवेश करताना हात–पाय स्वच्छ धुऊन मगच आत जायचे. डोक्यावर फेटा नसला तर रुमाल टाकून डोके झाकून घ्यायचे. 'मथ्था टेकणे' याचा अर्थ गुरुद्वारा-

मध्ये दर्शनास गेल्यानंतर लक्षात आला. लहान मुलापासून ते वयोवृद्ध माणसापर्यंत खेडेगावातील, शहरातील, सुशिक्षित–अशिक्षित अगदी विटक्या जीन्समधील तरुण मंडळीही दरबारसाहिबमध्ये गुरुग्रंथसाहिबसमोर अत्यंत श्रद्धेने डोके टेकताना पाहून खरोखरच आश्चर्य वाटत राहिले. दर्शनाला जाण्यापूर्वी अनेक जण बरोबर प्रसाद घेऊन जात. तो प्रसाद सेवादाराकडे द्यायचा. त्यातील निम्मा प्रसाद म्हणून मिळाल्यानंतर तो आजूबाजूच्या पाच–सात मंडळींना 'सत् श्री अकाल' असा नमस्कार करीत वाटायचा. दरबारसाहिबमध्ये काही काळ थांबून गुरुवाणी ऐकायची आणि मग परतायचे. अनेक ठिकाणी उत्स्फूर्तपणे स्त्री-पुरुष गुरुद्वाराची स्वच्छता करत होते, पाण्याने फरशी धुणे, लंगरमधील भांडी घासणे, आलेल्या यात्रिकाना पाणी वाटण्याचे काम करणे अशी कामे कोणीही न सागता स्वतःहून दर्शन घेण्यापूर्वी वा नतर काही वेळ करीत होते. परिचित मंडळी एकमेकाना भेटल्यानंतर स्वागत व्हायचे– 'वाहे गुरुकी खालसावाहे गुरुकी फतेह–' या कवनाने. दर्शनानंतर लंगरमधील 'प्रशाद चाखून' झाले की एका गुरुद्वाराची यात्रा पूर्ण.

आजचा शीखसमाज २५०–३०० वर्षांच्या सतत एकामागून एक होणाऱ्या आक्रमणांनंतरही खंबीरपणे टिकून राहिला असल्याची जी अनेक कारणे आहेत त्यातील गुरुद्वारपद्धती ही एक महत्त्वाचे कारण आहे असे या दौऱ्यानतर अवश्य वाटले. सर्व गुरुद्वारामध्ये कोणाही जाती–धर्माच्या श्रद्धाळू भाविकाना मुक्त प्रवेश आहे. गुरुद्वारामधील स्वच्छता-एकूण वातावरण, माणसाचे मन प्रवेश करताच प्रसन्न करते. पंजाबातील २५–३० तरी लहान–मोठी गुरुद्वारे या १५ दिवसात पाहिली. कोठेही 'स्पेशल दर्शना'ची रांग नाही की लावसट–पैशाला लाचावलेले पुजारी, नाहीत. सर्व गुरुद्वारांमधील ट्यूबलाइटचा सुंदर स्वच्छ प्रकाश, भरपूर हवा–विजेचे पंखे, पैसे गोळा करण्यास खोलबंद पेट्या आणि कळकट–घामट पुजाऱ्याऐवजी पाढऱ्या शुभ्र पोशाखातील रागी, ग्रंथी. दर्शन घेण्यासाठी धक्काबुक्की–शिव्याशाप नाहीत प्रत्येकजण शातपणे 'मथ्था' टेकून जातो आहे. तरणतारण, मुक्तसर, अमृतसर यासारख्या ठिकाणी बांधलेली प्रचंड सरोवरे, त्या भोवतालची परिक्रमा–संध्याकाळच्या वेळात या परिक्रमेवरून प्रदक्षिणा घालत गुरुवाणीचे स्वर जेव्हा ऐकू येतात तेव्हा मंदिरात कशासाठी जायचे हे लक्षात येते.

## हम–तुम, अपना–उनका

सैनिकी कारवाई होऊन जवळजवळ दोन महिनेपूर्ण होत आले आहेत. दैनंदिन व्यवहार पुष्कळसे शहरामध्ये व गावात सुरू झाले आहेत. गुरुद्वारामधून सैन्य मोठ्या प्रमाणात असले तरी शहराच्या व गावाबाहेर असलेली सैन्याची उपस्थिती ही पुष्कळच दरारा निर्माण करण्यास पुरेशी आहे; पण सैन्य किती काळ पंजाबात राहणार, ते परत गेल्यानंतर पुढे काय, अतिरेक्यांचा खरंच पुरता बीमोड झाला आहे का, कोसळलेल्या अकाल तख्ताची दुरुस्ती व करसेवेतून उत्पन्न झालेले वादविवाद... लष्करी कारवाईनंतर त्यामुळे काय होणार याबद्दल खूप मोठी अनिश्चितता व संदिग्धता पंजाबात आहे. सैन्य जास्त काळ राहूनही उपयुक्त नाही. दौऱ्याच्या काळातच असे दोन प्रसंग घडले की, सैन्याची जीप व एम. टी. ड्रायव्हर यांच्यात खटके उडून सर्व वाहतूक थोपविण्यात आली. सुदैवाने एका वरिष्ठ सैन्य-अधिकाऱ्याने मध्यस्थी करून सर्व गोंधळ लगेच मिटविला. सिरोपाव–परीक्षाही सैन्याच्या मदतीने घेण्यात येताहेत. करसेवेला कोणाला प्रवेश द्यायचा व कोणाला नाही या वादातही, दुर्दैवाने सैन्याचे जवान व अधिकारीही निर्णय-अंमलबजावणी करण्यामुळे समाविष्ट होत आहेत. जनतेत अजून तरी फार मोठ्या प्रमाणात सैन्याबद्दल कटुता नाही. कारण जवान सर्वत्र संयमाने व शिस्तीने वागले आहेत; पण आणखी काही काळ गेल्यानतर सरकारचे आमच्याविरुद्धचे प्रतिनिधी म्हणजे हे सैन्य, अशी प्रतिमा पंजाबात–विशेषत. गावात–निर्माण होण्यास वेळ लागणार नाही आणि अशी स्थिती येणे हे फार धोकादायक आहे.

शीख–हिंदू, हम–तुम, अपना–उनका हे शब्द सर्रास व्यवहारात बोलताना येऊ लागले आहेत. नवनवीन अफवा भडकवणारी भाषणे, प्रचारमाध्यमातील साचेबंद व एकतर्फी प्रचार यामुळे वातावरण आणखी खदखदत आहे. भिंद्रानवाले हुतात्मा बनण्याच्या मार्गावर आहेत. त्यापूर्वीचा चार वर्षांचा अतिरेक्याचा इतिहास लोक विसरून जाऊ लागले आहेत. सुवर्णमंदिराचे 'रक्षण' करणारे अतिरेकी 'शहीद' बनले आहेत आणि स्वतःच्या जिवाची पर्वा न करता आज्ञापालन करणाऱ्या राष्ट्रनिष्ठ जवानांच्या मात्र बलिदानाच्या खुणा राहिल्या आहेत त्यानी केलेल्या 'बेछूट' गोळीबारामुळे भग्न झालेल्या सुवर्णमंदिराच्या अवशेषांमधून !

हा सर्व शीखसमाज इतिहासावर जगतो, वाढतो. त्याचे पोषण झाले आहे अत्यंत दैदीप्यमान अशा गुरूंनी केलेल्या ओजस्वी बलिदानामधून. पंजाबातल्या प्रत्येक लहान–लहान गावी बाधलेल्या सुंदर–भव्य गुरुद्वाराना काही तरी इतिहास आहे. त्या आठवणी अत्यंत श्रद्धेने–भाविकतेने ऐकत हा समाज वर्षानुवर्षे कट्टर बनला आहे. सुवर्णमदिरावरील हल्ला हा त्यामुळेच जणू श्रद्धास्थानावरच झालेला आघात आहे अशी दु खद भावना या समाजाने करून घेतली आहे त्यानंतरही करसेवेमधील राजकारणाने जखम बरी होण्याऐवजी चिघळतच चालली आहे. 'सुवर्णमंदिरावरील हल्ला' हे नवे शिखांचे प्रेरणास्थान निर्माण होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. आमच्या पिढीने फाळणीचा कटु इतिहास अनुभवला नाही, फक्त वाचला आहे पुस्तकांतून; पण पंजाबला या सर्व समस्यांत तातडीने वेळ न दवडता कल्पकतेने उत्तर शोधायला हवे आहे. नाही तर दुर्दैवाने 'या देशाने फाळणीच्या इतिहासातून काहीच बोध घेतला नाही' असे भावी पिढीचे इतिहासकार म्हणतील. पंजाबात वादळ होऊन गेले आहे. वरकरणी सर्वच शांत आहे. दैनदिन व्यवहार चालू आहेत; पण ही आहे वादळापूर्वीची शातता का वादळानंतरची शातता ?

# स्वातंत्र्य
## वरदान आणि सुसंधि

३७ वर्षांपूर्वी आम्ही गुलामगिरीच्या बेडया तोडून स्वतंत्र राष्ट्रांच्या मालिकेत प्रवेश केला.

त्या क्षणापासून आम्ही जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जलद आगेकूच केली आहे.

- आज आमचे शेतकरी राष्ट्राच्या गरजा पुरतील, एवढे धान्य पिकवित आहेत.
- औद्योगिक उत्पादनाचा विचार करतां जगातील राष्ट्रांत आम्ही मानाचे स्थान मिळविले आहे.

प्रत्येकाला आणि सर्वांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळावा ही खात्री करून घेण्यासाठीं, आम्ही सतत प्रयत्न करीत आहोत आणि सुधारित २० कलमी कार्यक्रमात या कार्याला तीव्र गति देण्यात आली आहे.

केवळ या ध्येयाच्या दिशेनें परिश्रम करूनच आम्ही अंतर्गत आणि बाहय संकटापासून आमच्या स्वातंत्र्याचे आणि एकात्मतेचे रक्षण करु शकतो.

कठोर आणि संघटित परिश्रम करुनच आम्ही आमच्या प्रिय लक्ष्याच्या रोखाने वाटचाल करुं शकतो. असे परिश्रम करण्याचा संकल्प करुनच आपण स्वातंत्र्याच्या ३८ व्या वर्षात पदार्पण करू या




वि 84/93

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## ‘ बोंब मारायची ’

जेव्हा तुमची पाळी सुरू झाली तेव्हा तुम्हाला आलेला अनुभव सांगा असं काही स्त्रियांना विचारलं. बहुतेकींना पाळी येणं हे भीतिदायक वाटलं होतं. त्या सगळयांची घाण वाटली होती, लाज वाटली होती. तेव्हा झालेल्या फजितीनं त्यांना अनेक दिवस कानकोंडं करून सोडलं होतं. कित्येकींनी ते लपवायचाही प्रयत्न केला होता.

त्यांच्या आयांनी या प्रसंगात काय केलं होतं ? मुलगी अशी घाबरून, आश्चर्यचकित होऊन विचारायला आल्यावर मग आयांनी त्यांना सांगितलं होतं–असं सगळयाच बायकांना होतं. दर महिन्याला असं होणार. आता साडी नेसायची. कुणी बोलावलं तर जायचं नाही. काही वर्गांमध्ये मुलींना नवे कपडे केले. गोडाधोडाचं जेवण केलं. डोक्यात फुलं माळली. रोज डाळीचं पीठ-हळद लावून आंघोळ घातली असंही काही मुलींनी सांगितलं. ह्या प्रसंगात कानडी प्रदेशात तर मुलीला झोपाळयावर किंवा मखरात बसवतात. घरोघरहून ताटं वाढून येतात. मुलीला ‘ मुका मुलगा झाला ’ असं म्हणतात.

हे सगळं कौतुक नंतर करायचं ती मुलगी खरोखरीच ‘ बाई ’ झाल्याबद्दल. तिच्यात दोष नाही, आता तिला मुलं होऊ शकतात याची खात्री पटल्याबद्दल; पण स्वतः मुलगी या प्रसंगातून जाताना जो काही मानसिक धक्का अनुभवते त्याबद्दल आयांना काही वाटत नाही ? की ही पुढच्या सर्व मानसिक धक्क्यांची पूर्वतयारी म्हणून त्याबद्दल बोलायचं नाही असं असेल ?

असाच मानसिक धक्का, वयात येणाऱ्या मुलीला बसतो. घरातलाच कुणी तरुण काका, मामा, क्वचित मोठा भाऊ, लांबचा नातेवाईक, पाहुणा, शेजारी मुलीशी शारीरिक लगट करतो तेव्हा. ह्याही वेळी मुलीला पालक कोणताही आधार देत नाहीत. उलट कुठून कुणास ठाऊक वातावरण तिच्यावर उलटा दबाव आणत असतं. अशा गोष्टींबद्दल बोलणारी ती ‘ बिघडलेली मुलगी ’ असा आपल्यावर शिक्का बसेल का काय अशी तिच्या मनात चलबिचल असते.

बसमध्ये, आगगाडीत, रस्त्यावर, जत्रेत, चित्रपटगृहात गर्दीत कुठेही या कोवळया किशोरीवरच पुरुषांची घाणेरडी नजर असते. बसमध्ये कंडक्टर अशाच मुलींना तिकिटं देण्याच्या निमित्तानं नको तिथे हात लावून घेतात. गर्दीतून जाताना मागून ओंगळवाणे स्पर्श होतात आणि हे असं का ? अशा वेळी काय करायचं असतं ? हे कधीच कुणी मोठया माणसांनी समजावून सांगितलेलं नसतं. मुली बिचाऱ्या आपापले मार्ग शोधत असतात; पण ते अपुरे पडतात.

आम्ही मुंबईच्या लोकलमधून कॉलेजला जायचो. त्याला झाली आता बारा-तेरा वर्षं, आत्तापेक्षा तेव्हा गर्दी कमी असायची; पण तरीही पावसाळयात वगैरे काही गाडया रद्द झाल्या की उरलेल्या गाडयांना अतोनात गर्दी असायची. अशा गर्दीत मग आम्ही हातात सेफ्टीपिना उघडून तयार ठेवायचो आणि जवळ येऊ पाहाणाऱ्या संशयित हाताला टोचायचो. एकदा तर लोकलच्या गर्दीत आमच्या ग्रुपमधली मैत्रीण चक्क रडायला लागली; पण तरीही तेव्हा कुणीही आजूबाजूच्या मोठ्या माणसांनी आरडाओरडा केला नाही की कुणाला धरून झापडलं नाही, बदडलं नाही.

एक साधी सोपी गोष्ट करायला आपल्या मुलींना आपण शिकवलं पाहिजे. अशा निर्लज्ज माणसांना मोठयानं बोंब मारून विचारायचं, ‘ नीट उभं राहता येत नाही का हो ?’ आजूबाजूच्यांचं लक्ष गेलं की असा माणूस नेहमी गप्प बसतो. अशा वेळी खरं तर मुलींना सणसणून दोन–चार घाणेरडया शिव्याही देता यायला हव्यात, नाही तर हलकट वगैरे मृदू शिव्या दिल्यानं शिव्या खाणाऱ्याला आपला मंजुळ सन्मानच झाल्यासारखं वाटतं.

कॉलेजमधल्या काही एका काळात आम्ही मुली खांद्यावरच्या पिशवीत दोन–चार दगडही ठेवत असू आणि एखादी फोल्डिंग काठी पण ठेवायला हवी असं बोलणंही आमचं चालायचं.

मुलींना होणारा हा त्रास बाहेरचेच नव्हेत तर घरातलेही लोक शांत, निर्लज्जपणे पाहतात. ते पाहून संताप होतो. या गोष्टी चालायचंच म्हणून सोडून दिल्या जातात. कधी तर मुलीलाच तू नाकासमोर सरळ बघून चालत जा असा उपदेशही होतो, याला काय करायचं ?

याबद्दल मुलींना त्यांच्या नाजूक भावना न दुखावल्या जाता, जाणीव कशी द्यायची




हा पालकांपुढचा मोठा प्रश्न आहे. मुलीच्या या वयात पालकांची झोप उडत असली तर नवल नव्हे. मग या सगळ्याचा राग मुलीच्या उशीरा येण्यावर, नटण्यावर, नखरे करण्यावर, कोवळ्या मित्रावर निघतो. ही खरं तर आपण पालक आपली असमर्थता व्यक्त करत असतो.

लैंगिक शिक्षण देण्याचा प्रयत्न काही ठिकाणी चालू आहे. त्यात थेट गर्भधारणे-पासून सगळी शास्त्रीय माहिती दिली जाते. ती अयोग्य आहे असं मी म्हणत नाही; पण त्या शास्त्रीय ज्ञानामागचा हा सामाजिक आचरटपणाचा भागही समजावून द्यायला हवा. मुलीच्याच चारित्र्याबद्दल त्यातून उठणाऱ्या अफवाची निरर्थक भीती मुलीच्या मनातून घालवली पाहिजे. त्यांनी धीट बनलं पाहिजे. असं वागणाऱ्या माणसाला लोकांपुढे आणल पाहिजे. त्या माणसाशी ह्या कोवळ्या मुली सामना देऊ शकतीलच असं नाही.

आपण पालकांनी समाजात वावरतानाही पालकपण लक्षात ठेवलं पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी गर्दीतून जाताना आपलं आजू-बाजूला लक्ष असलं पाहिजे आणि असं वागणाऱ्याला जोरदारपणे दोन शिव्या घालून आपल्याला उघडं पाडता आलं पाहिजे.

ही सामाजिक जाण आपण वाढवली नाही, आपल्या मुलींना त्याबद्दल वेळेवर शहाणं केल नाही, तर सहाव्या न् सातव्या वर्षी आईसमोरसुद्धा कपडे काढायचा सकोच वाटणाऱ्या आपल्या मुलीचे भरं रस्त्यात कपडे फेडायला, गिधाडं कमी करणार नाहीत आणि हळूहळू परदु खाला मुर्दाड बनत चाललेली समाजाची मनं 'त्यांचं काही खाजगी असेल' अस म्हणून तिकडे दुर्लक्ष करणार आहेत.

म्हणून आज सात-आठ वर्षांच्या असलेल्या आपल्या मुलींनाही 'बोब मारायची' हा कानमंत्र देण्याचं दुर्भाग्य आपणा पालकांच्या नशिबी आलं आहे. ते आपण समजून घेतलं पाहिजे. □


**उसानंतरची नवी लाट .... निलगिरी लाट**

अनिश्चित पाण्यावरही हमखास उत्पन्न देणारे
दणकट पीक .... निलगिरी !

या पिकाची सविस्तर माहिती देणारे मराठीतील पहिले पुस्तक

**निलगिरीची शेती**

किमत : रुपये पंधरा

**लेखक : विनायक पाटील**

पुस्तक मिळण्याची ठिकाणे–

**( १ ) नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी संस्था, लि.**
संदीप अपार्टमेंटस्, त्रिंबक रोड, नाशिक ४२२ ००२

**( २ ) राजहंस प्रकाशन, नागनाथपाराजवळ,**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

□

१५ रुपये म. ऑ. ने पाठवल्यास ट. ख. माफ.
पुस्तक रजि. पोस्टाने पाठवले जाईल


चित्रपट

## सूड आणि आसू

# सगेसोयरे

'भुलभुलैय्या' कथासंग्रहात व. पुं. ची एक गोष्ट आहे. थोरली वहिनी, धाकटा दीर आणि त्याची बायको यांच्या मराठीतल्या ठाशीव प्रतिमेबद्दल. थोरल्या वहिनीचं काम त्यागाचं, अश्रूंचं, धाकट्या दिराचं निःसीम भक्तीचं आणि धाकटी जाऊ–कजाग, गृहभेदी वगैरे. वपुंच्या कथेत ही पात्रं जिवंत होऊन आपल्या या ठाशीव प्रतिमेबद्दल तक्रार करतात. थोरल्या वहिनीची तक्रार अशी की, मीच नेहमी त्याग का करावा ? तर धाकट्या जावेला नेहमी दुष्टच रंगवल्याबद्दल तीही संतापलेली. जर ही पात्रं खरोखरीच जिवंत झाली तर त्यांच्या यादीत आणखी एक नाव येईल आणि ते म्हणजे, नवीन चित्रपट 'सगेसोयरे.

'जोवरी विश्व चालेल
रामायणे ही घडतील' हे गाणं म्हणजे या चित्रपटाचं कथासूत्र. राम–शाम हे दोन भाऊ. जानकी–सुमित्रा त्यांच्या बायका. गीता, हेमत धाकट्याची मुलं तर राजेश हा थोरल्याचा एकुलता एक मुलगा. सुमित्रेचा भाऊ नानूमामा कळलाव्या नारद. सुभानराव आणि त्याचा मुलगा विक्रम राम–शामच्या वाइटावर. हे सूड आणि आसू दुसऱ्या पिढीतही चालू राहतात.

रामायणाचा आदर्श डोळ्यांसमोर असल्यानं सूड आणि आसू पुरेसे होत नाहीत. तर त्याला त्यागाचीही जोड द्यायला लागते. एकमेकांसाठी त्याग करण्याची जणू चढाओढ लागल्यागत त्यागाचं सत्र सुरू होतं. बहिणीच्या अब्रूरक्षणासाठी एकानं खून केला तर दुसऱ्या भावानं आरोप स्वतःवर ओढवून घ्यायचा असं हे अद्वितीय प्रेम.

रामायणच हे– मारुतीशिवाय पूर्ण कसं होईल ? गावातला बबन्या सोनार हा दिलदार इसम या राम–लक्ष्मणासाठी चोरीदेखील

करतो. एका नाटकात तो यांच्याबरोबर मारुतीचंही काम करतो, तर असं हे या चित्रपटाचं सूत्र— हिंदी चित्रपटाच्या आधारावर घेतलेलं आणि अतिशय 'मेलोड्रॅमॅटिक' पद्धतीनं सादर केलेलं.]

श्रेष्ठ कौटुंबिक चित्र अशी लेबलं लावलेले चित्रपट नेहमी 'थोरली जाऊ' 'सासुरवाशीण' नाही तर 'सगेसोयरे' अशासारखेच असतात. कुटुंब म्हणजे दोन भाऊ आणि त्यांची बायका-मुलं एवढीच मर्यादित व्याख्या या लेखक-दिग्दर्शकांना माहीत असावी. एक तर आजकाल विभक्त कुटुंबपद्धती प्रचलित आहे. एकत्र कुटुंब अगदीच अभावानं पहायला मिळतात. असं असताना अगदी अट्टाहासानं भावाभावांचे संसार एकत्र दाखवून मग त्यांच्यातलं वैर दाखवणं म्हणजे कौटुंबिक चित्र नव्हे हे या कथाकार-दिग्दर्शकांना कुणी तरी सांगायला हवं.

आणि दुसरं म्हणजे, दोन भावांबद्दलची गोष्ट जरी असली तरी त्याचे स्वभावही वर्षानुवर्षे तेच राह्यला हवेत का? वपुंच्या गोष्टीप्रमाणे भाऊ, दीर, वहिनी या पात्राचे स्वभाव कधीच बदलत नाहीत. प्रेमळ थोरली जाऊ, सज्जन नवरा, चागला दीर आणि कजाग धाकटी जाऊ याचच चित्रण करणारे हे चित्रपट पाहिले की, एकाच नाटकाचे वेगवेगळ्या कंपन्यांनी सादर केलेले प्रयोग पाहिल्यासारखं वाटतं.

जुना विषय हाताळला तरी काही नवीन तंत्रं वापरली जातील, हेही मराठी चित्रनिर्मात्यांच्या दृष्टीनं संभाव्य वाटत नाही. नाही म्हणायला, 'सगेसोयरे'त हिंदी चित्रपटांच्या धर्तीच्या मारामाऱ्या आणि एखाद दोन गाणी घातली आहेत. हिंदी चित्रपटात जसं कॉलेज-कॅन्टीन हा नायक-खलनायक वैरातला महत्त्वाचा घटक असतो, तसाच तो इथंही आहे; पण एखाद्या तंत्राची नक्कल केल्याने आपली निर्मिती चागली होते असे मुळीच नाही. किंबहुना अरुण सरनाईकला अमिताभ-टाइप मारामारी करताना पाहून हसायलाच येतं.

हे झालं चित्रपटाच्या सर्वसाधारण स्वरूपाविषयी; पण अनेक गोष्टी तर तर्काला अजिबात न पटणाऱ्या आहेत. (यात नवल ते काय?) राजेशच्या खुनाचा आळ हेमंत आपल्यावर घेतो; पण पोलीसखातं किंवा कोर्ट इतकं बिनडोक आहे का? त्यांनी बोटांचे ठसे वगैरे पडताळून पहावे की नाही? बरं, हे दोघं जुळे भाऊही नाहीत की, हे सहज खपून जावं; पण हेमत म्हणतो, मी खून केला म्हणून कोर्ट त्यालाच शिक्षा करतं. शिवाय सोयिस्करपणे 'कोर्टसीन' टाळला आहे. त्यामुळे त्याच्यावरचा गुन्हा कसा शाबीत झाला हे आपल्याला कळूच नये, प्रेक्षकांच्या हे लक्षातच येणार नाही, असं चित्रनिर्मात्यांना वाटतं की काय? प्रेक्षकांच्या आकलनशक्तीविषयी निर्मात्याचं इतकं 'लो ओपीनियन' असेल तर, मराठी चित्रपट म्हणून पहिल्या खेळालादेखील गर्दी करणाऱ्या मराठी चित्रपट-शौकिनांनी याचा गंभीरपणे विचार करणं भाग आहे.

चित्रपटाची एक जमेची बाजू म्हणजे इथली घरं फारच सुदर आहेत. शिवाय रंगीत चित्रण असल्यानं, ती आणखीच छान दिसतात. राम-शामचा वाडा प्रशस्त आणि उत्तमरीत्या बांधलेला आहे, तर सुमानरावाचा बंगला आणि फर्निचर उत्कृष्ट अभिरुची दाखवतात. छायाचित्रणही चागलं आहे. अनिल-अरुणचं संगीत असलेली गाणी ठीक आहेत. कॅबेरेच्या धर्तीवरच 'मारा ऽऽ नजरेचा तीर तुम्ही मारा,' हे गीत 'संगीत-चौर्या'ची केस असावी असं वाटतंय.

काहीही असलं तरी हा चित्रपट गर्दी खेचणार असं वाटतं.कारण अरुण सरनाईकच्या शेवटच्याच काही चित्रांपैकी हे एक चित्र. अरुण सरनाईक चित्रपट-शौकिनाचा आवडता नट होता यात शंका नाही. त्यामुळं त्याचं अगदी अलीकडचं काम बघण्यासाठी प्रेक्षक नक्कीच गर्दी करणार. त्याचं कामही ठीक आहे. या भूमिकेत जेवढा अभिनय करणं शक्य होतं, तेवढा त्यानं नक्कीच केला आहे.

चित्रपटातला सुखद भाग म्हणजे अशोक सराफ. त्याच्याविषयी पुनःपुन्हा लिहावं असं नाही; पण त्याचं काम उत्तम झालंय. बाकीच्या भूमिकांत रजना, कानन कौशल, कृष्णकांत दळवी, संजय जोग, महेश कोठारे वगैरे ठीक वाटतात. हेमंत, राजेशच्या बहिणीचं-गीताचं काम करणाऱ्या मुलीचा अभिनय सुरेख झाला आहे. तिच्या वाट्याला विशेष काम नाही; पण आहे तेही तिनं अतिशय सहजपणे केलं आहे. (ती बहुधा नवतारका अबोली असावी. टायटल्स चुकल्यानं ते कळलं नाही).

मराठी चित्रपट फारच थोडे निघतात, म्हणून आपण येणारे सर्व मराठी चित्रपट पाहतो खरे; पण याचा अर्थ असा नाही की, चांगले मराठी चित्रपट निघूच नयेत.

याचा विचार मराठी चित्रपटनिर्मात्यांनीच करायला हवा.

—उज्ज्वला लेले

# नाट्यपंढरी

## ☐ नटांचे नाटककार !

मराठी रंगभूमीला नट नि नाटककार यांची थोर परंपरा आहे. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी यासारखे नाटककार नि गणपतराव जोशी, गणपतराव भागवत, भाऊराव कोल्हटकर, केशवराव भोसले, नारायणराव बालगंधर्व यांसारखे अनेक अग्रेसर थोर कलाकार आपली नावे अजरामर करून गेले आहेत. नावं तरी किती सांगावी? खरे, शास्त्री, केळकर, अप्पा टिपणीस, वरेरकर, वीर वामनराव जोशी (नाटककार) टिपणीस, पोतनीस, दाते, कोल्हटकर, बोडस, फाटक, मा. दीनानाथ, पेंढारकर. (असे अनेक कलावंत) या प्रत्येकाच्या नावाचा दीप, रंगभूमीच्या दीपमाळेवर आपापल्या तेजाने उजळत आहे. मागिलांनी उभारलेली नि उंचावलेली दीपमाळ, पुढिलांनी तेजस्वी नि समृद्ध केली आहे. नटेश्वराची पूजा अखंड चालू आहे.

नट-नाटककारांची अशी थोर परंपरा आहेच; पण नटाचा-नाटककार (नटाचे नाटककार) हा एक आपल्या रंगभूमीचा फार मोठा वारसा आहे. नट हा नाटककार झाला, तर नाटकाची, खेळाची, रंगत तो अधिक वाढवितो असा अनुभव आहे. कारण रंगभूमीचे बारकावे नि आडाखे त्याच्या अंगवळणी पडलेले असतात. यांचा अर्थ असा नाही की, सगळेच नटाचे नाटककार हे यशस्वी झाले आहेत; पण त्याबरोबर हेही खरे की, त्यांची रंगभूमीवरची कामगिरी

(Contribution) मोलाची आहे.

अहो, संगीत नाटकाचे कुलगुरु आपले अण्णासाहेब किर्लोस्कर याचा नट नि नाटककार म्हणून रंगमंचावर (शाकुंतल) एकदमच प्रवेश झाला. देवल आपल्या झुंजारराव नाटकात, 'झुंजारराव' म्हणूनच रंगभूमीवर आले. उगाच का आजही उत्तम नाट्यशिक्षक (तालीममास्तर) म्हणून त्यांच्या नावाचा कौतुकाने उल्लेख होतो? पाटणकर (सत्य-विजय) बाबाजीराव राणे (तुकाराम) हे नट–नाटककारच! यांच्या नाटकमंडळ्यांची भिस्त यांच्याच नाटकांवर होती.

'महाराष्ट्र नाटक मंडळी' ही तर सुशिक्षितांची नाट्यसंस्था! यातच यशवंत नारायण ऊर्फ अप्पा टिपणीस (शहा शिवाजी) वि. ह. औंधकर (बेबंदशाही), अण्णा कारखानीस (राजाचे बंड), ग. कृ. बोडस (झाशीची राणी) महाराष्ट्र नाटक मंडळीचाच वारसा घेऊन आलेले वि. ग. देशपांडे (उमाजी नाईक) ही मंडळी होती.

मग कोसळणाऱ्या रंगभूमीला सावरणाऱ्या अत्रे–रांगणेकरांचे युग सुरू झाले. याच काळात गिरणगावातल्या अनेक हौशी नटांनी लेखणी हाती घेतली नि नट–नाटककार झाले. अगदी पडत्या काळात रंगभूमी जगविण्याचे फार मोठे श्रेय गिरणगावातल्या मंडळींनाच द्यायला हवे. किंबहुना मराठी रंगभूमी, दामोदरहॉल (परळ) इथेच जिवंत होती म्हणा ना! १९४३ साली रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव झाला नि रंगभूमीच्या शिडात नवी हवा भरली गेली. (डॉ. अ. ना. भालेरावांनीच ती भरली असे म्हणणे योग्य.) मग शिरवाडकर (कुसुमाग्रज), काणेकर, कुलकर्णी, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, कोल्हटकर, कालेलकर, गोखले, खरे, पेंडसे, नवरे, दळवी, मतकरी असे नाटककार गाजले.

पण पु. ल. हे आधी नट, मग नाटककार. (तुझे आहे तुजपाशी) खऱ्या अर्थाने अत्यंत आदराने त्यांना बहु–रूपीच (Versatile) म्हणायला हवे.

नागेश जोशी (देवमाणूस), बबन प्रभू (झोपी गेलेला जागा झाला), बाळ कोल्हटकर (दुर्वांची जुडी), मधुकर तोरडमल (तरुण तुर्क), शरद तळवलकर (नाटक झाले जन्माचे) हो, आपले बाबुराव गोखले (करायला गेलो एक) असे अनेक गुणवंत नट–नाटककार म्हणून गाजले आहेत. आणखीही किती तरी नट–नाटककार असतील.

नट–नाटककार हा एक समृद्ध वारसा आहे नि तो अधिक समृद्ध होत आहे.


## □ 'राजसंन्यास'चे सौभाग्य?

गडकऱ्यांचे राजसंन्यास हे त्यांच्या प्रतिभेचे कैलासलेणे! अपुरे, अपूर्ण, अधुरे! नि मला वाटते रसिकांचे अधिक लाडके. नाही तरी चंद्रापेक्षा चंद्रकोरीचेच कौतुक अधिक! हे नाटक गडकऱ्यांच्या हयातीत रंगभूमीवर आले असते तर? पण 'जर तर'ने प्रश्न थोडेच सुटतात? त्यांची गाजलेली एकच प्याला, भावबंधन ही देखील पित्याच्या मृत्यूनंतरच रसिकांना वेड लावून गेली. राजसंन्यास मात्र अपुरेच राहिले!

हे नाटक उभे करायला खूप खर्च येणार, म्हणून मागे पडून राहिले होते. शिवाय अपूर्ण. इंदूर नरेश; तुकोजीराव होळकर यांनी 'बलवंत संगीत मंडळी'चे भावबंधन पाहिले नि ते एकदम खूष झाले. गडकऱ्यांच्या प्रतिभेने दिपून गेले! 'या लेखकाची तुम्ही आणखी कोणती नाटके करता?' म्हणून त्यांनी विचारले. चिंतामणरावांनी पुण्यप्रभाव नि एकच प्याला करतो म्हणून सांगितले. त्याबरोबरच 'राजसंन्यास'चे सूतोवाच करण्याची संधी घेतली. 'राजसंन्यास' हे संभाजीराजाच्या जीवनावरचे नाटक आहे. त्याची सजावट करणं आमच्या कुवतीच्या बाहेरचं आहे, म्हणून इतके दिवस पडून आहे. आपली आज्ञा होत असेल तर...? 'करा, जरूर, करा' म्हणून महाराजांनी आज्ञा दिली. मास्तरांचे नाटक रंगभूमीवर येणार म्हणून 'बलवंत'ची कलाकारमंडळी आनंदून गेली. चिंतामणराव, मा. दीनानाथ आनंदात न्हाऊन निघाले!

महाराजांनी मदत केल्याने महिना–दीड महिन्यात राजसंन्यास दरबारी थाटात रंगभूमीवर आले. साहजिकच प्रयोग महाराजांसाठी असल्याने, निमंत्रितांसाठीच होता. दर्शनी पडद्याच्या दोन्ही बाजूंच्या विंगजना, मोठ्या सूचकतेने जरीपटका नि भगव्या ध्वजाची छोटी छोटी निशाणे लावली होती. थिएटरमध्ये येता येता ती महाराजांच्या दृष्टीस पडली. ते लगेच थांबले नि त्यांनी ध्वजाला वंदन केले. प्रयोग अतिसुरेख झाला. नाटक प्रेक्षकांना त्या ऐतिहासिक काळातच घेऊन गेले.

मुंबईत कंपनीने 'राजसंन्यास'चे सकाळी प्रयोग सुरू केले. वेळ गैरसोयीची असूनही मुंबईकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले. प्रत्येक प्रयोग 'हाउसफुल्ल' होता. मग अवघ्या महाराष्ट्रात नाटकाचे खूप कौतुक झाले. 'टाइम्स ऑफ इंडिया'सारख्या पत्राने त्याचे कौतुक केले. नाटकाला जाताना 'डोळे पुसायला एक रुमाल पुरणार नाही' म्हणूनही सुचवले. मॅटिनी (Matinee) या शब्दाची फोड करताना विनोदाने लिहिले की, मॅटिनी म्हणजे सकाळ. कारण त्या वेळी दुपारच्या प्रयोगानाही मॅटिनीच म्हणत असत. राजसंन्यासाचे जे सध्या प्रयोग होत आहेत, ते खऱ्या अर्थाने 'मॅटिनी शो' होत. तुम्हाला आश्चर्य वाटेल, नाटकाचे सकाळचे खेळ करण्याची सुरुवात 'राजसंन्यास' नाटकानेच झाली. गडकरी हे 'बलवंत'चे दैवत. प्रत्येक गावी मोठ्या भक्तिभावाने कंपनी प्रयोग करीत असे.



## योजनेतील पुस्तकांची सूची

### एक झाड आणि दोन पक्षी
पॉप्युलर प्रकाशन / रु. १००
' रणांगण 'कार श्री. विश्राम बेडेकर यांचे आत्मकथन.

### टॉलस्टॉय–एक माणूस
सुमती देवस्थळे / रु. ५५
टॉलस्टॉयच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्वाचा लेखिकेने घेतलेला शोध.

### नाझी भस्मासुराचा उदयास्त
चौथी दिमाखदार आवृत्ती
वि. ग. कानिटकर / रु. १४०

### योद्धा शेतकरी
विजय परुळकर / रु. ३६
शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे अतिशय जिव्हाळ्याने केलेले चित्रण.

### श्रीग्रामायन
श्री. ग. माजगावकर / रु. २५
जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून, ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा एक आगळा प्रयत्न.

### बलसागर
श्री. ग. माजगावकर / रु. ३०
राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

### डॉ. आयडा स्कडर
सौ. वीणा गवाणकर / रु. २२
ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडानी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

### एक होता कार्व्हर
सौ. वीणा गवाणकर / रु. ३०
वैराण मुलुखाचे सुजलाम् सुफलाम् भूमीत रूपांतर करणारा थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ डॉ कार्व्हर यांचे प्रेरणादायी चरित्र.

### आंबेडकर भारत
बाबुराव बागुल / रु. २०
गोष्टीरूप आंबेडकर चरित्र

### पूर्णिया
अनिल अवचट / रु. १२
अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

### फिडेल, चे आणि क्रांती
अरूण साधू / रु. २२
जुलमी राजवटीच्या टाचाखाली दडपल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ पाहणाऱ्या क्रांतीचा इतिहास.

### लेक वालेसा
डॉ. श्रीकांत मुंदरगी / रु. २२
लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

### विज्ञानेश्वरी
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
किचकट गणिताच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे- खास ललितशैलीतील पुस्तक.

### तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय....
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
विज्ञानयुगातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून–उलगडून दाखविणारे पुस्तक.

### आपली मुलं
शोभा भागवत / रु. २०
आपली मुलं मोठी होत असताना त्यांच्याकडं पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

### मला निसटलंच पाहिजे
अनु. श्रीकांत लागू / रु. २०
इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन ते निसटले व भारताच्या भूमीत उतरले. त्यांच्या साहसाची कथा.

### सांगत्ये ऐका
हंसा वाडकर / रु. १४
रसिकांची, व सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले खळबळजनक, मोकळे, अनोखे आत्मवृत्त.

### शतपावली
रवींद्र पिंगे / रु. १६
रवींद्र पिंगे यांच्या सहजसुंदर लेखणीतून उतरलेली बारा उत्कृष्ट व्यक्तिचित्रे.

### सबला
माधव शिरवळकर / रु. १२
स्त्री–बुवाबाजीवर झोत टाकणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी.

### रूपवती भार्या शत्रुः !
ॲड. माधव कानिटकर / रु. २५
ॲड. कानिटकर यांच्या समर्थ लेखणीतून उतरलेले, काही गाजलेले खून खटले.

### हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा
अशोक परळीकर / रु. १२
निझामी राजवटीतील अमानुष अन्यायाचे आणि हैद्राबाद मुक्तीसाठी प्राणपणाने दिल्या गेलेल्या लढ्याचे दर्शन घडविणाऱ्या कथा.

### लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
पु. ल. इनामदार / रु. २०
ग्वाल्हेरचे गांधीवादी वकील श्री. पु. ल. इनामदार यानी महात्मा गांधी खून–खटल्यातील सहावे प्रमुख आरोपी डॉ. परचुरे यांचे वकीलपत्र घेऊन या खटल्यातून निर्दोष मुक्तता केली. त्या खटल्याची कथा.

### तीर्थरूप आक्का
शारदाबाई आपटे /रु. ५
जुन्या कुटुंबातील कर्मयोगी सेविकेची कथा.

### टच
अशोक प्रभाकर डांगे / रु. १०
काही विदेशी चित्रपट कथांचा संग्रह.

### काही दिवस श्यामचे– काही राधाचे
फिरोझ रानडे / रु. २५
मध्यमवर्गीय श्यामच्या संसारकथा.

### आर डॉक्युमेंट
लेखक : आयर्व्हिंग वॉलेस
अनुवाद : अशोक जैन / रु. १०
राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या जगप्रसिद्ध लेखकाच्या कादंबरीचा परिचय.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

लोकांनी, लोकांचें, लोकांसाठी चालवलेले राज्य हे ज्याच राजकीय वचन होते
परंतु अतिरेक्यांनी केवळ स्वार्थासाठी केलेले लोकांचे आणि देशाचे विच्छेदन ज्याला पाप वाटत होते
अशा एका लोकशाही नेतृत्वाची कहाणी.

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि. ग. कानिटकर



भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत
असलेली पहिली डीलक्स आवृत्ती.
मोठा क्राऊन आकार. पृष्ठे ४००

दीडशे रुपये किंमतीचा दर्जेदार चरित्रग्रंथ आपल्या संग्रही असण्यासाठी

# ऑगस्ट ८४ योजना

## ५०० रुपये + ५ वर्षे = ४०० रुपये + ५०० रुपये

आपण ५०० रुपये ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेव म्हणून ठेवल्यास ४०० रुपये किंमतीची पुस्तके आपणास व्याजाच्या मोबदल्यात मिळू शकतील आणि ५ वर्षांनंतर ठेवही परत मिळेल.

## शिवाय

योजनेतील सभासदांना आज उपलब्ध असलेली व पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत मिळू शकतील. ( पोस्ट खर्च सभासदांचा राहील. )

**सूचना :** १. योजनेतील सभासदाला ४०० रुपये किंमतीची पुस्तके मिळणार आहेत. ज्या सभासदांकडे **'फाळणी टाळणारा महापुरुष'** हा ग्रंथ असेल वा नको असेल त्यांना त्या किंमतीची इतर पुस्तके मिळू शकतील.
२. चेक वा ड्राफ्ट 'राजहंस प्रकाशन' या नावाने काढावा.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४३४५९
वेळ : सकाळी ११ ते ५

**श्री. वा. र. गोडे**
४१ भवानी शंकर रोड
चितळे पथ कॉर्नर, जोशी वाडी
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८
वेळ : दुपारी २ ते ७

योजनेतील
पुस्तकांची सूची
मलपृष्ठ १ वर